नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १४१ * | * अकोला * | सोमवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## विंग कमांडरवर हिमाचलमध्ये अंत्यसंस्कार

■ वृत्तसंस्था, शिमला, दि. २३ :

दुबई एअर शोमध्ये तेजस लढाऊ विमान अपघातात प्राण गमावलेले विंग कमांडर नमांश स्याल यांच्यावर रविवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा चुलत भाऊ निशांत यांनी हिमाचल प्रदेशातील कांगडा जिल्ह्यातील त्यांच्या मूळ गावी पटियालकर येथे अंत्यसंस्कार केले. दुपारी त्यांचे पार्थिव गावात पोहोचले. अंत्यसंस्काराच्या वेळी त्यांची पत्नी पायलट अफसान गणवेशात आली आणि त्यांना अंतिम श्रद्धांजली वाहिली. हवाई दलाचे अधिकारी त्यांना सावरताना दिसले. तत्पूर्वी, दुपारी १ वाजता कॅबिनेट मंत्री यादवेंद्र गोमा, नगरोटा येथील आमदार आरएस बाली आणि शाहपूरचे आमदार केवलसिंग पठानिया यांनी गग्गल विमानतळावर त्यांना श्रद्धांजली वाहिली.

अग्राग्रलेख

खरीखरी..

## नवीन नेताजी

कोणे एकेकाळी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी भारताला स्वतंत्र करण्यासाठी एक मंत्र दिला होता. तो मंत्र असा होता की, 'तुम मुझे खून दो और मै तुम्हे आजादी दूंगा' हा मंत्र भारताच्या जनमनात वंदेमातरम सारखा रुजला होता. या मंत्राच्या पावलावर पाऊल टाकून आपले रोखठोक उपमुख्यमंत्री आणि नवीन नेताजी अजित पवारांनी नवा नारा दिला आहे. तो म्हणजे, 'तुम मुझे वोट दो तुम्ही पैसा (निधी) दूंगा' हे किती उच्चतम दजार्चे विधान आहे याची कल्पनाच करवत नाही. याचा गर्भितार्थ असा आहे की, तुम्ही जर मला मते दिली तरच मी तुमच्यासाठी वाटेल तेवढा पैसा देईन. कारण मी महाराष्ट्राचा वित्तमंत्री म्हणजेच अर्थमंत्री आहे. तुम्ही जर मला मते दिली नाही तर माज्याकडे वित्त खाते असल्यामुळे माझे पित्त खवळेल आणि मग निधी अभावी तुमच्या गावचा विकास कसा होईल हे मी पाहून घेईन. आम्हाला असा सरळसोट हिशोब पटतो. ताकाला जाऊन गाडगे लपवण्यापेक्षा सरळ सरळ बोलण्यातून व्यवहार केलेला बरा, असा विचारही आमच्या मनात दादांच्या या विधानानंतर आलाय. काही वर्षांपूर्वी तामिळनाडूमध्ये जयललिता यांनी एक रुपया किलोमध्ये तांदूळ देण्याचे आश्वासन दिले होते आणि त्या भरघोस मताने निवडून आल्या होत्या. सध्याचे आपले नवे नेते नेताजी आणि राज्यकर्ते त्यापेक्षाही उदार आहेत. आपल्या देशातील गरिबी हटली असे म्हणतात, पण आपले पंतप्रधान ८० कोटी लोकांना दरमहा फुकट धान्य देतात. त्यांच्या पावलावर पाऊल टाकून मध्य प्रदेश सरकारने 'लाडली बहना' या गोंडस नावाखाली दरमहा हजार-बाराशे किंवा पंधराशे पर्यंत पैसे दिले. तीच प्रेरणा घेऊन आपले तत्कालीन म्हणजेच मागील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन्ही उपमुख्यमंत्री विरोधात असतानाही महाराष्ट्रातल्या पात्र किंवा अपात्र असा कुठलाच हिशोब न करताना सर्वांना म्हणजेच अर्ज केलेल्या सरसकट सगळ्याच बहिणींच्या खात्यात पंधराशे रुपये टाकले. गंमत अशी आहे की, निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी पुढच्या महिन्याचे पैसेही देऊन टाकले आणि त्याचाच परिणाम अख्ख्या महाराष्ट्राने बघितला. आता बिहारमध्ये आचारसंहिता लागू झाल्यावरही अनेक महिलांच्या खात्यात धडाधड धडाधड दहा हजार रुपये टाकण्यात आले. आपल्या देशामध्ये काही वर्षांपूर्वी इंदिरा गांधी यांची निवडणूक दोन तीन हजारांच्या सरकारी खचार्मुळे अलाहाबाद कोर्टाने रद्द ठरवली होती. परंतु तो काळ वेगळा होता, हा काळ वेगळा आहे. गेल्या काही वर्षात आपल्या देशात फुकटेगिरी इतकी वाढलेली आहे की हा देश आता कुठे फुकट काय मिळते त्यामागे धावत असतो. मोदीजींनी सुरुवातीला यावर प्रचंड मोठी टीका केली होती. परंतु काळाच्या प्रवाहाबरोबर त्यांनाही चालावे लागले. त्यांच्या मनात कितीही उच्च दर्जाच्या कल्पना असल्या तरीही गरिबांना मदत करणे हे सरकारचे कामच आहे असे समजून त्यांनीही सामान्यातल्या सामान्यांना मुक्तदान करणे सुरूच ठेवलेले आहे. काही ठिकाणी शेतकऱ्यांनाही त्याचा लाभ मिळालेला आहे, त्यालाही आक्षेपाचे कारण नाही कारण पंतप्रधान हे देशाचे मालक आहेत. हा झाला फुकटेगिरीचा प्रकार पण आता आपल्या स्पष्टवक्त्या अजित दादांनी जुनाच आदर्श घेतला आणि स्वातंत्र्यपूर्व काळात नेताजी सुभाषचंद्र बोस म्हटले होते की, तुम्हाला स्वातंत्र्य हवे असेल तर रक्त द्या. मात्र, सध्या नवे नेताजी अजितदादा असे म्हणतात की आपल्या सर्वांची कामे करण्यासाठी सरकारमध्ये आम्ही सामील झालो आहोत. तुम्ही आम्हाला सत्तेमध्ये निवडून आणा तरच आम्ही तुमचे काम करू. गेल्या दहा-अकरा वर्षात आपल्या देशातील कर्ज चारपट वाढलेले आहे. चावाकनि असे म्हटले होते की कर्ज कितीही होऊ द्या, कर्ज काढा आणि मजा करीत रहा. त्याप्रमाणे आता जी कोणती निवडणूक येईल त्याच्या आधी उघड उघड पैसा वाटा आणि निवडून या असे सूत्र सर्वांचेच दिसून येत आहे. त्यासाठी आता कोणत्याही पक्षाला नावे ठेवता येणार नाहीत कारण सर्व पक्ष सध्या एकाच माळेचे मणी आहेत. आपले सध्याचे उपमुख्यमंत्री दादा कंठमणी आहेत. त्यांना आमच्या कोटी कोटी शुभेच्छा! कारण आम्ही तेवढेच करू शकतो, बाकी धन्यवाद!


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


## विदर्भाच्या शेतकऱ्यांना मिळणार

# एआय तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन

>> ॲग्रोव्हिजन फाउंडेशन, एनबीएसएलयूपी आणि बारामती ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट यांच्यात सामंजस्य करार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

ॲग्रोव्हिजन फाउंडेशन, नागपूरचे नॅशनल ब्युरो ऑफ सॉईल सर्व्हे अँड लँड यूज प्लॅनिंग आणि बारामती ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट आणि यांच्यात आज विदर्भाच्या शेतकऱ्यांना एआय आधारित तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन सुलभ करून देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या कराराअंतर्गत सुरुवातीला तूर, उस आणि संतरा या पिकांसाठी महत्त्वाचे असे डोमेन नॉलेज प्राप्त करून त्यानंतर एकत्रित सहकार्याने शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी कार्य करण्यात येणार आहे. हे प्रयोग यशस्वी झाल्यावर विविध पिकांना यात समाविष्ट करून घेतले जाणार आहे.




नागपूरच्या अमरावती रोड स्थित कॅम्पस परिसरात आयोजित ॲग्रोव्हिजन कृषि प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिशी सकाळच्या सत्रात हा करार करण्यात आला. यावेळी ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, सकाळ समूहाचे व्यवस्थापकीय संचालक आणि अध्यक्ष पद्मश्री प्रताप पवार, बारामती ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे विवेक भोईटे, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, नॅशनल ब्युरो ऑफ सॉईल सर्व्हे अँड लँड यूज प्लॅनिंग चे प्रधान संशोधक डॉ. एच बिसवास, ॲग्रोव्हिजन फाउंडेशचे सल्लागार डॉ. सी डी. मायी ॲग्रोव्हिजन फाउंडेशनचे सचिव रवी बोरटकर यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. विवेक भोईटे, रवी बोरटकर, डॉ. एच बिसवास यांनी यावेळी कारारावर स्वाक्षऱ्या केल्या.

शेतकऱ्यांना स्वतःचा विकास करून घ्यावा लागेल असे कळकळीचे आवाहन आज प्रताप पवार यांनी केले. शेतकऱ्यांची उन्नती व्हावी हाच आपला ध्यास असल्याचे त्यांनी सांगितले. मायक्रोसॉफ्ट कंपनी, बिल गेट्स फाउंडेशन आणि ऑक्सफोर्ड यूनिवर्सिटी तसेच बारामती ॲग्रीट्रस्टनेकृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यापासून तिथले शेतकरी एकरी दीडशे टन पर्यंत उसाचे उत्पादन घेत आहे, अशी यशोगाथा त्यांनी सांगितली.

एक हजार शेतकऱ्यांची नोंदणी करणार : यावेळी करण्यात आलेल्या सामंजस्य करारानुसार आयोजित होणाऱ्या उपक्रमात सुरवतीला विदर्भातील एक हजार शेतकऱ्यांना निवडून त्यांची ॲग्रोव्हिजन सोबत नोंदणी करून घेण्यात येणार आहे अशी माहिती नितीन गडकरी यांनी दिली.

या १००० शेतकऱ्यांचे सॉईल हेल्थ कार्ड काढून खतांचा औषधांचे, कीटकनाशकांचे किती प्रमाण कशाप्रकारे वापरायचे आणि एआयनुसार एकरी किती फायदा होतो त्याचे पूर्ण मूल्यमापन केले जाणार आहे. सुरवातीला तूर, ऊस आणि संत्रा या पिकांचे एसओपी तयार करण्याचे काम सुरू असल्याचे ते म्हणाले. याशिवाय बुटीबोरी येऊ घातलेल्या वसंतदादा शुगर इंस्टिट्यूट आणि पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांची सांगड घालून नवनवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण शरद पवारांशी बोललो असल्याचे ते म्हणाले.

वर्धा रोड वरील हॉटेल रेडिसन जवळ ॲग्रोव्हिजनचे सात मजली मोठे केंद्र तयार होणार असून जानेवारी पर्यंत त्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना टप्प्याटप्प्याने पुढे जाऊन तज्ञांच्या मार्गदर्शनात विकास करून घेण्याचा सल्ला दिला. एआय आधारित तंत्रज्ञानाचे प्रयोग यांचा योग्य प्रचार प्रसार झाल्यावर एक दिवस विदर्भ हा शेतकरी आत्महत्यारहित असा प्रदेश बनेल असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

## आक्रमण थांबवा

जी-२० परिषदेत शांततेचा संदेश

■ वृत्तसंस्था, जोहान्सबर्ग, दि. २३ :

कोणत्याही राष्ट्राने धमकीचा किंवा बळाचा वापर करून दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करून त्यांचे सार्वभौमत्व किंवा राजकीय स्वातंत्र्य धोक्यात आणू नये, असे आवाहन जी-२० शिखर परिषदेच्या जाहीरनाम्यात करण्यात आले. दक्षिण आफ्रिकेच्या जोहान्सबर्ग येथे आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह विविध राष्ट्रप्रमुख सहभागी झाले होते.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या परिषदेत सहभागी न होण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्यांचा विरोध न जुमानता सर्व सहभागी राष्ट्रप्रमुखांच्या सहमतीने हा जाहीरनामा स्वीकारण्यात आला. सामान्यतः परिषदेच्या अखेरीस जाहीरनामा स्वीकारला जातो, या परिषदेत मात्र तो सुरुवातीलाच स्वीकारण्यात आला. सर्व देशांचे आपापसांत मैत्रीपूर्ण संबंध असावेत, मानवाधिकारांचा प्रसार करावा आणि मानवी हक्कांचे आदर करण्यास प्रोत्साहन दिले जावे, तसेच वंश, लिंग, भाषा किंवा धमार्चा विचार न करता सर्वांना मूलभूत अधिकार दिले जावेत, असेही आवाहन जी-२०कडून करण्यात आले.

भूराजकीय व भू-आर्थिक स्पर्धा वाढत असून संपूर्ण जगावर त्याचा प्रभाव पडत आहे, मात्र सर्वसमावेशक वाढीसाठी एकता, समानता आणि शाश्वतता हे मुख्य स्तंभ आहेत, असे या ३९ पानी जाहीरनाम्यात नमूद करण्यात आले. तसेच ऊर्जा सुरक्षा, हवामान बदल, आपत्तीदरम्यान लवचिकता आणि प्रतिसाद यांचाही ठळकपणे उल्लेख करण्यात आला.

## बी.आर. गवई यांच्या जागी न्यायमूर्ती सूर्यकांत

# आज सरन्यायाधीश म्हणून घेणार शपथ

■ वृत्तसंस्था,
नवी दिल्ली, दि. २३ :



न्यायमूर्ती सूर्यकांत सोमवारी भारताचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेणार आहेत. जम्मू आणि काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० रद्द करणे, बिहार मतदार यादीची संपूर्ण पुनरावृत्ती आणि पेगासस स्पायवेअर प्रकरण यासह अनेक ऐतिहासिक निकाल आणि आदेशांचा त्यांनी भाग घेतला आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत हे न्यायमूर्ती बी.आर. गवई यांची जागा घेतील, ज्यांचा कार्यकाळ आज संध्याकाळी संपत आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत यांची ३० ऑक्टोबर रोजी पुढील सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली होती आणि ते सुमारे १५ महिने या पदावर काम करतील. ते ९ फेब्रुवारी २०२७ रोजी वयाच्या ६५ व्या वर्षी निवृत्त होतील.

१० फेब्रुवारी १९६२ रोजी हरियाणाच्या हिसार जिल्ह्यात एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेले न्यायमूर्ती सूर्यकांत हे एका छोट्या शहरातील वकिलापासून देशातील सर्वोच्च न्यायिक पदावर पोहोचले, जिथे ते राष्ट्रीय महत्त्वाच्या आणि संवैधानिक बाबींवर अनेक निर्णय आणि आदेशांचा भाग होते. २०११ मध्ये कुरुक्षेत्र विद्यापीठातून कायद्यात पदव्युत्तर पदवी मिळवण्याचा मानही त्यांच्याकडे आहे. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात अनेक उल्लेखनीय निर्णय देणारे न्यायमूर्ती सूर्यकांत यांची ५ ऑक्टोबर २०१८ रोजी हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली.

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश म्हणून त्यांचा कार्यकाळ कलम ३७० रद्द करणे, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि नागरिकत्व हक्कांवरील निर्णयांसाठी ओळखला जातो. न्यायमूर्ती सूर्यकांत हे त्या खंडपीठाचे सदस्य होते ज्यांनी वसाहतकालीन राजद्रोह कायदा स्थगित केला आणि सरकार त्याचा आढावा घेईपर्यंत त्याअंतर्गत कोणतेही नवीन एफआयआर दाखल करू नयेत असे निर्देश दिले. तळागाळातील लोकशाही आणि लिंग न्यायावर भर देणाऱ्या आदेशात, त्यांनी एका खंडपीठाचे नेतृत्व केले ज्याने बेकायदेशीरपणे पदावरून काढून टाकलेल्या आणि या प्रकरणात लिंगभेद उघड करणाऱ्या एका महिला सरपंचाला पुन्हा नियुक्त केले.

## तेलंगणामध्ये ३७ माओवाद्यांनी केले आत्मसमर्पण

■ वृत्तसंस्था, हैदराबाद, दि. २३ :



सदतीस माओवाद्यांनी डीजीपी बी. शिवधर रेड्डी यांना आत्मसमर्पण केले आहे. त्यांनी मोठ्या प्रमाणात शस्त्रे देखील सुपूर्द केली आहेत. तेलंगणाच्या डीजीपींनी स्वतः आत्मसमर्पण केल्याची माहिती दिली. यातील तीन माओवादी उच्चस्तरीय माओवादी होते.

डीजीपी बी. शिवधर रेड्डी यांनी पत्रकारांना सांगितले की आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांमध्ये तीन राज्य समिती सदस्य, तीन विभागीय समिती सदस्य, नऊ क्षेत्र समिती सदस्य आणि इतर २२ कम्युनिस्ट पक्ष ऑफ इंडिया (माओवादी) सदस्य आहेत. तेलंगणाचे डीजीपी बी. शिवधर रेड्डी यांनी सांगितले की तीन राज्य समिती सदस्यांमध्ये कोयदा संबैया (४९) उर्फ आझाद, अप्पासी नारायण उर्फ रमेश (७०) आणि मुचाकी सोमदा आहेत. संबैया आणि नारायण हे तेलंगणा समितीचे आहेत, तर सोमदा माओवाद्यांच्या दंडकारण्य विशेष प्रादेशिक समितीचा भाग होते. डीजीपींना आत्मसमर्पण करणाऱ्या माओवाद्यांनी एक एके-४७ रायफल, दोन एसएलआर रायफल, चार ३०३ रायफल, एक जी३ रायफल आणि ३४६ राउंड दारूगोळाही दिला.

डीजीपी शिवधर रेड्डी यांनी सांगितले की, मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याच्या आवाहनाला माओवाद्यांनी प्रतिसाद दिला. त्यांनी सांगितले की, चालू माओवादविरोधी मोहीम, वैचारिक मतभेद आणि संघटनेतील अंतर्गत कलह यामुळे त्यांच्या आत्मसमर्पणाच्या निर्णयावर परिणाम झाला.

आत्मसमर्पण करणाऱ्या माओवाद्यांना एकूण १.४० कोटी रुपयांचे रोख बक्षीस आहे, ज्यामध्ये सांबैया आणि नारायण यांच्यासाठी प्रत्येकी २० लाख रुपये आहेत. डीजीपींनी सर्व सीपीआय (माओवादी) कार्यकर्त्यांना पुढे येऊन मुख्य प्रवाहात सामील होण्याचे आवाहन केले.

## आयएसआयशी संबंधित शस्त्र तस्करी टोळीचा पर्दाफाश

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २३ :

दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयशी संबंधित आंतरराष्ट्रीय शस्त्र तस्करी नेटवर्कचा पदार्फाश केला. पोलिसांनी चार तस्करांना अटक करत १० परदेशी बनावटीची पिस्तुले आणि ९२ काडतुसे जप्त केली. यात ३ तुर्की बनावटीचे पीएक्स-५.७ पिस्तूल, पाच चिनी बनावटीचे पीएक्स-३ पिस्तुलांचा समावेश आहे. ही पिस्तुले विशेष दलांद्वारे वापरल्या जाणाऱ्या उच्च दर्जाचे मॉडेल आहेत.

हे नेटवर्क उत्तर भारतातील अनेक कुख्यात टोळ्यांना प्रगत शस्त्रे पुरवतात. हे मॉड्यूल ड्रोनद्वारे पाकिस्तानमधून भारतात शस्त्रे पोहोचवत असे. कस्टमाइज्ड ड्रोन रात्री पंजाब सीमेवरील संवेदनशील भागात कमी उंचीवर उडत जीपीएस स्थानांवर पॅकेजेस टाकत. स्कॅनिंगपासून बचावासाठी पॅकेजेस कार्बन-लेपित मटेरियलमध्ये गुंडाळलेले होते. स्थानिक रिसीव्हर्स पॅकेजेस उचलत. तेथून ते दिल्ली, हरियाणा, उत्तर प्रदेश व पंजाबमधील टोळ्यांना पुरवले जात होत कर्नाटकातील उडुपी पोलिसांनी कोचीन शिपयार्डशी संबंधित संवेदनशील माहिती पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयला दिल्याच्या आरोपाखाली रोहित (२९) आणि संत्री (३७) यांना अटक केली आहे. ते उत्तर प्रदेशातील सुलतानपूरचे रहिवासी आहेत.

## भारताला आफ्रिकीचे ४८९ रनचे आव्हान

■ वृत्तसंस्था, गुवाहाटी, दि. २३

भारताविरुद्धच्या गुवाहाटी कसोटीच्या पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेचा संघ ४८९ धावांवर ऑल आऊट झाला. दुसऱ्या दिवसाच्या खेळाअखेर भारताने बिनबाद ९ धावा केल्या होत्या. यशस्वी जयस्वाल आणि केएल राहुल नाबाद राहिले. शनिवारी बारसापारा स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. सेनुरन मुथुस्वामीने १०९ आणि मार्को जॅन्सेनने ९३ धावा केल्या.

## नैनीतालमध्ये कार ६० मीटर खोल दरीत कोसळली

■ वृत्तसंस्था, नैनीताल, दि. २३ :

तीन शिक्षकांचा मृत्यू

उत्तराखंडमधील नैनीताल जिल्ह्यातील कैंची धामजवळ अपघात झाला. ६० मीटर खोल दरीत वाहन कोसळल्याने तीन जणांचा मृत्यू झाला. एक व्यक्ती गंभीर जखमी झाली असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच एसडीआरएफने बचाव कार्य सुरू केले. वृत्तानुसार, प्रवासी लग्नात सहभागी होण्यासाठी जात असताना वाहनाचे नियंत्रण सुटले आणि ते दरीत पडले. सर्व मृत अल्मोडा येथील रहिवासी होते. अल्मोडा-हल्द्वानी महामार्गावरील खैरनाजवळील रतीघाट येथे एक कार खोल दरीत पडली. तीन शिक्षकांचा जागीच मृत्यू झाला, तर एक गंभीर जखमी झाला. सर्व शिक्षक हल्द्वानी येथे एका लग्नाला उपस्थित राहण्यासाठी जात होते. खैरना पोलिस स्टेशन आणि एसडीआरएफ टीम तात्काळ घटनास्थळी पोहोचली. एसडीआरएफ टीमने जखमी आणि मृतांना बाहेर काढले.

## पंकजा मुंडेंच्या स्वीय सहाय्यकाच्या पत्नीची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :



भाजपच्या नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे यांचे स्वीय सहाय्यक अनंत गर्जे यांच्या पत्नी डॉ. गौरी पालवे-गर्जे यांनी वरळीतील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अवघ्या १० महिन्यांपूर्वीच, ७ फेब्रुवारी रोजी अनंत गर्जे आणि डॉ. गौरी यांचा मोठ्या थाटामाटात विवाह झाला होता.

प्राथमिक माहितीनुसार, काल (शनिवारी, २२ नोव्हेंबर) सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास डॉ. गौरी गर्जे यांनी वरळीतील बीडीडी चाळीतील त्यांच्या घरी गळफास घेऊन आपले जीवन संपवले. त्या केईएम रुग्णालयाच्या दंतचिकित्सा (डेंटिस्ट) विभागात कार्यरत होत्या. या घटनेनंतर पंकजा मुंडे यांनी आपले बीडमधील पूर्वनियोजित सर्व कार्यक्रम रद्द केल्याची माहिती आहे. वरळी पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी केईएम रुग्णालयात पाठवला असून, प्राथमिक माहितीनुसार कौटुंबिक वादातून हे पाऊल उचलल्याचे समोर आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना पंकजा मुंडेंच्या पीएच्या पत्नीने आत्महत्या केली आहे, त्यांच्या कुटुंबीयांनी तुमच्याकडे सीबीआयची मागणी केली या प्रश्नावर बोलताना फडणवीस म्हणाले, अजून माज्याकडे यासंदभार्तील पूर्ण ब्रिफिंग आलेलं नाही. मला प्राथमिक माहिती मिळाली आहे. एकदा पोलिसांनी पूर्ण ब्रिफिंग केल्यावरच याबाबत बोलता येईल, असं फडणवीसांनी म्हटलं आहे.

आत्महत्या करणाऱ्या डॉ. गौरी यांच्या कुटुंबियांनी मात्र या प्रकरणाला वेगळी दिशा दिली आहे. त्यांच्या मामाने टीव्ही ९ वृत्तवाहिनीला माहिती देताना सांगितले की, अनंत गर्जे यांचे बाहेर अफेअर होते.

यावरून दोघांमध्ये सतत भांडणे होत होती आणि याबद्दल गौरीने आपल्या वडिलांना माहिती दिली होती, तसेच चॅटिंगचे काही स्क्रीनशॉट ही पाठवले होते. काल गौरीने आत्महत्या केली, काल दोघांमध्ये मोठे भांडण झाले होते आणि भांडणादरम्यान तिने स्वतःला संपवले, अशी माहिती अनंत गर्जेने दिली. महत्त्वाचे म्हणजे, गौरी स्वतःला संपवत असताना अनंत गर्जे घरात उपस्थित होता आणि तोच तिला दवाखान्यात घेऊन गेला होता, असेही कुटुंबियांनी सांगितले. डॉ. गौरी यांच्या मामांनी पुढे सांगितले की, त्यांच्या मुलीचा (गौरीचा) सासरच्या मंडळींकडून छळ होत होता.

आपली मुलगी गमावल्यामुळे दुःखी असलेले कुटुंबीय बीडवरून मुंबईत दाखल झाले असून, त्यांनी आपल्या मुलीला न्याय मिळावा, अशी मागणी केली आहे. वरळी पोलिसांनी या गंभीर आरोपांची नोंद घेतली असून, मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवून कुटुंबीयांची कसून चौकशी सुरू केली आहे.

## भारताने पहिला ब्लाइंड महिला टी-२० विश्वचषक जिंकला



■ वृत्तसंस्था, कोलंबो, दि. २३ :

भारताने पहिला ब्लाइंड महिला टी-२० विश्वचषक जिंकला. रविवारी कोलंबो येथे झालेल्या अंतिम सामन्यात संघाने नेपाळला सात विकेट्सने हरवले. तर उपांत्य फेरीत भारताने ऑस्ट्रेलियाला नऊ विकेट्सने हरवले होते. भारतीय महिला संघ विजय साजरा करत आहे. भारतीय महिला संघ विजय साजरा करत आहे. नेपाळला फक्त एकच चौकार मारण्याची परवानगी होती. पी. सारा ओव्हल स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात भारत महिला संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला.

# मतदार यादीतील त्रुटी २७ नोव्हेंबरपर्यंत कळवा

## भाजप-काँग्रेस कार्यकर्ते भिडले



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :

भाजपचे मंबई अध्यक्ष व अंधेरी पश्चिमचे आमदार अमित साटम यांच्या अंधेरीमधील पक्ष कार्यालयाबाहेर युवक काँग्रेस कार्यकर्त्यांनी शनिवारी जोरदार आंदोलन केले. यावेळी भाजप आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने आले होते, मात्र पोलीसांनी दोन्ही गटाला थोपवून धरल्याने राडा होता होता राहिला.

भाजपचे मुंबई अध्यक्ष व आमदार अमित साटम यांनी शुक्रवारी काँग्रेसचे आमदार अस्लम शेख यांच्यावर जोरदार टीका केली होती. आपल्या सारख्या पाकिस्तानच्या औलादींना आम्ही भीक घालत नाही. तुम्ही मालाडमध्ये ज्याप्रकारे मालवणी पॅटर्न चालवेला आहे, तो उखडून फेकल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाहीत. येणाऱ्या काळात तुमच्यासारखी हिरवी पिलावळ या मुंबईत गाडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा आमदार साटम यांनी दिला होता.

आमदार साटम यांच्या टीकेनंतर काँग्रेसचे कार्यकर्ते आक्रमक झाले. शनिवारी सायंकाळी काँग्रेस कार्यकर्ते साटम यांच्या अंधेरी पश्चिम येथील कार्यालयाबाहेर जमा झाले आणि घोषणा देऊ लागले. पोलिसांनी बॅरीकेटेड लावून बंदोबस्त ठेवला होता. काँग्रेस कार्यकर्ते आंदोलनासाठी आल्यानंतर भाजपचे कार्यकर्तेदेखील धावून आले. पोलिसांनी कार्यकर्त्यांची धरपकड केली आणि आंदोलकांना पांगवले.

आंदोलनानंतर आमदार अस्लम शेख म्हणाले की, मी कोणालाही धमकी दिलेली नाही. मंत्री लोढा हे धांदात खोटे आरोप करत आहेत. भाजपला धर्माच्या नावावर मुंबई महापालिकेची निवडणूक लढवायची आहे. अमित साटम ही अत्यंत उद्धट व्यक्ती आहे. साटम यांना पक्षाचा मुंबई अध्यक्ष करुन भाजपने चूक केल्याचे दिसते आहे.

काँग्रेस आमदार व माजी मंत्री अस्लम शेख यांच्या मालाड पश्चिम मतदारसंघात मुंबई महापालिकेची अतिक्रमणविरोधी कारवाई सुरु आहे. रोहिंग्ये आणि बांग्लादेशी घुसखोरांविरोधातली ही कायवाई असल्याचे भाजपचे म्हणणे आहे. मुंबई उपनगरचे सहपालकमंत्री व राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या आदेशाने ही अतिक्रमण विरोधी कारवाई होत असल्याचा आमदार शेख यांचा आरोप आहे.

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :




राज्यातील 29 महानगरपालिकांच्या आगामी निवडणुकांसाठी मतदार यादीची प्रक्रिया वेगाने सुरू असून, संबंधित मतदारांनी आपल्या नावाविषयी काही हरकती किंवा तक्रारी असल्यास त्या 27 नोव्हेंबर 2025 पर्यंत महानगरपालिका आयुक्तांकडे लेखी स्वरूपात दाखल कराव्यात, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाने केले आहे. प्रभागनिहाय मतदार याद्यांचे विभाजन हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, त्यामध्ये होऊ शकणाऱ्या चुका त्वरित दुरुस्त करण्यासाठी आयोगाने जनजागृती सुरू केली आहे. या प्रक्रियेचा थेट संबंध निवडणूक व्यवस्थेच्या पारदर्शकतेशी असल्याने नागरिकांनी विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

महानगरपालिका निवडणुकांसाठी 1 जुलै 2025 हा अधिसूचित दिनांक निश्चित करण्यात आला आहे. त्या दिवशी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार याद्याच महानगरपालिका निवडणुकांसाठी मूळ आधार मानल्या जाणार आहेत. या याद्या भारत निवडणूक आयोगाने तयार केल्या असून, त्यांचे प्रभागनिहाय विभाजन स्थानिक महानगरपालिका आयुक्तांच्या देखरेखीखाली करण्यात आले आहे. प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या 20 नोव्हेंबर 2025 रोजी सार्वजनिक करण्यात आल्या असून, प्रत्येक प्रभागातील मतदार आपले नाव ऑनलाईन तपासू शकतात. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, प्रभागनिहाय मतदार याद्यांमध्ये नवीन नावे समाविष्ट करणे, नावे वगळणे किंवा मतदारांचे पत्ते दुरुस्त करणे यासारखी कार्यवाही या टप्प्यात केली जात नाही. हे काम केवळ भारत निवडणूक आयोगाच्या नियमित अद्ययावत प्रक्रियेतच केले जाते.

### राज्य निवडणूक आयोगाची सूचना

महानगरपालिका स्तरावर केवळ विधानसभेच्या याद्यांवर आधारित प्रभागनिहाय विभागणी केली जाते. त्यामुळे नागरिकांनी या प्रक्रियेतील मर्यादा समजून घेत हरकती केवळ प्रभागनिहाय विभागणीतील चुका किंवा चुकीच्या नावांच्या स्थानांतरांसंदर्भातच कराव्यात, असे आयोगाचे स्पष्ट निर्देश आहेत.


अनेकदा लेखनिकांकडून झालेल्या तांत्रिक किंवा टायपिंगच्या चुकांमुळे मतदाराचे नाव चुकीच्या प्रभागात दिसणे, विधानसभेच्या यादीत असूनही प्रभागात न दिसणे किंवा घर क्रमांकाच्या आधारे प्रभाग बदलण्यात गफलत होणे असे प्रकार आढळून येतात. अशा स्वरूपाच्या चुकांबाबत संबंधित महानगरपालिकेत हरकती आणि सूचना दाखल करता येतील. आयोगाने यासाठी स्वतंत्र काऊंटर व अधिकारी नेमण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांनी वेळेत तक्रार केल्यास निवडणूकपूर्व काळात याबाबत आवश्यक दुरुस्ती केली जाईल.

मतदार यादी ही निवडणूक प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाची कडी मानली जाते आणि त्यात नाव नसल्यास नागरिकांना मतदानाचा हक्क बजावणे अशक्य होते. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने नागरिकांना आवाहन केले आहे की, प्रत्येक मतदाराने स्वतःचे नाव, पत्ता आणि प्रभाग तपासावा. काही विसंगती आढळल्यास 27 नोव्हेंबरपूर्वी महानगरपालिकेत हरकत दाखल करावी. आयोगाने माहिती मिळवण्यासाठी ऑनलाईन सेवा, हेल्पलाइन तसेच संबंधित कार्यालयांमध्ये सुविधा उपलब्ध करून दिल्या असून, मतदारांनी सक्रियपणे सहभाग घेणे ही लोकशाही बळकट करण्यासाठी आवश्यक बाब असल्याचा संदेशही आयोगाने दिला आहे.

## भाजप-संघाकडून भाषा व प्रांतवादाचे विष

### शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :



भाषेच्या आग्रहावरून समाजात दुही निर्माण करण्याचे आरोप दोन्ही ठाकरे बंधूंवर करत भाजपने शनिवारी शिवाजी पार्कमध्ये बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्तंभाजवळ आंदोलन केले. तर भाषावाद नि प्रांतवादाचे राजकारण भाजपकडून होते नि खापर मात्र आमच्यावर फोडले जाते असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला.

कल्याणमधील अर्णव खैरे याच्या दुर्दैवी आत्महत्येचे राजकारण यानिमित्ताने राजकीय पक्षांनी सुरू केलेले दिसते. तर त्रिभाषा सूत्रावरून वादाच्या केंद्रस्थानी आलेल्या हिंदीला अभ्यासक्रमात तिसरी भाषा म्हणून स्वीकारण्याचे आवाहन पालकांना करण्याचा मनोदय पुण्यात भाजपच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनी जाहीर केला. त्यावरूनही वाद निर्माण होण्याची चिन्हे आहेत.

भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून भाषा व प्रांतवाद पेटविला जात असून खापर मात्र आमच्यावर फोडत असल्याचा आरोप शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी येथे केला. कल्याण येथील अर्णव खैरेच्या आत्महत्येनंतर भाजपकडून शनिवारी दादर येथे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्थळाजवळ आंदोलन करण्यात आले. त्यावरून ठाकरे यांनी भाजपवर टीकास्त्र सोडले. भाषेसाठी कोणी कोणाचा खून करावा, मारामारी करावी, ही परिस्थितीच भयावह आहे.

भाजप व संघाकडून कपट-कारस्थान करून भाषा व प्रांतवादाचे विष पसरविले जात आहे. संघाचे माजी सरकार्यवाह भैयाजी जोशी यांनी घाटकोपरमध्ये येथील भाषा गुजराती असल्याचे वक्तव्य केले होते. तोडा, फोडा आणि राज्य करा, हे भाजप व संघाचे उद्दिष्ट आहे. आपण भूमिपुत्रांनी एकत्र राहायला हवे, असे आवाहन ठाकरे यांनी केले.

## अनंत गर्जेसह तिघांवर 'आत्महत्येला प्रवृत्त' केल्याचा गुन्हा दाखल करा : अंजली दमानिया

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :



मंत्री पंकजा मुंडे यांचे पीए अनंत गर्जे यांच्या पत्नी डॉक्टर गौरी पालवे गर्जे यांनी आत्महत्या केली. डॉ. गौरी पालवे-गर्जे यांनी आत्महत्येप्रकरणी आता विविध आरोप प्रत्यारोप केले जात आहेत. गौरीच्या कुटुंबियांनी ही आत्महत्या नाही तर हत्याच असल्याचा दावा केला आहे. डॉ. गौरी पालवे-गर्जे यांनी आत्महत्येनंतर आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आक्रमक झाल्या आहेत. त्यांनी गौरीच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेत गर्जे कुटुंबीयांवर गंभीर आरोप केले आहेत.

अंजली दमानिया म्हणाल्या की, डॉक्टर गौरी पालवे गर्जे या आत्महत्या करण्यासारख्या नव्हत्या. तिच्या आई-वडिलांची परिस्थिती काय आहे त्यांना जेव्हा मुलीच्या आत्महत्येविषयी कळाले तेव्हा ते एका लग्नात होते.ते पूर्ण रात्र प्रवास करत वरळी पोलिस ठाण्यात आले. त्यांना रुग्णालयात अशा अवस्थेत मुलीली पहावे लागले. यावर काय बोलावे मला कळत नाही. एफआयआर करायला वेळ लागला

अंजली दमानिया म्हणाल्या की, पोलिस स्टेशनमध्ये एफआयआर करायला वेळ लागला कारण त्यात तिने आत्महत्या केल्याचे म्हटले होते. पण तिच्या वडीलांनी तिने आत्महत्या केली की तिचा घातपात झाला हे आम्हाला माहिती नाही. पोलिसांनी तसे करत आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जर पोस्टमार्टममध्ये जर हत्या केल्याचे समोर आले तर पोलिस 302 चा गुन्हा दाखल करणार आहेत.

## विलंब झाल्यास अधिकाऱ्यांचे होणार निलंबन



**पुणे :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बस उशिराने आल्याने शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास आता एसटीचे आगार व्यवस्थापक आणि पर्यवेक्षकांवर कारवाई होणार आहे. विद्यार्थ्यांचे नुकसान झालेल्या दिवसांएवढे दिवस संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित किंवा सक्तीच्या रजेवर पाठविण्यात येणार आहे. राज्याचे परिवहन मंत्री, एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी हा आदेश दिला आहे. सरनाईक यांनी एसटीच्या महाव्यवस्थापकांना (वाहतूक विभाग) याबाबतच्या सूचना शनिवारी दिल्या. सरनाईक शनिवारी धाराशिव दौऱ्यावर असून त्यांनी शहरातील मध्यवर्ती बस स्थानकाला भेट देऊन शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्या वेळी विद्यार्थ्यांनी त्यांच्या समस्या मांडल्या. या पार्श्वभूमीवर सरनाईक म्हणाले, राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागाकडून दुर्गम भागात विद्यार्थिनींसाठी विशेष मानव विकास बस सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच ग्रामीण भागातील शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विशेष पासद्वारे सेवा देण्यात येते. मात्र, बस वेळेवर न सुटणे, गर्दीमुळे थांब्यावर न थांबणे, फेरी अचानक रद्द होणे, तांत्रिक बिघाड आदी कारणांमुळे विद्यार्थ्यांना शाळा वा महाविद्यालयात पोहोचण्यास विलंब होतो. काही वेळा परीक्षेला उशीर झाल्याने शैक्षणिक नुकसान होते. सुटल्यानंतर घरी पोहोचण्यास विलंब झाल्याने पालक चिंतेत पडतात. काही प्रकरणांत विद्यार्थिनींनी टोकाचे पाऊल उचलल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

## टीईटी परीक्षा देत असताना कोल्हापुरात पेपरफोडीचा प्रयत्न उघड

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :

राज्यात शिक्षक पात्रता परीक्षा सुरू असताना कोल्हापूर जिल्ह्यात मोठी धक्कादायक घटना उघड झाली आहे. पेपरफोडीचा मोठा कट रचणाऱ्या टोळीचा मुरगुड पोलिस व स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने पदार्फाश केला आहे. या कारवाईत नऊ जणांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून महत्त्वाच्या सुचना व पुरावे मिळाल्याची माहिती पोलिसांनी दिली. राज्यभरात लाखो विद्यार्थी टीईटी परीक्षा देत असताना कोल्हापुरात पेपरफोडीचा प्रयत्न उघड झाल्याने शिक्षण विभागातही खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, या कटात काही शिक्षक परीक्षार्थीही सामील असल्याचे तपासात समोर आले आहे.

ताब्यात घेतलेले आरोपी कागल तालुक्यातील सोनगे परिसरातून पकडण्यात आले. त्यात कागल आणि राधानगरी तालुक्यातील तरुणांचा समावेश असून त्यांचे आपापसांत विस्तृत जाळे असल्याचा संशय वर्तवला जात आहे. पोलिसांनी काल रात्रीपासून सलग कारवाई करत या प्रकरणाचा तपास सुरू ठेवला असून संशयितांची संख्या अजून वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकारामुळे आज घेतली जाणारी टीईटी परीक्षा सुरक्षेच्या दृष्टीने आणखी महत्त्वाची बनली आहे. सध्या तपास पथक आरोपींचे मोबाईल, चॅट, संपर्क आणि आर्थिक व्यवहार तपासत असून हे रॅकेट राज्यभर पसरले आहे का? याचाही शोध घेतला जात आहे.

दरम्यान, टीईटी परीक्षेसाठी यंदा मराठी माध्यमातील उमेदवारांची संख्या सर्वाधिक आहे. मराठी माध्यमातून तीन लाख 27 हजार 135 उमेदवारांनी परीक्षा दिली आहे. इंग्लिश माध्यमातून 28 हजार 437, उर्दू माध्यमातून 25 हजार 935 आणि हिंदी माध्यमातून 92 हजार 420 उमेदवार परीक्षा देत आहेत.

बंगाली, कन्नड, तेलुगू, गुजराथी आणि सिंधी माध्यमातूनही काही प्रमाणात नोंदणी करण्यात आली आहे. राज्यभरातून 5283 दिव्यांग उमेदवारांनी परीक्षेला सामील होण्यासाठी अर्ज केला असून 411 दिव्यांगांना लेखनिक पुरवण्यात आला आहे. तसेच 45 माजी सैनिकही परीक्षा देत आहेत.

## रत्नागिरी जिल्ह्यातील ९१ उमेदवारांचे अर्ज मागे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड, दापोली,चिपळूण, रत्नागिरी व राजापूर या नगरपालिकांची निवडणूक महायुती व महाविकास आघाडी कडून प्रतिष्ठेच्या करण्यात आल्या आहे. जिल्ह्यातील या महत्वाच्या नगर पालिकांसाठी महायुतीने रान उठविले आहे. अपक्षांना थांबविण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत अपक्ष उमेदवारांच्या घरात जावू त्यांना स्वीकृत नगरसेवकांचे आमिष दाखवून शांत केल्याची चर्चा आता राजकीय वतुर्ळात रंगू लागली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात महायुतीच्या मंत्र्यांनी जिल्ह्यात ठाण मांडले आहे. या निवडणुका दोन्ही बाजूने प्रतिष्ठेच्या करण्यात आल्याने जिल्ह्यात होत असलेल्या या निवडणुकांना वेगळाच रंग चढला आहे. सत्तेसाठी महायुतीच्या मंत्र्यांनी अपक्ष उमेदवारांच्या घरचे उंबरठे झिजवुन अपक्षांना शांत करुन महायुतीच्या बाजूने करुन घेतले आहे. यामुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर असलेल्या अपक्ष उमेदवारांनी आपली उपसलेली तलवार पुन्हा म्यानात घातली आहे. यातील काही अपक्षांना स्वीकृत नगरसेवकाचे आमीष दाखवून शांत केले गेल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरु आहे.

रत्नागिरी नगरपरिषदेतील १६ प्रभागांतील ३२ जागांसाठी १३२ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. गुरुवारी चार आणि शुक्रवारी या अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी आणखी १५ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले.

यामध्ये १४ अपक्ष उमेदवारांसह एका ठाकरे यांच्या शिवसेना उमेदवाराचा समावेश आहे. यामध्ये हीना बावानी, श्रेया शिंदे, रफिक मुकादम, कल्पना मसूरकर, श्रीकृष्ण तळेकर, करण नागवेकर, विभव पटवर्धन, अभिलाष पिलणकर, सोमनाथ पिलणकर, प्राजक्ता रूमडे, श्वेता कोरेगांवकर, नितीन माईण, प्रणाली रायकर आणि कामना बेग या उमेदवारांचा समावेश आहे. उमेदवारी अर्ज माघारीनंतरचे रत्नागिरी नगरपालिका निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. ही निवडणूक अधिक चुरशीची आणि राजकीय समीकरणे बदलणारी ठरणार असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगू लागली आहे.

## पहिली केस अंगावर घेण्याचं बळ मनसैनिकांनी दिले : अमित ठाकरे



**मुंबई :** नवी मुंबईत नेरूळ येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या अनावरण प्रकरणामुळे निर्माण झालेल्या गदारोळानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे यांनी सोमवारी स्वतः पोलिस स्टेशनात जाण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या आठवड्यात स्मारकाचे अनावरण त्यांनी स्वतः केल्यानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणामुळे निर्माण झालेल्या चचेर्ला आज नवी मुंबईत पुन्हा उधाण येणार असून मनसेकडून मोठ्या प्रमाणात शक्तीप्रदर्शनाचे संकेत मिळत आहेत. या सर्व घडामोडींमध्ये अमित ठाकरे यांनी मनसैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत, पहिली केस अंगावर घेण्याचं बळ तुम्ही दिले, असे भावनिक वक्तव्य केले आहे. नेरूळ शिवस्मारकाचे अनावरण न झाल्याने स्थानिकांमध्ये नाराजी होती. हा विषय अमित ठाकरे यांच्या नजरेस पडताच त्यांनी तातडीने पुतळ्यावरचे कापड दूर केले. या कृतीदरम्यान काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले आणि पोलिस व मनसे कार्यकर्त्यांमध्ये किरकोळ धक्काबुककी झाल्याची माहिती पुढे आली. या कृत्यासाठी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. यानंतर रविवारी नवी मुंबई पोलिस त्यांना नोटीस देण्यासाठी शिवतीर्थ येथे पोहोचले होते. मात्र, मी स्वतः पोलिस स्टेशनात आलो असतो, तुम्ही उगाच त्रास घेतला, असे म्हणत अमित यांनी नोटीस स्वीकारण्यास नकार दिला. आज ते स्वतः नेरूळ पोलिस स्टेशनात उपस्थित राहणार आहेत. अमित ठाकरे यांच्या या उपस्थिती दरम्यान मनसेकडून मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि पदाधिकारी जमणार आहेत. यात मनसेचे नेते बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, संदीप देशपांडे, यशवंत किल्लेदार आणि मुंबईतील विभागप्रमुखही सहभागी होणार असल्याची माहिती आहे. सकाळी अकराच्या सुमारास ते शिवतीर्थ येथून निघाले आणि वाशी टोल नाक्यावर मनसैनिक त्यांचे स्वागत केले. त्यानंतर रॅलीच्या माध्यमातून त्यांनी नेरूळ पोलिस स्थानकाकडे प्रस्थान केले.

## वाहनावरील नियंत्रण सुटल्याने दोघांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, शहापूर, दि. २३ :

मुंबई नाशिक महामार्गावरील आटगाव भागात हळदीच्या समारंभातून घरी परतत असताना वाहनावरील नियंत्रण सुटल्याने दोघांचा मृत्यू तर एकजण जखमी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. मयुरेश चौधरी (२७), जयेश शेंडे (२५) अशी मृतांची नावे असून या घटनेमुळे शहापूरात शोककळा पसरली आहे.

शहापूर येथील मयुरेश चौधरी, जयेश शेंडे आणि हर्षल जाधव हे तिघे तरुण पेंढरघोळ येथे हळदी समारंभासाठी गेले होते. रविवारी सकाळी ते मोटारीने पेंढरघोळ येथून नाशिक-मुंबई महामार्गावरून शहापूरच्या दिशेने निघाले होते. ते आटगाव जवळील संघवी कॉम्प्लेक्स परिसरात आले असता, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने त्यांची मोटार येथील एका कठड्याला धडकली. हा अपघात इतका भीषण होता की मोटारीचा अक्षरशः चुराडा झाला.

तिघांना शहापुर उपजिल्हारुग्णालयात दाखल केले असता मयुरेश चौधरी आणि जयेश शेंडे या



दोघांना डॉक्टरांनी मृत घोषित केले तर जखमी झालेला चालक हर्षल जाधव याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास शहापुरचे पोलीस उपनिरीक्षक मनोज मसलेकर करीत आहेत.

## उर्मटी गावात गावठी पिस्तुलांचे ५० अवैध कारखाने उद्ध्वस्त

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २३ :

पुणे पोलिसांनी शनिवारी मध्य प्रदेशातील उर्मटी गावात छापे मारत आंतरराज्यीय अवैध शस्त्र पुरवठा करणारे ५० कारखाने उद्ध्वस्त केले. गत काही दिवसांत गुन्हेगारांकडे सापडलेल्या शस्त्रांवर यूएसए असा शिक्का होता. याचा खोलवर तपास केला असता उर्मटी येथील अवैध शस्त्र कारखान्याची माहिती मिळाली आणि पोलिसांनी ऑपरेशन उमर्टी राबवले. या गावातूनच महाराष्ट्र व इतर राज्यात दलालांमार्फत बेकायदा शस्त्र पुरवठा होतो. ही शस्त्रे जळगाव, धुळेमार्गे महाराष्ट्रात दुचाकी किंवा चारचाकीतून आणली जातात.

पुणे शहरात गत २ वर्षांत गुन्हेगारीसाठी वापरलेली बहुतांश शस्त्रे (गावठी कट्टे) मेक इन यूएसए म्हणजेच उर्मटी शिकलगार आर्म्स येथे तयार झालेली असल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी तब्बल तीन आठवडे तयारी करुन या गावात छापा टाकला. छाप्यावेळी गावाने एकत्र येऊन पोलीस पथकाला विरोध केला होता. कारवाईत ३६ संशयितांना ताब्यात घेतले. जवळपास ५० कारखाने नष्ट करण्यात आले. शिवाय २१ पिस्तुलांसह शस्त्र निर्मितीसाठीचा साहित्यही जप्त केले.

उमरठी गाव गेल्या दोन तीन दशकांपासून अवैध शस्त्रनिर्मितीसाठी चर्चेत आहे. येथे विशिष्ट प्रकारचे बॅरल, पाईप, मॅगझीन स्प्रींग आदी साहित्य विविध ठिकाणावरुन गोळा करुन मागणीनुसार शस्त्र निर्मिती केली जाते. लेथ मशीनवर तसेच हाताने घासून परंपरागत शस्त्र बनवली जातात. ऑर्डर मिळताच ५ ते ६ तासात शस्त्र तयार होऊन १५ ते २० हजार रुपयांत ती केवळ ओळखीच्या व्यक्तींला दिले जात होते.

## भावंडांचा शेततळ्यात बुडून मृत्यू

**पुणे:** जुन्नरमध्ये शेततळ्यात बुडून दोन सख्ख्या भावंडांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. मृतांमध्ये आफान अफसर इनामदार (१०) आणि रिफत अफसर इनामदार (७) या भाऊ- बहिणीचा समावेश आहे. ही हृदयद्रावक घटना जुन्नर शहरातील ईदगाह मैदानाजवळील शेततळ्यात घडली. घटनेनंतर इनामदार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. शनिवारी दुपारी सुमारे चार वाजता आफान आणि रिफत हे दोघे खेळायला घराबाहेर पडले होते. त्यानंतर ते घरी परतले नाहीत. बराच वेळ झाला तरी दोघांचा थांगपत्ता न लागल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली. दरम्यान, या परिसरात बिबट्याचा वावर असल्याने वन विभागाचे पथक, पोलीस आणि ड्रोन टीम यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शोधमोहीम हाती घेण्यात आली. शोधादरम्यान शेततळ्याच्या काठावर मुलांचे बूट आणि चप्पल आढळून आली. त्यानंतर पाण्यात शोध सुरू करण्यात आला. रेस्क्यू टीमच्या मदतीने दोन्ही भावंडांना शेततळ्यातून बाहेर काढण्यात आले. लगेच रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी दोघांनाही मृत घोषित केले. काही महिन्यांपूर्वी मुलांचे वडील नोकरीनिमित्त दुबईला गेलेले आहेत.

## स्पा सेंटरवर पोलिसांचा छापा ८ तरुणींची सुटका

■ महासागर प्रतिनिधी,
पिंपरी-चिंचवड, दि. २३ :

आयटी हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंजवडी, रावेत आणि आळंदी फाटा परिसरातील स्पा सेंटरवर पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने कारवाई करत आठ महिलांची सुटका केली आहे. आळंदी फाटा येथील सप्तगिरी लॉजमध्ये पाच महिलांकडून बळजबरीने वेश्याव्यवसाय करवून घेतला जात असल्याची माहिती पथकाला प्राप्त झाली होती, त्यानुसार पथकाने लॉजवर छापा टाकत संबंधित पाच महिलांची सुटका केली. या प्रकरणी लॉज मालक गजानन सटवाजी आव्हाड याच्यावर पिटा अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

## मालकासारखे बोलू नका : नाना पटोलेंची टीका

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २३ :



नळदुर्ग नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी केलेल्या वक्तव्यावरून राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. प्रचार सभेत बोलताना अजित पवार यांनी, राज्याची तिजोरी माझ्या हातात आहे, घड्याळाच्या पाठीशी उभं राहिलात तर बारामती सारखा विकास तुमच्याकडे करील, असे विधान केले होते. या विधानाने विरोधकांनी सरकारवर थेट पक्ष निष्ठेच्या आधारे विकासाचे आश्वासन देत असल्याचा आरोप केला आहे. अजित पवारांच्या वक्तव्याची चर्चा संपूर्ण राज्यात होत असतानाच, काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी या वक्तव्यावर कडक शब्दांत टीका केली.

नाना पटोले म्हणाले की, राज्याची तिजोरी एखाद्या व्यक्तीची संपत्ती नसून संपूर्ण जनतेचा निधी आहे. संविधानाने कोणत्याही मंत्र्याला तिजोरी लुटण्याचा किंवा तिजोरीचा वापर पक्षीय स्वार्थासाठी करण्याचा अधिकार दिलेला नाही. विकासाच्या नावाने मतं मागण्याऐवजी सत्ता आणि पैशांची भाषा करणं म्हणजे जनतेचा अपमान असल्याचे पटोले म्हणाले. ते पुढे म्हणाले की, एकीकडे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री स्वतःच्या अधिकारांची मिरवणूक करत फिरतात आणि दुसरीकडे सत्ताधारी पक्ष आपली ताकद दाखवत जनतेसमोर गर्विष्ठपणे बोलतो. महाराष्ट्राच्या तिजोरीचे तुकडे करून टाकले आहेत का? अशीच भाषा या लोकांकडून ऐकायला येते, असा कडवा सवाल पटोले यांनी उपस्थित केला.

काँग्रेस नेते पुढे म्हणाले की, लोकांनी निवडून दिल्याचा अर्थ नेता मालक झाला असा होत नाही. सत्तेत बसलेले लोक हे पाच वर्षांसाठी जनतेचे सेवक आहेत, हे समजून घेणे आवश्यक आहे. पटोले यांचा आरोप असा की, सत्तेचा माज आणि गर्व इतका वाढला आहे की सत्ताधारी जनता सर्व सहन करेल, हे त्यांना गृहित धरलं आहे.

# तेल्हारा नगर परिषदमध्ये पंचरंगी लढत

**तेल्हारा :** तेल्हारा नगरपरिषद निवडणुकीसाठी नगराध्यक्ष पदासाठी पंचरंगी लढत होणार आहे. तर नगरसेवक पदासाठी अपक्ष डोकेदुखी ठरत आहेत. नगराध्यक्ष पदासाठी राजकन्या मधुकर पवार (अजित पवार गट ) भारतीय जनता पक्षाकडून वैशाली जितेंद्र पालीवाल, वंचित बहुजन पक्षाकडून विद्या सिद्धार्थ शामस्कार, शिवसेना शिंदे गटाकडून दीपा महेश सिसोदिया, शिवसेना (उद्धव ठाकरे गट ) गटाकडून शिवानी सचिन थाटे यांच्यामध्ये सरळ सरळ लढतीची चिन्ह दिसत असले तरी शेवटच्या टप्प्यात कोण भाजी मारणार हे सांगता येत नाही . गत दोन निवडणुकी निकाल पाहता भारतीय जनता पक्षाने तेल्हारा नगरपरिषदेवर स्थानिक आघाडी सोबत घेऊन आपली सत्ता काबीज केली. यावेळी मात्र भारतीय जनता पक्ष कमळ चिन्हावर नगराध्यक्ष सह वीस नगरसेवक उभे केले आहेत. वंचित बहुजन आघाडी सोबत स्थानिक शेतकरी पॅनल आघाडी आहे. तर शिवसेना उभाटा काँग्रेस पक्ष जयसिंग बलोदे यांच्या नगरसेवक समितीने गटबंधन केले आहे. राष्ट्रवादी अजित पवार गट शिंदे शिवसेना गट यांनी सुद्धा नगराध्यक्ष व सदस्य पदाकरिता उमेदवार उभे केले एकंदर सर्वच पक्ष व आघाड्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवसापासून प्रचाराचा जोर वाढला असून आपल्या अस्तित्वाची लढाई लढण्यास सज्ज झाले आहेत.

# मूर्तिजापूर पोलिसांची सोशल मीडियावर धडक मोहीम
## आक्षेपार्ह पोस्ट टाकली तर थेट गुन्हा!
### निवडणूक काळात 'फॉरवर्ड'लाही किंमत–नागरिकांना इशारा

**▪मुर्तिजापुर,दि २३ (प्रतिनिधी) :**
नगरपालिका निवडणुकीचे ढोल वाजू लागले आणि राजकीय वातावरण तापू नये म्हणून मूर्तिजापूर शहर पोलिसांनी सोशल मीडियावर अक्षरशः 'कडक पहारा' बसवला आहे. निवडणूक काळात वातावरण बिघडविणाऱ्या कोणत्याही पोस्टवर दिरंगाई न करता थेट गुन्हा दाखल करण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला असून नागरिकांना गंभीर इशारा देण्यात आला आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जातीय–धार्मिक तेढ वाढेल, शांतता भंग होईल किंवा खोटी–मिथ्या माहिती पसरवली जाईल, अशा पोस्टला अजिबात सवलत नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. केवळ




पोस्ट टाकणारा नव्हे तर दिशाभूल करणारी माहिती 'फॉरवर्ड' करणाऱ्यांवरही कायदेशीर कारवाईची तरतूद लागू होणार आहे. माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत अशा गुन्ह्यांसाठी दंडासह कारावासाची शिक्षा होऊ शकते, अशी कठोर आठवण नागरिकांना करून देण्यात आली.

शहर पोलिस ठाणे प्रमुख अजीत जाधव यांनी सांगितले की, निवडणुकीच्या काळात सोशल मीडियावर भडकावू, अफवा पसरवणारी किंवा जातीय तेढ वाढविणारी कुठलीही पोस्ट आढळल्यास तत्काळ गुन्हा नोंदवला जाणार आहे. नागरिकांनी कोणतीही माहिती शेअर करण्यापूर्वी तिची सत्यता तपासावी आणि शांतता बिघडेल असे वर्तन नको.सोशल मीडियावरील आवेशाने वातावरण पेटू नये, समाज ढवळून निघू नये आणि निवडणुकीची पारदर्शकता बिघडू नये म्हणून पोलिसांचा हा निर्णय महत्त्वाचा ठरत आहे. नागरिकांनी सावध राहून संयम व जबाबदारीची भूमिका निभवावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले.

## बससेवा सुरू करण्याची मागणी

**अकोला** – शहानूर, अकोट – शहानूर बससेवा सुरू करण्याची मागणी अकोला अनेक वर्षांपासून बंद असलेला नरनाळा महोत्सव ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी नरनाळा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने अकोला ते शहानूर आणि अकोट शहानूर एसटी बस सेवा सुरू करण्याची मागणी एसटी अकोला विभाग नियंत्रकांकडे करण्यात आली आहे. या महोत्सवासाठी अकोला जिल्ह्यासह अमरावती, बुलडाणा, वाशिम जिल्ह्यातील पर्यटकांना, निसर्गप्रेमींनालाभ होईल.

# ऑटोरिक्षा चालकांना शिस्त लावणे गरजेचे
## नियमबाह्य चालकांमुळे नागरिक त्रस्त

**▪अकोला,दि २३ (प्रतिनिधी) :**
शहरात काही ऑटोरिक्षा चालकांना शिस्त लावणे गरजेचे आहे. कारण वाहन कोठेही उभे करणे, नियमांचे पालन न करणे अशी कृत्य दिसतात. यामुळे नागरिकांना त्रास होतो. अशा वाहनांविरुद्ध कारवाई करण्यात आली होती. परंतु अजूनही फार सुधारणा झालेली दिसत नाही.सवारी मिळवण्यासाठी ऑटोरिक्षा चालक नियम पायदळी तुडवत आहेत. रस्त्यावर वाहन कुठेही थांबवणे तसेच कोठूनही वाहन वळवणे यामुळे अपघात होऊ शकतात. असे गैरप्रकार सर्रास सुरू असतात. त्याला आळा घालण्यासाठी तातडीने उपाय



योजणे अत्यंत आवश्यक आहे. शहराची वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी म्हणून पोलिस अधीक्षक, महापालिका आयुक्तांची बैठक झाली. त्यानंतर काही दिवस परिणाम दिसला. मात्र पुन्हा जैसे ते स्थिती झालेली दिसते. नव्याने आढावा घेण्याची गरज आहे. त्या शिवाय समस्या दूर होणार नाही.

# दोन दिवसात एकही आक्षेप नाही;प्रारुप मतदार यादी

**▪अकोला,दि २३ (प्रतिनिधी) :**
अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टीने २० नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदार यादी प्रकाशित करण्यात आली आहे. या प्रारूप मतदार यादीत ज्या मतदारांची नावे दोनदा आली आहेत, ज्यांची मतदान केंद्रे बदलली आहेत किंवा ज्यांचे प्रभाग बदलले आहेत, अशा मतदारांना आपले आक्षेप २७ नोव्हेंबरपर्यंत दाखल करता येणार आहेत. मात्र, आक्षेप नोंदणीला दोन दिवस उलटूनही महापालिकेकडे मतदार यादीवर एकही आक्षेप प्राप्त झाला नसल्याची माहिती निवडणूक विभाग प्रमुख अनिल बिडवे यांनीदिली आहे. गुरुवारी अकोला महापालिकेच्या निवडणूक विभागाने प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली आहे. यंदाच्या निवडणुकीत एकूण ५ लाख ५० हजार मतदार आपले प्रतिनिधी निवडणार आहेत.

यामध्ये २ लाख ७४ हजार ९११ पुरुष, २ लाख ७५ हजार १७६ महिला आणि ४१ तृतीयपंथी मतदार मतदानाचा हक्क बजावतील. सर्वाधिक मतदार प्रभाग क्रमांक १४ मध्ये आहेत, तर सर्वात कमी मतदार प्रभाग क्रमांक ६ मध्ये नोंदवले गेले आहेत. २० नोव्हेंबर रोजी प्रकाशित झालेल्याया प्रारूप मतदार यादीवर आक्षेप आणि सूचना नोंदवण्याची अंतिम मुदत २७ नोव्हेंबर २०२५ निश्चित करण्यात आली आहे. या निर्धारित वेळेत नागरिकांना आपले नाव, पत्ता किंवा इतर तपशील दुरुस्त करण्याची संधी मिळणार आहे. त्यानंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांवर निर्णय घेऊन सुधारित यादी तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. अंतिम स्वरूपात सुधारित झालेली प्रभागनिहाय मतदार यादी ५ डिसेंबर २०२५ रोजी प्रकाशित केली जाईल. तसेच, मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी ८ डिसेंबर रोजी आणि त्यानंतर केंद्रनिहाय मतदार यादी १२ डिसेंबर २०२५ रोजी प्रकाशित केली जाणार आहे.

## थोडक्यात

### कापूस वेचणीत मजुराअभावी खोळंबा

**अकोला :** सध्या कापूस वेचणीचा हंगाम जोरात चालू असून, शेतकरी वर्ग शेतात मश्गूल असल्याचे दिसून येत आहे. मात्र कापूस वेचणीला मजूर मिळत नसल्याने कुटुंबाला घेऊन तो स्वत:च मजूर बनला आहे. तसेच मोठे शेतकरी आदीवासी भागातील मजूर आणून कापूस वेचत आहेत. मात्र त्यांना आणण्यासाठी वाहनांचा खर्च घरमालकाला करावा लागत असल्याने आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत आहे. एकीकडे कापूस वेचणीचा हंगाम अनब दुसरीकडे लग्नसराईचा सिजन असल्याने अर्धा मजूर वर्ग जवळचे लग्न उरकत असल्याने मजुरांची टंचाई जाणवत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सध्या कापूस वेचाईचा दर १० ते १२ रूपये किलो असून, मजुरांची ने–आण करण्याचा खर्च पडून तो शेतकऱ्यांना १५ रूपयांच्या वर जात असल्याने शेतकरी वर्ग हवालदिल होत असल्याचे दिसून येत आहे.

### शुक्ल यांना 'ज्ञान कस्तूरी' पुरस्कार

**अकोला :** शहरातील प्रतिष्ठित सेवाभावी संस्था कस्तुरी यांच्या वतीने यावर्षी दोन पुरस्कार जाहीर करण्यात आले असून, अकोला शहरातील दम्माणी नेत्र रुग्णालयाचे संचालक सभापती शुक्ल यांची ज्ञान कस्तुरी या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या पुरस्काराचे वितरण रविवार, ७ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता कस्तुरी परिसर, गायगाव मार्ग, अकोला येथे संस्थेच्या वर्धापन दिन समारंभात करण्यात येणार असल्याची माहिती कस्तुरीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. किशोर बुटोले यांनी एका परिपत्रकाद्वारे दिली. दम्माणी नेत्र रुग्णालयाचे संचालकसभापती शुक्ल यांनी मागील २६ वर्षांपासून समाजातील सुमारे ५५ हजार गरीब व दारिद्र्यरेषेखालील रुणांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून त्यांची निस्वार्थ सेवा केली आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून समितीने यावर्षी ज्ञान कस्तुरी पुरस्कार जाहीर केला आहे.

### मनपा इमारतीसाठी उर्वरित जागेची मागणी

**अकोला :** महापालिकेच्या नविन इमारतीच्या बांधकाम करण्यासाठी महापालिकेला रतनलाल प्लॉट चौक ते टॉवर चौक मार्गावरील जुन्या उर्दु स्कुलच्या जागा मंजुर झाली आहे. मात्र एकुण जागेपैकी काही जागा मिळाल्याने महापालिकेने उर्वरित जागेची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. महापालिकेला नवी प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी नझुल शिट क्रमांक ५५ नझुल भूखंड क्रमांक ११– १ मधील १ लाख ५८ हजार ५१६ फुट जागेचा आगाऊ ताबा जिल्हाधिकाऱ्यांनी महापालिकेला दिला आहे. तर यापूर्वी इमारतीच्या बांधकाम ासाठी दहा कोटी रुपयाचा निधी देखिल महापालिकेला मंजुर करण्यात आला होता. बांधकामासाठी १०० कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. या अनुषंगाने महापालिकेची प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी तांत्रिक सल्लागार नियुक्त करण्यासाठी आहे.

# अकोल्यात डासांचा प्रकोप वाढला; नागरिक त्रस्त

**▪अकोला,दि २३ (प्रतिनिधी) :**
शहरात वाढलेल्या डासांच्या प्रकोपामुळे नागरिक मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले असून संक्रामक आजारांचा धोका वाढत चालल्याने सर्वत्र चिंता व्यक्त होत आहे. शहरातील अनेक भागांत गल्ली– मोहल्ल्यांमध्ये कचरा ढिगारे, अस्वच्छता आणि साचलेल्या पाण्यामुळे डासांची



उत्पत्ती मोठ्या प्रमाणात होत आहे. या गंभीर समस्येकडे महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. नागरिकांनी शहरात तातडीने विस्तृत स्वच्छता मोहीम, कचरा उचल, तसेच फॉगिंग व कीटकनाशक फवारणी करण्याची मागणी केली आहे. प्रशासन या समस्येकडे गांभीर्याने पाहील का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान शहरात सर्दी, खोकला, ताप यांसारखे रुग्ण वाढले असून काही भागांत संसर्गजन्य रोगांचे प्रमाणही वाढू लागले आहे. मात्र, परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी आवश्यक पावले उचलण्याबाबत आरोग्य विभागाने अद्याप ठोस उपाययोजना न केल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या पावसामुळे विविध भागांत जलजमावाची समस्या निर्माण झाली होती. पावसाचा कालावधी संपताच जागोजागी साचलेल्या पाण्यातून डासांची संख्या झपाट्याने वाढली आहे. त्यामुळे नागरिकांना डेंगू, चिकनगुनिया, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका जाणवत असून लोक घबराटीत आहेत. नागरिकांचे म्हणणे आहे की, प्रशासनाने तातडीने सर्वप्रथम स्वच्छता व फॉगिंग मोहीम राबवली पाहिजे, अन्यथा परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते.

## प्रमाणित हरभरा बियाणे वितरण

**अकोला :** शेतकऱ्यांना दर्जेदार प्रमाणित बियाणे अनुदानित दरावर उपलब्ध व्हावे कडधान्य पिकांच्या नवीन वाणाचा प्रचार प्रसार व्हावा व शेतकऱ्यांना अवलंब करण्यास प्रोत्साहन मिळावे.

# एकला चलो रे! नगराध्यक्ष पदाच्या शर्यतीत जंगी मुकाबला

**▪मुर्तिजापुर,दि २३ (प्रतिनिधी) :**
मुर्तीजापुरच्या बदलत्या राजकीय क्षितिजावर 'भ्रष्टाचार विरुद्ध विकास' अशी थेट लढत – ही निवडणूक फक्त पदासाठी नाही, तर आदर्श नगरपालिका घडवण्याच्या जनतेच्या कौलाची वेगळीच धग.

मूर्तीजापूर नगरपरिषद निवडणूक २०२५ ने या वेळी वेगळाच रंग पकडला आहे. कोणतीही युती नाहीः कुणाचं कुणाशी थेट गणित नाहीः ङ्गएकला चलो रे! या आवेशात सर्वच उमेदवार मैदानात उतरले असून शहरात राजकारणाचा तापमान वाढवणारी थरारक स्पर्धा निर्माण झाली आहे.

भ्रष्टाचाराच्या सावल्या झटकून टाकत, नव्या विकासाच्या आश्वासनांना धार देत, आदर्श नगरपालिका निर्माण करण्यासाठी जनता कोणाला कौल देते याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. भाजपचे हर्षल साबळे, काँग्रेसचे अशोक दुबे, उद्धव ठाकरे गटाचे विनायक गुल्हाणे, शिंदे गटाचे शुभम मोहोड, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे कृष्णराव गावंडे, आरपीआयच्या दीपाली जाधव, तर अपक्ष सुनील पवार आणि वंचितचे शेख खलील ङ्ख या आठ उमेदवारांमध्ये 'कोणाची लाट'? हा



प्रश्न अधिकच गडद होत आहे.रस्ते–पाणी–नाले–घाण–अनियमित कामकाज, निधींचा कथित गैरवापर, आणि वर्षानुवर्षे स्थिरावलेली सत्तेची गुंतागुंतः या साऱ्यांवर ठोकून काढण्याचा गर्जनादार दावा प्रत्येक उमेदवार करत आहे. पण जनता आता घोषणांनी नव्हे, तर प्रत्यक्ष कामाच्या रोडमॅपकडे पाहत आहे.शहराच्या राजकीय रंगभूमीवर ही निवडणूक एखाद्या सिनेमातील क्लायमॅक्ससारखी टोकदार बनली आहे.एक बाजूला आश्वासनांचा गजरःदुसरीकडे प्रशासनातील भोंगळ कारभाराविरोधात उभा ठाकलेला जनमताचा जाज्वल्य रोषः मुर्तीजापुरला भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक, सक्षम व विकासाभिमुख बनवण्यासाठी जनता कोणावर विश्वास ठेवणार ?हेच या निवडणुकीचे खरे उत्तर आणि शहराच्या भवितव्याचा निर्णायक क्षण ठरणार आहे.

# भाज्यांचे भाव वाढल्याने गृहिणींना चिंता

**▪अकोला,दि २३ (प्रतिनिधी) :**
८० रुपये किलो बहुतांश भाज्यांचे भाव अकोला हिवाळ्यात भाज्यांची रेलचेल असते. तसेच भाव देखील आवाक्यात असतात परंतु यंदा अती पावसामुळे बागायती शेतीवर परिणाम झाला. त्यामुळे आवक कमी आहे. त्यामुळे दर वाढले. पत्ता कोबी फक्त चाळीस रुपये किलो आहे बाकी भाज्या ऐंशी, शंभर रुपये किलोने विकत घ्यावे लागत आहेत हिरवे कांदे, मुळा, मेथी, टोमॅटो, काकडीचा सलाद तसेच वांग्याचे भरीत, हिरव्या मिरच्यांचा ठेचा असा बेत या दिवसात असतो. थंडीच्या दिवसात खाण्यापिण्याची चंगळ असते. परंतु बाजारात महागाई डोकावू लागली की हात



आखडता घ्यावा लागतो. याला कारण सध्याचे भाव. फुलकोबी, पालक, मेथी ऐंशी रूपये किलो, गवार शेंगा, ढेमसे एकशे वीस रुपये किलो, टोमॅटो साठ रुपये किलो या प्रमाणे भाज्यांचे भाव आहे. त्यातही हद्दवाढ भागात किलो मागे दहा रुपये अधिक मोजावे लागतात.

# पं. स. अकोला येथील गट विकास अधिकारी व कर्मचारी घोलप यांचेवर गुन्हे दाखल करण्याची पेन्शनर टीचर्स फोरमची मागणी

**▪अकोला,दि २३ (प्रतिनिधी) :**
अकोला पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व शिक्षण विभागातून बदली झालेले कर्मचारी अविनाश घोलप यांनी सेवानिवृत्त शिक्षक रमेश काळे यांचे निवृत्ती वेतनातून दहा हजार रुपये परस्पर हडप केल्याचे कागदोपत्री दिसून येत असल्याने उभयतांवर आर्थिक अपहार, म्हाताऱ्या शिक्षकाचे मानसिक, शारिरीक व आर्थिक उत्पिडन आदी बाबींचे अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची मागणी सेवानिवृत्त शिक्षकांची संघटना पेन्शनर टीचर्स फोरम, जिल्हा अकोलाचे अध्यक्ष जयंत घाटोळ यांनी मुख कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. सदर निवेदन व रमेश काळे यांचा अर्ज त्यांनी पासबुकाच्या प्रतीसह प्रसिद्धीस दिला आहे. या निवेदनात म्हाताऱ्या शिक्षकांनी थेट राजपात्रित अधिकाऱ्याच्या मूक संमतीनेच निवृत्त शिक्षकांच्या औषधांकरिता असलेल्या निवृत्ती वेतनातूनच परस्पर अपहार आणि शासनाच्या फसवणूकीचा आरोप केल्या मुळे एकच खळबळ उडाली आहे. सदर अपहार प्रकरण दाबण्याचे प्रयत्न करणारी यंत्रणा संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यान्वित केल्याचा आरोपही घाटोळ यांनी केला आहे. याप्रकरणी तक्रारकर्ते रमेश काळे (६५) व आपल्यावर (६३) प्रकरण मागे घेणेसंबंधी प्रचंड दबाव आणला जात असून या मानसिक तणावाखाली काळे यांचे प्रकृतीस अथवा आपले प्रकृतीस काही अपाय झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हा परिषद, पंचायत समिती प्रशासनाची राहील व नाईलाजाने पोलीस संरक्षणाची मागणी करावी लागेल असेही घाटोळ यांनी नमूद केले आहे. प्रचंड मानसिक दबाव व उलट कारवाईची धमकी देणे म्हणजे 'उलटा चोर कोतवाल को डांटे' असेच झाले असल्याचेही घाटोळ यांनी म्हटले आहे. या संपूर्ण प्रकारामुळे व दबाव, धमक्यांमुळे वयोवृद्ध शिक्षक काळे यांना मानसिक धक्का बसला असल्याचेही घाटोळ यांनी म्हटले आहे.

याप्रकरणी असे झाले की, काळे यांना अध्यापन सेवेत असताना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेला आहे. आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक एका अग्रीम वेतनवाढीस पात्र असुनही विशिष्ट कालावधीतील पुरस्कारप्राप्त शिक्षकांना हा हक्क डावलण्यात आला.

### अकोला चॅरिटी बार असोसिएशनचे मुख्यमंत्र्यांनाच पत्र
# मंदिरांच्या जमिनी हडपण्याविरोधात 'अँटी लँड ग्रॅबिंग ॲक्ट' तात्काळ लागू करण्याची ठाम मागणी
## अकोला जिल्हा न्यायालयातील १५० हून अधिक अधिवक्त्यांचाही उत्स्फूर्त पाठिंबा

**▪अकोला,दि २३ (प्रतिनिधी) :**
राज्यातील देवस्थानांच्या जमिनींच्या वाढत्या बेकायदेशीर हस्तांतरणांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीने गंभीर वळण घेतले असताना, मंदिरांच्या जमिनींचे रक्षण करण्यासाठी कठोर कायदा करण्याची मागणी आता वकील मंडळींकडूनही जोरकसपणे पुढे येत आहे.

याच पार्श्वभूमीवर अकोला चॅरिटी बार असोसिएशनने मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना थेट पत्र लिहून, गुजरात व कर्नाटकच्या धर्तीवर महाराष्ट्रात ❊'अँटी लँड ग्रॅबिंग ॲक्ट' तात्काळ लागू करण्यात यावा, अशी स्पष्ट आणि ठाम मागणी केली आहे.



असोसिएशनने आपल्या पत्रात नमूद केले आहे देवस्थानच्या जमिनी भूमाफियांनी हडपल्यामुळे केवळ धार्मिक संस्थांचीच नव्हे तर संपूर्ण समाजाच्या श्रद्धास्थानांची हानी होत आहे.

त्यामुळे महाराष्ट्रात दखलपात्र आणि अजामीनपात्र असा कठोर कायदा करण्याची वेळ आल्याचे अधिवक्त्यांनी नमूद केले.

तसेच सनातनच्या साधक अधिवक्ता श्रीमती श्रुती भट व त्यांच्या सहकारी अधिवक्त्यांनी अकोला जिल्हा न्यायालयात महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने देण्यात येणाऱ्या निवेदनावर स्वाक्षरी मोहीम राबवली. या निवेदनावर १५० हून अधिक अधिवक्त्यांनी उत्स्फूर्तपणे स्वाक्षऱ्या केल्या. निवेदनाला कायदे क्षेत्रातील ज्येष्ठ तज्ज्ञ मंडळींकडूनही मोठ्या प्रमाणावर मिळालेल्या समर्थनामुळे विषयाचे गांभीर्य आणि कायद्याची आवश्यकता अधोरेखित झाली आहे.

मंदिरांच्या जमिनींच्या संरक्षणासाठी शासनाने तत्काळ कारवाई करावी, असे आवाहन अधिवक्त्यांनी सामूहिक रित्या केले आहे. अकोल्याच्या जिल्हा न्यायालयात या निवेदनामुळे चर्चा होऊ लागल्या आहेत,असे कळते.

# अकोला शेगांव पायीवारीत हजारो भाविकांचा सहभाग



**अकोला :** श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनाच्या ओढीने, अकोला ते शेगाव पायीवारीचे आयोजन डाबकीरोडवासी कावड मित्र मंडळ, आदर्श मित्र मंडळ आणि बोक्या ग्रुपच्या वतीने रविवार, २३ रोजी करण्यात आले. हजारो भाविक पायीवारीत सामील होते. गण गण गणात बोते या मंत्राचा गजर डाबकीरोड परिसरात झाला. रविवारी सकाळी अकोला शेगाव वारीचे आयोजन संत गजानन महाराजांच्या भक्तांसाठी केले आहे. डाबकी रोड येथील प्रिया टॉवर येथून ही वारीला आरंभ झाला. वारकऱ्यांसाठी आयोजकांकडून चोख व्यवस्था करण्यात आली. वैद्यकीय सुविधा, चहा, फराळ आणि जेवणाची व्यवस्था केली जाणार आहे. या सेवाभावी उपक्रमासाठी स्थानिकांनी सहकार्य केले आहे.

# कविता म्हणजे मुक्या मनातील संवेदना प्रगट करणारे माध्यम : प्रा.फ. मु. शिंदे

■अकोला,दि २३ (प्रतिनिधी) :

साहित्याचे अनेक प्रकार आहेत. त्यातील कविता प्रकार म्हणजे मुक्या मनातील संवेदना प्रगट करणारे एक सशक्त माध्यम असून मनातील विचारांना सजीव करणारी ती एक कलाकृती आहे. अतिशय प्राचीन काळापासून ही साहित्यकला अस्तित्वात असून अनेक महान ग्रंथ व वैचारिक साहित्य तयार करण्यात तिने मोलाचा हातभार लावलेला आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्रातील प्रख्यात कवी तथा मराठी रंगभूमी सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष प्रा. फ. मु. शिंदे यांनी केले. मराठा सेवा संघातर्फे आयोजित वर वधू कक्षाचे उद्घाटन तथा ' गप्पा टप्पा ' या खुमासदार कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

मराठा सेवा संघाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रख्यात हास्य कवी ॲड. अनंतराव खेळकर तर प्रमुख अतिथी म्हणून सिफा, इलना व किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश भाऊ पोहरे, सुप्रसिद्ध व्यावसायिक दिलीप सिंग गोसल, प्रख्यात हास्य कवी घनश्याम अग्रवाल उपस्थित होते. मराठा सेवा संघाचे अध्यक्ष डॉ. रणजीत कोरडे, माजी अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम तायडे, अशोक पटोकार, मनपाचे माजी सभापती डॉ. किशोर मालोकार, पाटील समाजाचे सचिव प्रदीप खाडे, वधू वर कक्षाचे संयोजक रामेश्वर सपकाळ, अप्रतिम जोडीच्या संयोजीका अर्चनाताई पाटील, लीलाताई शिंदे याप्रसंगी प्रामुख्यानेउपस्थित होत्या. याप्रसंगी फ. मु. शिंदे यांनी आपली प्रख्यात कविता ' आई ' तसेच त्यांच्या गाजलेल्या काव्यसंग्रहातील काही निवडक कविता सादर केल्यात. त्यांच्या कविता सादरीकरणानंतर ' गप्पा टप्पा ' कार्यक्रमात कार्यक्रमाचे संचलन कर्ते प्रदीप खाडे यांनी त्यांना काही दिलखुलास सामाजिक, साहित्यिक व राजकीय प्रश्न विचारले. या सर्व प्रश्नांची त्यांनी अतिशय खुमासदारपणे उत्तरे दिलीत. हास्य कवी घनश्याम अग्रवाल यांनीही याप्रसंगी आपल्या काही बहारदार हास्यरचना सादर करून श्रोत्यांना हसविले.




# प्रत्येक कार्यालयात दिव्यांग रॅम्प निर्माण करण्याची काँग्रेसच्या दिव्यांग विभागाची मागणी

अकोला-दिव्यांग युवक युवती व दिव्यांग नागरिकांना आपल्या कामानिमित्त नित्य शासकीय खाजगी कार्यालय, रेल्वे स्टेशन बसस्टॉप,मॉल, खाजगी दुकान,शाळा आदी ठिकाणी जावे लागते. मात्र अश्या अनेक ठिकाणी दिव्यांग वर्गाच्या ट्रायसिकल साठी रॅम्प उपलब्ध नसल्यामुळे दिव्यांग वर्गाची घोर कुचंबणा होऊन त्यांना आपले काम करता येणे शक्य नाही.करिता प्रशासनाने दिव्यांग हिताच्या दृष्टीने अश्या ठिकाणी रॅम्प निर्माण करून शासकीय निर्देशांची अंमलबजावणी करण्याची मागणी अकोला जिल्हा काँग्रेस दिव्यांग विकास विभागचे अध्यक्ष सचिन कडूजी शेजव यांनी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनात शासनाने सार्वजनिक वा शासकीय, खाजगी ठिकाणी रॅम्प करून देण्यात यावेत असा निर्णय घेतला होता.

मात्र या निर्णयाची अंमलबजावणी तुरळक कार्यालयातच झाली असून अनेक खाजगी व सार्वजनिक ठिकाणी ही सुविधा उपलब्ध करण्यात आली नाही.

बरेच ठिकाणी रॅम्प नसतात त्यामुळे दिव्यांगांची व्हीलचेअर तेथे जात नाही. त्यामुळे दिव्यांगाना इतरांचा सहारा घ्यावा लागतो.अशामुळे दिव्यांग वर्गाला असुविधा होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले असून या निवेदनाची तातडीने दखल घेत दिव्यांग रॅम्प निर्माण करण्याची मागणी करण्यात आली.

# बिबट्याची दहशत कायम

**अकोला :** न्यू तापडिया नगर परिसरात काही काही दिवसांपूर्वी दिसलेल्या बिबट्याच्या प्रकरणात वनविभागाने 'बिबट्या परिसर सोडून गेला' असा दावा केला असला, तरी परिसरातील दहशत अजूनही कायम आहे. बिबट्या शोधण्यासाठी ड्रोनच्या साहाय्याने शोधमोहीम राबवण्यात आली; मात्र कोणताही ठोस पुरावा न मिळाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. यामुळे वनविभागाने अप्रत्यक्षपणे तपास संपल्याचे संकेत दिले आहेत. नागरिकांनी पाहिलेला प्राणी हा रानमांजर नसून खरा बिबटच होता, असे प्रत्यक्षदर्शी ठामपणे सांगत असल्याने वनविभागाच्या निष्कर्षावर प्रश्न निर्माण झाले आहेत. प्रारंभी वन अधिकाऱ्यांनी याला रानमांजरीसारखा प्राणी असल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला होता.

# मुहूर्त टळला, कामांची गती संथ; राज्य शासनाने घेतला आढावा

अकोला : शहरासाठी केंद्र पुरस्कृत पीएम ई - बस सेवा योजनेचा नवीन वर्षातील मुहूर्त हुकला असून, आता ही योजना वर्षाच्या पहिल्या तिमाहीत सुरू होणार की नाही, याबाबत प्रकल्पाची स्थिती अनिश्चित बनली आहे. या योजनेचे काम अत्यंत संथगतीने सुरू असून, उर्वरित कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश महापालिकेला देण्यात आले आहेत.पीएम ई-बस सेवा योजनेच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी नुकतीच राज्य शासनाने सर्व आयुक्तांची एक बैठक घेतली होती. अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या उच्चस्तरीय बैठकीत प्रकल्पाच्या विविध प्रगतीपथावरील मुद्द्यांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीला सर्व आयुक्तांसह संबंधित नोडल अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत अकोला महापालिकेच्या कामाची प्रगती तपासण्यात आली. अनेक ठिकाणी कामांची गती मंदावल्याचे दिसून आले, ज्यामुळे योजनेचा नियोजित मुहूर्त लांबणीवर पडला आहे. दरम्यान, केंद्र सरकारने देशभरातील पीएम ई-बस सेवा प्रकल्पांचा आढावा घेतल्यानंतर, राज्य सरकारने सरकारने महाराष्ट्रातील १९ शहरांमधील या प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. या आढावा बैठकीत महत्त्वाच्या अकोला

आयुक्तांनी महापालिकेतर्फे सहभाग घेतला. महापालिकेला तातडीने कामे पूर्ण करून ही सेवा लवकर सुरू करण्याचे आव्हान आहे.

# रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिराच्या रामदेव भजन उत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद

■अकोला,दि २३ (प्रतिनिधी) :

स्थानिक गीता नगर परिसरात असलेल्या रामदेवबाबा श्यामबाबा मंदिरात रामदेव भजन संध्या व दिव्य ज्योत दर्शनास भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रामदेवबाबा श्यामबाबा सेवा समितीच्या वतीने मार्गशीर्ष शुद्ध द्वितीया वर भजन संध्याचे आयोजन केले होते.या संगीतमय भजन संध्येत भजन गायिका सौ. पुष्पा मंत्री, सौ. सोनल चितलांगे आणि डॉ सौ. दिपाली जाजू यांनी सहभाग घेत रामदेवबाबांचे भक्तिगीते सादर करीत जल्लोष निर्माण केला.

या भजन उत्सवात भक्तांसाठी दिव्य ज्योत दर्शनाचीही सुव्यवस्था करण्यात आली होती.या सोहळ्यात भजन गायिका पुष्पा मंत्री, सौ. सोनल चितलांगे आणि डॉ सौ.दिपाली जाजू यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी महिला व पुरुष भक्तांची मोठी उपस्थिती या दिव्य संगीतमय भजन संध्येस लाभली.उत्सव सफलतेसाठी रामदेवबाबा- श्यामबाबा सेवा समितीच्या समस्त पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

करण्यात आले आहे.

# अकोला मनपा निवडणूक राजकीय समीकरणे बदलणार

**अकोला** : आगामी २०२५ अकोला महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत जाहीर झालेल्या प्रारुप मतदार यादीनुसार अनेक वॉर्डीमधील मतदारांच्या संख्येत मोठी तफावत दिसून च्या येत आहे. २०१७ निवडणुकीतील मतदार संख्या आणि २०२५ च्या प्रारुप मतदार यादीतील मतदारांची संख्या यात प्रभागानुसार हजारो मतदारांचा फरक नोंदवला गेला आहे. मतदारांच्या संख्येत झालेली ही मोठी वाढ निवडणुकीच्या गणितावर आणि निकालांवर थेट परिणाम करणारी ठरू शकते. काही प्रभागांमध्ये मतदारांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली दिसत आहे. ही वाढ निवडणुकीची समीकरणे बदलण्यास कारणीभूत शकते. प्रभाग क्र. ८ येथे ठरू सर्वाधिक १३,१०४ मतदारांची वाढ झाली आहे. २०१७ मध्ये १६, २९६ मतदार होते, जे आता वाढून २९,४०० झाले आहेत. प्रभाग क्र. १९ येथे ८,६९२ मतदारांची वाढ झाली असून, त्यांची संख्या २४,४९५ वरून २८,९७९ झाली आहे. प्रभाग क्र. १४ येथे देखील ८,५५८ मतदारांची लक्षणीय वाढ झाली आहे. या वाढीमुळे राजकीय समीकरणे बदलणार आहेत.

प्रभागांच्या सीमा पुनर्रचनेमुळे ही वाढ झाल्याचे संकेत मिळत आहेत. ज्या राजकीय पक्षांचे नव्याने जोडलेल्या भागांवर वर्चस्व आहे, त्यांना याचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. या व्यतिरिक्त प्रभाग क्रमांक १ मध्ये ८,२२०, प्रभाग २ मध्ये ७,३२६, प्रभाग ११ मध्ये ५,०९६ तर प्रभाग १८ मध्ये ८,०६३ इतके मतदार वाढले आहेत. तर अनेक प्रभागातील मतदार घटले सुद्धा आहेत. मतदारांच्या संख्येत झालेल्या या मोठ्या तफावतीमुळे राजकीय पक्षांना आता त्यांच्या निवडणुकीच्या तयारीचा सपूर्ण रणनाता बदलावी लागेल. राजकीय पक्षांकडून आता या वाढलेल्या मतदारांवर लक्ष केंद्रित करून नियोजन केले जाण्याची शक्यता आहे.

विद्यमान आणि माजी नगरसेवकांना तसेच इच्छुकांना या नवीन मतदारांच्या गटासाठी स्वतंत्र प्रचार करावा लागेल. २०१७ ची लोकसंख्या आणि मतदार संख्येतील फरक मोठा असल्याने, मतदार यादीच्या नोंदीत काही त्रुटी असण्याची शक्यता आहे. त्यामुळे, राजकीय पक्षांनी यादीतील नावे वगळली गेली आहेत की नाहीत, हे तपासण्यासाठी याद्यांची छाननी केली आहे. सुरू या वाढलेल्या मतदारांचे गणित जुळवण्यात जो पक्ष यशस्वी होईल, तोच आगामी अकोला महापालिका निवडणुकीत बाजी मारू शकेल.

## याले म्हणते घरावर गोटे घेणे...

### (प्रवासानुभव )

त्याचं झालं असं की, CSMT-Amravti ट्रेनच्या डब्यात चार्जिंग सॉकेटजवळ एक गृहस्थ आले. त्यांनी मोबाईल चार्जिंगला लावला आणि बॅगेच्या कप्प्यात ठेवून दिला. सुमारे एक तासानंतर चार्जिंग किती झाली हे पाहण्यासाठी ते गृहस्थ उठले आणि मोबाईल काढून पाहतात तर नुसतं दहा टक्के चार्जिंग.



'उरे हुत्त लेका मोबाईल लावला तवा १२ टक्के चार्जिंग होती. आता तर १० च टक्के राहिली.

त्यात दुसरे एक आजोबा मळमळीने बोलले, 'नकली चायनामेड, डुबलीकेट चार्जर वापरसान तं हेच होईन.'

'नकली हाय का ते चार्जर. तीनशाची केबल अन आठशाची डबी आहे म्हणलं'

'हं आली तीनशाची केबल'

'हं तुमाले भलतं समजून रायलं नकली हाय म्हणता'

'चालला लेका तीनशावाला. शेम्बूडपुशा समजून रायला का आमाले? दादरच्या पुलावर तीस रुपयात कोणी हुंगत नाई या वायरले.'

'ओ आबा शिल्लक कहाले बोलून रायले. तीनशाचं असो की तिसचं तुमचं काय मीटर जयते.'

'कामून.. जयते महालं मीटर.. तीस रुपळ्याची पिन घेऊन अटी सतरा खेप चकरा मारतं लेका. आमाले तरास होते. चांगलं चार्जरबी घेऊ नाई तुले. दोन खर्रे कमी खावं माणसानं.'

'ओ आबा जास्त होबाशा नका करू'

'होबाशा म्हणजे.. तुया बापाची हाय का रेल्वे'

'हो हाय माया बापाची'

'मग माल्याबी बापाची हाय'

'मंग?'

'मंग काय मंग?'

'मारता का?'

'तू डोये वास्त काय?'

'मारता काय... मारा'

'तू मारतं काय.. मस्ती दाखोतो काय'

'तुम्ही दाखोता मस्ती.'

'लाव हात...! हात तं लावून दाखो'

'तुम्ही लावा पयले.. मंग दाखोतो इंगा..'

नाशिकच्या पुढे निघालेली एक्सप्रेस हिवानं कुडकूडत होती. लोकं शाली पांघरून कडक्याच्या थंडीत भांडणाचा आस्वाद घेत होती. एकच डबा गरम झाला होता. हातापाई होणार तेवढ्यात माझ्यासह इतर दोघांच्या मध्यस्तीने आबा शांत झाले. पुन्हा थंडीचा कडाका अन गाडीची शांत झुकझुक.

सुमारे पंधरा मिनिटांनी आजोबा उठले. चार्जर टोचला. मोबाईल लावला. थोडे आडवे झाले. अर्ध्या तासांनी मोबाईल काढला.

मी - 'आबा झाली का चार्जिंग. मी लावतो आता.'

आबा- 'अबे जेवडीची तेवढीच हाय लेका.'

मी - 'ते स्विचच खराब हाय मंग. करंट धरसोड करते ते.. राहा मंग झोपून..'

तेवढ्यात पूर्वीचे गृहस्थ - 'काहो आबा..! लोहा-लोखंडवर घेतली वाटते वायर...?'

अन पुन्हा डबा गरम झाला...

**- महेश घोराळे**

# महाराष्ट्र क्रिकेट असो ज्युनिअर महिला निवड समितीच्या अध्यक्ष ऋचा शिंदे यांची क्रिकेट क्लब ला भेट

■अकोला,दि २३ (प्रतिनिधी) :

अत्यंत कमी व्यवस्थेत राज्य व देशपातळीवर सातत्याने चांगले खेळाडू देणाऱ्या अकोला क्रिकेट क्लबच्या खेळाडूंना योग्य प्रशिक्षण व सुविधा उपलब्ध करून देण्याचा आपला सर्वोतोपरी प्रयत्न राहील असे प्रतिपादन महाराष्ट्र क्रिकेट असो.ज्युनिअर महिला खेळाडु निवड समितीच्या अध्यक्ष ऋचा शिंदे यांनी केले. महाराष्ट्र क्रिकेट असो ज्युनिअर महिला निवड समितीच्या अध्यक्ष, शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या व भारतीय महिला कसोटी संघाच्या माजी खेळाडू ऋचा शिंदे यांनी अकोला क्रिकेट क्लबला भेट देत खेळाडू व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या, क्रिकेट कडे कॅरिअर म्हणून बघण्याची आवश्यकता असून त्यासाठी खेळाडूंनी सातत्याने सराव केला पाहिजे असे त्यांनी यावेळी सांगितले. क्रिकेट क्लबचे अध्यक्ष विजय देशमुख व सचिव सुरेश पाटील यांच्या मार्गदर्शनात आणखी चांगल्या सुविधा देण्यासाठी अकोला क्रिकेट क्लब कटिबद्ध असून या क्लबच्या माध्यमातून आयपीएल मध्ये खेळणारे राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू निर्माण झाले असून ही क्रिकेट क्लब ची मोठी उपलब्धी असल्याचे क्लबच्या खेळाडूंचा परिचय करून देताना क्लबचे ऑडिटर विवेक बिजवे यांनी सांगितले. यावेळी ऋचा शिंदे तथा राष्ट्रीय हॉकी खेळाडू व



विदर्भ फाउंडेशनचे अध्यक्ष दिलीपसिंह गोसल यांचा ऑडिटर विवेक बिजवे व सहसचिव गुरुचरणसिह अंधेरेले यांनी शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. शिंदे यांनी यावेळी उदयोन्मुख खेळाडूंचा परिचय करून घेत त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी क्रिकेट क्लबचे कोच अभिजीत कर्णे, मधुकर कांबळे तथा एनआयएस कोच आकाश राऊत यांनी क्लब खेळाडूंच्या चमकदार कामगिरीची माहिती दिली. यावेळी क्लबचे देवा शर्मा, अशोक नागदिवे, दिलीप अग्रवाल, प्रकाश खंडारे समवेत क्लबचे अनेक सदस्य व खेळाडू प्रामुख्याने उपस्थित होते.

# वैभव शिंदे यांना पुरस्कार

अकोला : युवा पिढीचा कृषी क्षेत्रातील सहभाग वाढावा आणि कृषी संशोधनात नाविन्यपूर्ण कार्य करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने ह्युमन सर्व्हिस फाउंडेशन व मीडिया एक्झिबिटर्स प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कृषीथॉन २०२५' प्रदर्शनात राज्यभरातील उत्कृष्ट संशोधकांनागौरविण्यात आले. या प्रतिष्ठितपुरस्कारासाठी अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयात सहाय्यक शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. वैभवकुमार शिंदे यांची निवड झाली असून, त्यांना 'प्रयोगशील कृषी संशोधक पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

# पातूर तालुक्यातील वृद्ध कलावंतांना अखेर न्याय!

**पातूर :** आयुष्यभर कलेची सेवा करणाऱ्या, मात्र उतारवयात उपेक्षेचे धनी होणाऱ्या तालुक्यातील अनेक वृद्ध कलावंतांना अखेर हक्काचे मानधन मिळणार आहे. पातूर पंचायत समितीचे माजी सदस्य गोपाल ढोरे यांच्या विशेष मार्गदर्शनामुळे आणि पाठपुराव्यामुळे अनेक गरजू कलावंतांच्या मानधन प्रकरणांना गती मिळाली असून, मंजुरीच्या दिशेने सकारात्मक कवाटचाल सुरूझाली आहे.

पातूर तालुक्यात अनेक भजनी मंडळे, वारकरी आणि लोककलावंत आहेत. ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य कलेसाठी वेचले. मात्र,Alele rdisia शासनाच्या 'वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन योजने'ची माहिती नसल्याने किंवा क्लिष्ट प्रक्रियेमुळे अनेकजण या लाभापासून वंचित होते. ही बाब लक्षात घेऊन माजी पं.स. सदस्य गोपाल ढोरे यांनी स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेतला. ढोरे यांनी केवळ कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यात मदत केली नाही, तर सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासकीय स्तरावर या प्रकरणांचा पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नांमुळे अनेक पात्र आणि गरजू कलावंतांना आता शासनाचे मानधन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# तुळसाबाई कावल विद्यालय येथे ७८ व्या एनसीसी दिवस साजरा

■पातुर,दि २३ (प्रतिनिधी) :

तुळसाबाई कावल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पातुर येथे ७८ वा एनसीसी दिवस अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. एनसीसी दिवस हा नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या रविवारी साजरा करण्यात येत असतो. जो राष्ट्रीय कॅडेट कॉर्प्स (NCC) चा ७८ वा स्थापना दिवस आहे. देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. ज्यात कॅडेट्स विविध माध्यमांतून आपल्या भावना व्यक्त करतात. नॅशनल कॅडेट कॉर्प्स (छउउ) ही भारतीय सशस्त्र दलाची युवा शाखा आहे. ज्याचे मुख्यालय नवी दिल्ली, भारत येथे आहे. हे सैन्य , नौदल आणि हवाई दल यांचा समावेश असलेली त्रि-सेवा संस्था म्हणून स्वयंसेवी आधारावर शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी खुले आहे. कॅडेट्सना लहान शस्त्रे आणि कवायतीचे मूलभूत लष्करी प्रशिक्षण दिले



जाते. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व लष्करी शिक्षणाची आवड निर्माण व्हावी या हेतूने राष्ट्रीय छात्रसेना म्हणजे एन.सी.सी. ची स्थापना करण्यात आली.

# संविधान सन्मान महासभेला शेकडो कार्यकर्ते जाणार

## वंचित बहुजन आघाडीचाबैठकीत निर्णय

■अकोट,दि २३ (प्रतिनिधी) :

२५ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे होणाऱ्या संविधान सन्मान महासभा या मोठ्या मोर्चाच्या अनुषंगाने वंचित बहुजन आघाडी अकोट तालुक्याच्यावतीने महत्त्वपूर्ण नियोजन बैठक घेण्यात आली. त्यामध्ये अकोट तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते जाणार असल्याचा निर्णय घेण्यात आला.

तालुक्यातील सर्व कार्यकर्ते २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी मुंबईकडे प्रस्थान करणार आहेत. बैठकीत कार्यकर्त्यांची वाहतूक, निवास व्यवस्था, बॅनर पोस्टर तसेच शिस्तबद्ध संचलनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संविधान सन्मान महासभेला अकोट तालुक्यातील विक्रमी उपस्थिती राहील, असा विश्वास बैठकीमध्ये आयोजकांनी व्यक्त केला. बैठकीला अकोला जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, तालुकाध्यक्ष चरण इंगळे, महासचिव रोशन पुंडकर, सुरेंद्र ओइंबे, निलेश झाडे, प्रसिद्धीप्रमुख स्वप्निल



सरकटे, युवक महासचिव अमन गवई, गोपाल ढोरे, प्रमोद सोनोने, तुषार पाचकोर, देवानंद फुसे, हिरा सरकटे, अजित अहेमद, स्वप्निल दहीभात, सचिन सरकटे, रमेश सरकटे, युवराज

मुरकुटे, दिनेश सरकटे, मुस्ताक पटेल, जावेद बागवान, शेख इबाल, निरंजन गावंडे, रणजित सरकटे, संजय पुंडकर, मनोहर गाढे, निखिल गावंडे, बुद्धभूषण गावंडे, विकी धांडे, राजपाल बडगे, प्रशांत मानकर, सुयोग आठवले, रामभाऊ भाष्कर, संजय खंडारे, संजय बुत यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अभियंता हरिदास ताठे किसान ब्रिगेडच्या जलसिंचन तांत्रिक सल्लागारपदी

**अकोला:** शेतकऱ्यांप्रती असलेली तळमळ, समस्त शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी करीत असलेल्या कार्याची दखल घेत किसान ब्रिगेडने अभियंता हरिदास ताठे यांची जलसिंचन तांत्रिक सल्लागारपदी तर जिल्हा प्रवक्तेपदी प्रदीप चोरे यांची निवड करण्यात आली. किसान ब्रिगेडच्या मुख्य कार्यालयात किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष प्रकाश पोहरे यांच्या हस्ते व जिल्हाध्यक्ष दिवाकर गावंडे, जिल्हा कार्याध्यक्ष शरद वानखडे, जिल्हा सचिव भगवान गवळी यांच्या प्रमुख उपस्थितीत ताठे व चोरे त्यांना नियुक्तिपत्र देण्यात आले.

RNI NO-46973/1986 | Mahasagar Akola | Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ | महासागर अकोला | **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, ेमला स्क्रेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )**

# बिहारनंतर आता पश्चिम बंगाल

एक निवडणूक जिंकल्यावर भारतीय जनता पक्ष पुढच्या निवडणुकीच्या तयारीला सुरूवात करतो. निवडणूक लढविण्यासाठी पक्षाची यंत्रणा आणि त्या त्या क्षेत्रातील कार्यकर्त्यांचे जाळे सतत कार्यरत राहील याची पक्ष काळजी घेत असतो. प्रत्येक निवडणूक जिद्दीने लढवायची व जिंकण्यासाठीच लढायची हा मोदी- शहा याचा मंत्र आहे. पुढील निवडणुकीचा बिगुल निवडणूक आयोगाच्या अगोदर भाजपामधे फुंकला जातो. बिहार निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर पाटणा आणि दिल्लीत भाजपाचा जल्लोष चालू होता, मुंबई- महाराष्ट्रासह देशातील प्रत्येक लहान मोठ्या शहरात भाजपाच्या कार्यालयांसमोर गुलाल उधळला गेला व मिठाई वाटली गेली पण त्याच वेळी पक्षाच्या बिहार हँडलवर वाचायला मिळाले, अब पश्चिम बंगाल की बारी है. जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून दावा करणाऱ्या भाजपाचा अजेंडा काय आहे, याचा शोध घेतला तर देशातील सर्व राज्यात सत्ता काबीज करायची हेच उत्तर मिळेल. एका राज्यात सरकार स्थापन केल्यानंतर दुसऱ्या राज्यात सत्ता कशी स्थापन करता येईल याकडे भाजपाची सर्व यंत्रणा जुंपली जाते. एके ठिकाणी यश मिळाले म्हणून या पक्षात कोणी समाधानी नसते. शतप्रतिशत हेच पक्षाचे ध्येय आहे याचा पुनरूच्चार मोदी शहा- नड्डांनी अनेकदा केला आहे. एका राज्यात सरकार स्थापन केल्यावर पक्षाची यंत्रणा निवांत बसत नाही, हीच या पक्षाची मोठी ताकद आहे.

बिहार निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर दिल्लीतील भाजपाच्या मुख्यालयात पक्ष कार्यकर्त्यांचा विजयी मेळावा झाला. आपल्या गळ्यातील गमचा बाहेर काढून तो हाताने उंच फडकवत मोदी पक्षाच्या मुख्यालयात आले. देशाचा पंतप्रधान पक्षाच्या मेळाव्यात भजपाचा एक कार्यकर्ता म्हणून विजयोत्सव कसा साजरा करतो हे सर्व देशाने बघितले. या मेळाव्यात आपल्या भाषणात मोदी म्हणाले- गंगा जी ( नदी ) , यहां बिहार से बहते हुए बंगाल तक पहुँचती है. बिहार ने बंगाल मे बीजीपी की विजय का रास्ता भी बना दिया है. मैं बंगाल के भाई और बहनोंको आश्वस्त करना चाहता हूँ कि अब बीजेपी आपके साथ मिलकर, पश्चिम बंगाल से भी जंगलराज को उखाड फेकेंगी.

बिहारमधे जंगलराज पुन्हा येईल अशी भिती मोदी- शहांनी त्यांच्या प्रत्येक सभेत मतदारांना घातली होती. आता याच मुद्द्यावरून भाजपा पश्चिम बंगालमधे विधानसभा निवडणूक लढवणार आहे. बिहारमधे जंगलराज निर्माण करणारे लालूप्रसाद यादव होते, लालू राबडीदेवींच्या काळात बिहार जंगलराज बनले होते, सूर्यास्तानंतर कोणत्याही शहरात- गावात सामान्य माणसाला घराबाहेर पडणे मुष्किल होते, आया बहिणींना कुठेही सुरक्षा नव्हती. लुटमार, हत्या, खंडण्यांनी बिहार ग्रासले होते. कायदा सुव्यस्था ढासळली होती. थोडीशी जरी चूक केलीत तर पुन्हा जंगलराज येईल अशी भिती मोदी शहांनी बिहारच्या मतदारांना निवडणूक प्रचारात घातली होती. बिहारमधे लालूप्रसाद यादव व त्यांचा पुत्र तेजस्वी यादव व त्यांचा पक्ष राजद यांना भाजपाने खलनायक ठरवले होते आता पश्चिम बंगालमधे मुख्यमंत्री ममता बनर्जी व त्यांचा पक्ष तृणमूल काँग्रेस यांना खलनायक ठरवायला भाजपाने सुरूवात केली आहे.

**राष्ट्रनामा**



**सुकृत खांडेकर**
०९५९४२२४०००
sukritforyou@ gmail.com

बिहारमधे जंगलराज विरोधात भाजपाने रान पेटवले होते आता पश्चिम बंगालमधे जंगलराज म्हणून आतापासूनच रान पेटवायला सुरूवात झाली आहे. पश्चिम बंगालमधे पुढील वर्षी एप्रिल महिन्यात विधानसभा निवडणूक होण्याची शक्यता आहे म्हणूनच बिहारमधे एनडीएचे सरकार स्थापन होताच भाजपाने बंगालच्या निवडणूक प्रचाराचे फटाके फोडायला सुरूवात केली आहे.

पश्चिम बंगालमधे विधानसभेच्या २९४ जागा आहेत. महाराष्ट्र व बिहार विधानसभेपेक्षा बंगालमधे आमदारांची संख्या जास्त आहे. कोविडनंतर सन २०२१ मधे झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने मोठ्या जिद्दीने बंगालमधे निवडणूक लढवली, भाजपाने आपला पाया विस्तारला व भक्कम केला पण ममता बनर्जी यांच्या नेतृत्वाखाली तृणमूल काँग्रेसचे सरकार या राज्यात सलग तिसऱ्यांदा स्थापन झाले. पाच वर्षापूर्वी झालेल्या निवडणुकीत भाजपाने तृणमूल काँग्रेसला मोठे आव्हान उभे केले होते. ममता बनर्जींनी तब्बल तीन दशकांची मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची राजवट रस्त्यावर संघर्ष करून उधवस्त केली, डाव्या पक्षांना पश्चिम बंगालमधे आपला गाशा गुंडाळण्याची पाळी आणली आता भाजपा ममता यांचे नेतृत्व व त्यांचा तृणमूल काँग्रेस पक्ष यांना नेस्तनाबूत करण्याची तयारी करीत आहे. गेल्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसचे २१५ आमदार निवडून आले होते व भाजपाचे ७७ आमदार विजयी झाले होते. ज्या राज्यात भाजपाचा नामोनिशाणा नव्हता त्या राज्यात आता हजारो कार्यकर्ते भाजपाचे झेंडे हाती घेऊन रस्त्यावर उतरताना दिसत आहेत. गेल्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला ४८ टक्के मते मिळाली होती तर भाजपाला ३८ टक्के मते मिळाली होती. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत या दोन पक्षातच जीवघेणी टक्कर होणार हे निश्चित आहे. बिहारमधे भाजपाने नितीशकुमार यांना बरोबर घेऊन एनडीएची सत्ता पुन्हा काबीज केली आहे. पश्चिम बंगालमधे भाजपाला कोणी मित्र पक्ष नाही, तिथे भाजपाला स्वत:च्या बळावर निवडणूक लढवावी लागणार आहे. बिहारमधे नितीशकुमार सारखा प्रादेशिक नेता भाजपाबरोबर होता, पश्चिम बंगालमधे कोणीही तगडा प्रादेशिक नेता भाजपाबरोबर नाही. म्हणूनच भाजपाला अचूक रणनिती आखून स्वत:च्या कार्यकर्त्यांची फौज घेऊन तृणमूल काँग्रेसशी लढावे लागणार आहे. बिहारमधे भाजपा सत्तेत होती, पश्चिम बंगालमधे सत्ता मिळविण्यासाठी भाजपा गेली अकरा वर्षे ममता बनर्जींच्या विरोधात लढत आहे. पश्चिम बंगालमधे गुंडा राज आहे, कायदा सुव्यवस्था पार ढासळली आहे. सत्ताधारी व भाजपा कार्यकर्त्यामधे सतत राडे चालू असतात. बांगला देशातून मोठी घुसखोरी असून तृणमूल काँग्रेसचे त्यांना संरक्षण आहे, बांगला देशी व रोहिंग्यो मुस्लिमांनी बंगाल पोखरून निघाला आहे. बंगाली भाषिक नागरिकाला या राज्यात जीव मुठीत धरून जगावे लागत आहे, यामुद्द्यांभोवती भोवती भाजपाने आपला प्रचार केंद्रीत केला आहे. बिहारप्रमाणे बंगालमधे जंगलराज थोपवायचे असेल तर कोलकत्याच्या सिंहासनावर भाजपाची सत्ता येणे गरजेचे आहे असे भाजपा सांगत आहे. बिहारप्रमाणे बंगालमधेही जंगलराजचा मुद्दा आक्रमकपणे मांडण्याची भाजपाने रणनिती आखली आहे. जंगलराजचा मुद्दा निवडणुकीत केंद्रस्थानी आणला जात असताना ममता यांना अँटीइन्कबन्सीचा मोठा तडाखा येत्या निवडणुकीत बसला तर भाजपाचा राज्यात सत्ता काबीज करण्याचा मार्ग सुकर होऊ शकतो अशी समिकरणे मांडली जात आहेत. महाराष्ट्र, हरयाणा, दिल्ली , बिहारमधे भाजपाने मुसंडी मारल्यानंतर भाजपाने आपले सारे लक्ष्य आता पश्चिम बंगालवर केंद्रीत केले आहे.

बिहारमधे नितीशकुमार यांच्यामुळे भाजपाला मुस्लिम तसेच मागास व अतिमागास मतदारांनी मतदान केले होते. पश्चिम बंगालमधे मुस्लिम मतदान हे एक गठ्ठा तृणमूल काँग्रेसला मिळते हा आजवरचा अनुभव आहे. मुस्लिम मते भाजपाकडे वळविण्यासाठी भाजपाला या राज्यात एकही मित्र नाही. बिहारप्रमाणे बंगालमधे जातीय व धार्मिक समिकरण सारखे नाही म्हणूनच भाजपाला तृणमूल विरोधात लढताना शिकस्त द्यावी लागणार आहे. एसआयआर ( मतदार यादी सुधारणा ) च्या विरोधात ममता सतत आवाज उठवत आहेत. बिहारमधे एसआयआरनंतर ६५ लाख मतदारांनी नावे वगळण्यात आली तसेच बंगालमधेही घडू शकते. पण तृणमूल काँग्रेसकडे मुस्लिम मतदारांची व्होट बँक व लढाऊ केडर ही दोन साधने मजबूत आहेत.

कुणाल घोष यांनी म्हटले आहे- बंगालचे राजकीय भविष्य हे पाटणा किंवा दिल्लीत लिहिले जात नाही. बंगालमधे भाजपाचे बटेंगे तो कटेंगे धोरण स्वीकारले जाणार नाही. बंगालच्या मतदारांचा विश्वास ममतादीदींवरच आहे. हाच विश्वास २०२६ मधे दिसून येईल.

# दिल्लीमध्ये होणार सनातन राष्ट्राचा शंखनाद!




प्रस्तावना : कधीकाळी सोन्याची खाण म्हणून ओळखला जाणारा भारत फक्त संपत्तीमुळे महान नव्हता, तर त्याच्या सनातन संस्कृती, धर्मनिष्ठ जीवनमूल्ये, शौर्य आणि न्यायाधिष्ठित राज्यकारभारामुळे तो विश्वगुरु बनला होता. आज भारत तांत्रिक आणि सामरिक क्षेत्रात झपाट्याने प्रगती करत आहे. ऑपरेशन सिंदूरद्वारे भारतीय सैन्याने आपली ताकद जगासमोर दाखवली आहे; तरीही देशासमोरची आव्हाने कमी झालेली नाहीत. देश जितक्या वेगाने पुढे जात आहे, तितक्याच वेगाने बाह्य आणि आंतरिक शत्रूंची कारस्थानेही वाढत आहेत. अलीकडील दिल्लीतील बॉम्बस्फोटाने राष्ट्राच्या सुरक्षेला आणि एकतेला गंभीर धोका निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. अशा वेळी केवळ दिखाऊ धर्मनिरपेक्षता आणि मतांसाठी होणारे लांगुलचालन देशाला अधिक कमकुवत करेल. त्यामुळे भारताने पुन्हा एकदा विश्वकल्याणासाठी सनातन राष्ट्र म्हणून उभे राहणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे !



**अभय वर्तक**
**प्रवक्ता, सनातन संस्था**
**(संपर्क : ९९८७९ २२२२२)**

या उद्देशाने सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशनच्या प्रस्तुतीत आणि सनातन संस्थाच्या आयोजनात शंखनाद महोत्सव हा भव्य सोहळा १३ आणि १४ डिसेंबर २०२५ रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम (इंद्रप्रस्थ) येथे आयोजित केला जात आहे. हा कार्यक्रम सनातन संस्थाच्या रौप्यमहोत्सवी वर्षातील एक विशेष पर्व असणार आहे.

ही संधी अधिक महत्त्वाची ठरण्याचे आणखी एक कारण म्हणजे दिल्ली ही फक्त भारताची राजधानी नसून, येथेच राजकीय, प्रशासकीय आणि सामाजिक निर्णयांची दिशा ठरते. येथून प्रसारित होणारा सनातन संस्कृतीचा आणि राष्ट्रभक्तीचा संदेश संपूर्ण देशात प्रभावी प्रतिसाद निर्माण करेल. यामुळे राष्ट्रीय एकता, शौर्य आणि नागरिक चेतना अधिक बळकट होईल. हा महोत्सव धर्मनिष्ठ जीवनमूल्यांचे महत्त्व अधोरेखित करेल आणि अलीकडील दहशतवादी घटनांच्या पार्श्वभूमीवर समाजाला जागरूकता आणि सामूहिक सुरक्षेचा संदेश देईल.

मुख्य कार्यक्रम आणि प्रदर्शनी : मुख्य कार्यक्रम १३ आणि १४ डिसेंबर रोजी भारत मंडपमच्या प्रमुख सभागृहात होईल. सनातन संस्कृती संवाद या परिषदेअंतर्गत सांस्कृतिक, सामाजिक आणि संरक्षणविषयक विविध पैलूंवर चर्चा होईल. एक्झिबिशन हॉल १२-ए मध्ये १३ ते १५ डिसेंबरपर्यंत शिवकालीन प्राचीन शस्त्रप्रदर्शनी आणि संस्कृती प्रदर्शनी भरवली जाईल. या प्रदर्शनीत प्रथमच छत्रपती शिवाजी महाराजांची भवानी तलवार प्रत्यक्ष दर्शनासाठी उपलब्ध होईल. पारंपरिक युद्धकलांचे थेट प्रात्यक्षिकही या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण असेल.

राष्ट्रप्रेरणेचे स्वर : महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी विश्वकल्याणकारी सनातन राष्ट्र या विषयावर विशेष सत्र होईल. यामध्ये नक्षलवाद, दहशतवाद आणि राष्ट्रीय सुरक्षा या विषयांवर तज्ज्ञ विचारमंथन होईल. भारताची संरक्षणनीती, संस्कृतीचे संवर्धन आणि राष्ट्रबळ सुदृढ करण्याचे उपाय यांवर सखोल चर्चा होईल.

सनातन राष्ट्र स्थापनेचे आवाहन : महाभारत युद्धापूर्वी भगवान श्रीकृष्णांनी धर्मयुद्धाची घोषणा शंखनादाने केली होती. त्याच दैवी प्रेरणेने सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांनी ईश्वरी अधिष्ठानावर आधारित सनातन राष्ट्र स्थापनेचे ध्येय निश्चित केले आहे.

दिल्लीतील हा शंखनाद महोत्सव धर्मनिष्ठ समाजात आत्मशक्ती जागृत करून नवचैतन्य निर्माण करेल आणि राष्ट्रसेवेसाठी एकत्र येण्याची प्रेरणा देईल.

छत्रपती शिवाजी महाराजांनी ३५ हजार मुठभर मावळ्यांसह हिंदवी स्वराज्य उभं केलं. जेव्हा प्रत्येक सनातनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यच्या आदर्शाने आणि सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या सनातन राष्ट्राच्या पवित्र संकल्पाने प्रेरित होईल, तेव्हा हा शंखनाद महोत्सव फक्त एक कार्यक्रम न राहता, राष्ट्ररक्षण, सामाजिक ऐक्य व संस्कृतीला नवचैतन्य देणाऱ्या नवयुगाची सुरुवात ठरेल.

# मेळघाटातील कोवळी पानगळ

पूर्व महाराष्ट्राच्या अमरावती जिल्ह्यातील मेळघाट नैसर्गिक साधन संपत्तीने नटलेला प्रदेश आहे.अनेक छोट्या मोठ्या घाटांचा प्रदेश असे मेळघाटाकडे बघून म्हणता येईल.या प्रदेशात शेकडो गावे आहेत.ज्यात आदिवासी जमातींची संख्या मोठ्या संख्येने आहे. नैसर्गिकदृष्ट्या हा भाग अतिदुर्गम आहे. इथल्या बहुविध आदिवासींचा प्रमुख व्यवसाय शेती असला,तरी अन्नाचे उत्पादन पुरेशा प्रमाणात होत नाही. झाडींचा परिसर असून पाऊस भरपूर पडत असला तरी सिंचनाची पुरेशी व्यवस्था नाही. दळणवळण, शिक्षण, विज या मुलभूत सुविधांचा अभाव.अन्नाची विविधता मर्यादित. पोषक अन्नधान्यांचा अभाव. नवजात बालकांच्या शारीरिक विकासासाठी पोषण आहाराचा अभाव. शैक्षणिक प्रगती अत्यल्प. पारंपारिक समजुती व पूर्वग्रहाच्या आधाराने चालणारा समाज काळानुरूप शारीरिक विकासाचा आहाराच्या संबंधीच्या ज्ञानापासून कायम अनभिज्ञच. सार्वजनिक आरोग्यसेवेचा मोठा अभाव,अशा अगणित मूलभूत सोयी, सुविधा,समस्या आणि प्रश्नांच्या गर्तेत असलेला मेळघाट प्रदेश कायम चर्चित असतानाच, कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूचा कलंक मागील तीन दशकांपासून लागलेला आहे. जो विद्यमान परिस्थितीत अधिक गडद होतांना दृष्टीस पडतो.

आदिवासी बहुल दुर्गम प्रदेशात सार्वजनिक आरोग्यसेवा आणि सकस पोषणाचा कुठलाच मेळ नसलेल्या मेळघाटात चालू वर्षात जून महिन्यापासून ते आतापावतो शून्य ते सहा वर्षाच्या बालकांच्या कुपोषणामुळे ६५ बालकांचा मृत्यू झाला. या घटनेची गंभीर दाखल मा. उच्च न्यायालयाने घेऊन मागील तीन दशकांहून अधिक काळापासून सुरू असलेल्या कुपोषणाप्रती चिंता व्यक्त करून, कुपोषण निर्मूलनाच्या संदर्भात राज्य सरकारचा दृष्टिकोन अत्यंत बेजबाबदार असल्याचे खडेबोल राज्य सरकारला सुनावले. मेळघाटातील कुपोषणाच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी उच्च न्यायालयाने २००१ मध्ये मल्टीस्पेशलिस्ट रुग्णालयाच्या उभारणीचे आदेश दिले असतानाही; राज्य सरकारने या प्रकरणी काहीच पावले का उचलली नाहीत?प्राथमिक आरोग्य केंद्र, डॉक्टर,परिचारिका, कर्मचारी का रुजू नाहीत? तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती होऊन ही प्रत्यक्ष कामावर का रुजू होत नाही? गरोदर महिलांसाठी रुग्णवाहिकांची कमतरता आदी प्रश्नांचा भडीमार करून न्यायालयाने कुपोषणाच्या समस्येप्रती उदासीनते बद्दल बेजबाबदार असल्याचा ठपका ठेवण्यात आला.



**शशिकांत मधुकर तोटे**
**दारव्हा, जि. यवतमाळ**
**९१३०८३५४५८**

ज्या ज्या वेळी मेळघाटातील कुपोषणाचा प्रश्न न्यायालयाकडे जातो, त्यावेळी कुपोषणाची चर्चा अधिक होत असते. अन्य अन्यवेळी फारशी चर्चा अथवा वाच्यता होत नाही, हेच मोठे मेळघाटचे दुर्दैव आहे.गतवर्षी अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा आणि धारणी आदिवासी बहुल तालुक्यात दहा हजारांवर बालके कुपोषित असल्याचे वृत्त सरकारी आकडेवारीद्वारे प्रसिद्ध झाले होते. कुपोषण कमी करण्याच्या संदर्भात केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना राज्यात कार्यान्वित असून सुद्धा कुपोषणामुळे बालमृत्यूची दाहकता कमी होत नाही.या उलट हे चित्र अधिकच भयावह होत आहे. या प्रश्नी मा. उच्च न्यायालय गंभीर चिंता व्यक्त करते. मेळघाटात मागील पंचवीस- तीस वर्षांपासून स्वयंसेवी संस्था प्रत्यक्ष कार्य करीत आहे. मेळघाटातील कुपोषणाच्या विरोधातला लढा दीर्घ काळापासून आजतागत सुरूच आहे.१९९३ च्या सुमारास एका महिला पत्रकाराने दाखल केलेल्या जनहित याचिकेनंतर मेळघाटातील कुपोषणाने होणारे बालमृत्यूची तीव्रता उजेडात आणल्या होत्या. यात पद्मश्री डॉ. अभय बंग आणि सहकाऱ्यांनी बालकुपोषणाच्या संदर्भात अभ्यासांती कुपोषणाची कोंडी फोडली होती. डॉ.बंग दांपत्य 'सर्च' या संस्थेच्या माध्यमातून गडचिरोली जिल्ह्याच्या आदिवासी भागात लोक आरोग्याच्या प्रश्नावर कार्य करतात. डॉ. बंग व त्यांच्या सहकाराच्या मार्गदर्शनात महाराष्ट्राच्या ग्रामीण आणि आदिवासी भागात बालमृत्यू मोजण्याचा महत्त्वाकांक्षी अभ्यास अभ्यास गट केला होता. ज्याद्वारे सरासरी राज्यात लाखो बालमृत्यू होतात असा अहवाल तयार केला होता. ज्यात बालके कुपोषणाकडे कशी वळतात हे शासनद्वारी निदर्शनास आणून दिले होते; त्याचे प्रमाण कसे कमी करता येईल यावरही उपाययोजना सांगितल्या होत्या. हा अहवाल पुढे केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयात दाखल ही झाला होता. त्यात दर्शविलेल्या शिफारसी शासनाने स्वीकारल्यात.

डॉ. बंग यांच्या संशोधना सोबतच आज असंख्य स्वयंसेवी संस्था मेळघाटातील कुपोषण निर्मूलनाच्या संदर्भात संवेदनशीलतेने कार्यरत आहे.बाल कुपोषण कमी करण्याच्या संदर्भात राज्य आणि केंद्र सरकारच्या अनेक योजना कार्यान्वित आहेत, तरीसुद्धा कुपोषणाची तीव्रता हे दिवसेंदिवस वाढतच आहे. एकीकडे देश तिसरी महासत्ता होण्याच्या दिशेने घौडदौड करीत असल्याचे मोठी चर्चा होत असतानाच, त्याचवेळी देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे झाली तरी मेळघाटातील मूलभूत सोयी सुविधांची पूर्तता न होणे; आरोग्यसेवेच्या अभावामुळे कोळी पानगळ होणे अत्यंत दुःखदायी व विसंगत घटना घडणे दुर्दैवी आहे. या प्रश्नी न्यायालयाकडून वेळोवेळी कान उघडणी होणे अत्यंत लाजिरवाणे आहे. मेळघाटातील असुविधा आद्यदर्शनी आहेत. त्यावरील उपाययोजना, कारण मीमांसा, पुरेसा निधी, पात्र मनुष्यबळ, पोषण आहार पूर्ततेची सज्जता असतानाही मेळघाटातली कोवळी पानगळ रोखण्यास अक्षम्य उदासीनता आहे.जो पर्यंत ही उदासीनता दूर सारल्या जाणार नाही, तोपर्यंत निरागसांची पानगळ कायमच राहील..? आणि किती काळापर्यंत..?

# आरक्षणाच्या बाबतीत घोळ का? सरकारने कायद्याचा सल्ला का घेतला नाही?

देशातील कोणतीही सरकार असो,सरकार म्हटले की,राज्याची व तेथील जनतेची मोठी जबाबदारी सरकारवर व सत्ताधाऱ्यांवर असते.परंतु राजकीय पोळी शेकण्यासाठी स्वमताने आरक्षण जाहीर करणे किंवा कोणतेही काम करणे हा तर कायद्याने मोठा गुन्हा आहे असे मला वाटते. विरोधक किंवा याचिका करता प्रत्येक सरकारच्या किंवा सत्ताधाऱ्यांच्या चुका काढत असतात आणि काढल्याच पाहिजे कारण हा लोकशाहीचा अधिकार आहे. परंतु आरक्षण जाहीर करतांना सरकारने कायदा,विरोधक, सामाजिक संघटना, बुध्दीजीवी, समाज यांच्याशी सविस्तर चर्चा किंवा विचार-विमर्श का केली नाही? सरकारने कायद्याच्या चौकटीत राहून जर आरक्षण जाहीर केले असते तर सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला आरक्षणाचा सवालच केला नसता.माझ्या माहिती नुसार ओबीसी - २७ टक्के आरक्षण,एसी-१३ टक्के आरक्षण, एसटी -७ टक्के आरक्षण आणि एनटी/व्हिजे-३ टक्के आरक्षण अशाप्रकारे एकुण ५० टक्के आरक्षणाची मर्यादा कायद्यानुसार ठरविण्यात आली आहे.परंतु कायद्याचा किंवा सर्वोच्च न्यायालयाशी सल्लामसलत न करता सरकारने आपल्या मर्जीने होवून घातलेल्या निवडणुकीमध्ये आरक्षण जाहीर केले ही तर सरळ-सरळ कायद्याची पायमल्लीच म्हणावी लागेल. राज्यातील ४२ नगरपंचायती आणि २४६ नगरपरिषद निवडणुकीत आरक्षणाच्या घोळामुळे टांगती तलवार आजही कायम असल्याचे दिसून येते.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आरक्षणाने ५० टक्के मर्यादा ओलांडल्याने सुप्रीम कोर्टाने नाराजी व्यक्त केली आहे.सरकारने ८३ पंचायत समित्या,१७ जिल्हापरिषदा, ५७ नगरपालिका, आणि २ महानगरपालिका अशाप्रकारे १५९ ठिकाणी ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याची बाब समोर आली आहे. आदिवासीबहुल स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.नंदुरबार जिल्हा परिषदेमध्ये एकूण आरक्षण १०० टक्के, पालघरमध्ये ९३ टक्के, गडचिरोली ७८ टक्के, धुळे ७३ टक्के, नाशिक ७२ टक्के तर अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ, अकोला जिल्हा परिषदांमध्ये ६० ते ७० टक्के दरम्यान आरक्षण लागू झाले आहे. नागपूर, ठाणे, वाशिम, नांदेड, जळगाव, हिंगोली, वर्धा आणि बुलढाणा या आठ जिल्हा परिषदांमध्ये ५१ ते ६० टक्के दरम्यान आरक्षण देण्यात आले आहे. या आरक्षणाच्या विरोधात २८ याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत.सरकारने जर आरक्षणाचा घोळ निर्माण केला नसता तर हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात गेलाच नसता.परंतु सरकारने आरक्षणाला व नियमाला काडीमोड केल्याने हा मुद्दा उपस्थित झालेला आहे हे स्पष्ट दिसून येते.निवडणूक आयोग सुध्दा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रतिक्षेत आहे. मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबरला सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालय काय निर्णय घेते याकडे राज्य निवडणूक आयोगासह सर्वांचेच लक्ष लागले आहे.न्यायालयाची पुढील सुनावणी पार पडेपर्यंत निवडणूक आयोगाकडून जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाणार नाही असे चित्र दिसत आहे.सरकारच्या चुकीमुळे निवडणुकांची अनिश्चितता निर्माण झाली आहे.यामुळे राजकीय पक्ष व इच्छुक उमेदवार यांची परिस्थिती तळ्यात नि मळ्यात झाल्याची दिसून येते. भारतात लोकशाही आहे त्यामुळे सरकारने कायद्याचा व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा सन्मान करावा व भविष्यात अशाप्रकारेचे घोळ किंवा चुका निर्माण होणार नाही याची काळजी सरकारने घ्यावी.जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार) नागपूर.**
**मो.नं.९९२१६९०७७९**

# गुरु तेग बहादूर : मानवतेचे रक्षक

भारतीय संस्कृतीचा आणि मानवतेच्या इतिहासाचा अभ्यास करताना काही व्यक्तिमत्त्वे अशी भेटतात की ज्यांचे जीवन, विचार, आणि बलिदान केवळ एका धर्मापुरते मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी ठरते. अशाच तेजस्वी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे शीख धर्माचे नववे गुरु गुरु तेग बहादूर होते. २४ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण भारत देश त्यांच्या बलिदानाची, त्यांच्या मूल्यांची आणि त्यांच्या अद्वितीय मानवतावादी विचारांची स्मृती जागवतो. हा दिवस केवळ एका धार्मिक गुरूच्या हौतात्म्याचा दिवस नाही, तर मानवी हक्क, धार्मिक स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि आत्मगौरवासाठी प्राणार्पण करणाऱ्या महापुरुषाचा वैश्विक स्मरणदिन आहे.

गुरु तेग बहादूर यांचे संपूर्ण जीवन हे सामाजिक बांधिलकी, समता, दीनदुबळ्यांचे रक्षण, शांतता, अध्यात्म आणि संघर्षातील धैर्याचे प्रतीक आहे. इतिहासात अनेक योद्धे लढले, अनेक सम्राटांनी सत्ता मिळवली, अनेक विद्वानांनी ज्ञान दिले, परंतु एखाद्याच्या धर्म, संस्कृती आणि श्रद्धेचे रक्षण करण्यासाठी स्वतःचा जीवदान देणारी व्यक्ती विरळच आढळते. गुरु तेग बहादूर यांचे बलिदान हा जगाच्या इतिहासात अभूतपूर्व प्रसंग आहे.

गुरु तेग बहादूर यांच्या काळातील भारत देश हा राजकीय संघर्ष, धार्मिक अंधश्रद्धा, जातिभेद, आणि अत्याचाराच्या छायांनी वेढलेले होता. मुगल सत्तेचा प्रभाव वाढत होता, आणि औरंगजेब धर्मांतराच्या धोरणातून इस्लामीकरणाचा प्रसार करू इच्छित होता. हिंदू, जैन, सूफी, बौद्ध आणि अनेक समुदायांवर धर्मांतराचा दबाव वाढत होता. काश्मीरच्या विद्वान पंडितांनी आपल्या अस्तित्वाच्या रक्षणासाठी दिल्ली नव्हे, तर पंजाब गाठले आणि तेथे त्यांनी आशेचा किरण म्हणजे गुरु तेग बहादूर यांना भेटले. त्यांच्या वेदनादायी कथा ऐकून गुरुजींनी जो निर्णय घेतला, तो इतिहासातील सर्वात मोठा न्याय, स्वातंत्र्य आणि मानवतेचे रक्षण करणारा निर्णय ठरला.

गुरु तेग बहादूर यांनी समतेवर आधारित समाज बांधण्यासाठी श्रद्धेची शक्ती, क्षमेचे दर्शन आणि न्यायाची भावना जोपासली. त्यांच्या शिकवणींमध्ये भीतीवर मात हे केंद्रस्थानी होते. स्वतःच्या ग्रंथांत त्यांनी लिहिले आहे की जो डरता नाही, जो दुसऱ्याला घाबरवत नाही, तोच खरा ज्ञानी आणि मुक्त आहे. त्यांचा संदेश स्पष्ट होता की मनुष्याने मुक्त जगावे. त्याची श्रद्धा, अस्तित्व आणि स्वाभिमानावर कुणाचाही अंमल चालू नये. त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू समाजाचा सर्वांगीण विकास हा होता. अनेक स्थळी त्यांनी गुरुद्वारे स्थापन करून लंगर या परंपरेला अधिक बळ दिले. लंगर ही केवळ भूक भागविण्याची पद्धत नव्हती, तर समता, बंधुता आणि जातिनिरपेक्ष सामाजिक एकतेचा प्रयोग होता. त्या काळातील जातिव्यवस्थेच्या कठोरतेला धक्का देणारी ही सामाजिक क्रांतीच होती. एका थाळीत श्रीमंत-गरीब, हिंदू-मुस्लिम, ब्राह्मण-शूद्र, राजा-प्रजा सगळ्यांनी बसून भोजन करणे हा एक मौन सामाजिक संदेश होता. या संदेशामधून मानवात भेद नाही. हे स्पष्ट होत होते.

गुरु तेग बहादूर यांची समाजकार्याची दृष्टी केवळ धार्मिक मर्यादांपुरती नव्हती. त्यांनी अनेक गावांत विहिरी, तलाव, रस्ते, विश्रामगृहे आणि आश्रयधामे बांधली. त्यांच्या शिकवणीत मानवी समतोल, मानसिक शांती आणि सामाजिक जबाबदारी या तीन स्तंभांचा प्रभाव दिसून येतो. त्यांनी लोकांना ध्यान, संयम आणि निष्ठेने जीवन जगण्याची प्रेरणा दिली.

त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ अध्यात्मिक नव्हते; ते एक शूर योद्धेही होते. त्यांच्या बालपणातच गुरु हरगोबिंद साहिब यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शौर्य, अस्त्र-शस्त्र प्रशिक्षण आणि राष्ट्रसेवेचे धडे घेतले. त्यामुळेच, जेव्हा स्वातंत्र्यावर गदा येत होती, तेव्हा त्यांनी मौन साधना नाही केली, तर थेट अन्यायाच्या विरोधात उभे राहण्याचा निर्णय घेतला. आणि मग आला इतिहासातील अंधाऱ्या अत्याचारांचा क्षण. जेव्हा काश्मीरी पंडितांच्या धर्मरक्षणासाठी त्यांनी स्वतःचा जीव अर्पण करण्याचे ठरवले. त्यांनी औरंगजेबाला स्पष्ट संदेश दिला होता की, जर मी धर्मांतर केले तर लाखो हिंदू धर्मांतर करतील, आणि जर मी प्राण दिले तर भविष्यात कोणीही धर्मावर अत्याचार करण्याचे धाडस करणार नाही.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
मो. ९९६०१०३५८२,
ईमेल :
bagate.rajendra5@gmail.com

दिल्लीच्या लाल किल्ल्याच्या कारागृहात त्यांच्यावर अत्याचार करण्यात आले, पण त्यांनी धर्म, न्याय आणि स्वातंत्र्य यांची बाजू सोडली नाही. २४ नोव्हेंबर १६७५ रोजी दिल्लीतील चांदणी चौकात त्यांचा शिरच्छेद करण्यात आला. आज त्या ठिकाणी उभे असलेले गुरुद्वारा शीश गंज साहिब हे केवळ धार्मिक स्थळ नाही तर ते मानवी हक्कांचे आणि स्वातंत्र्याचे स्मारक आहे. त्यांच्या बलिदानाचा प्रभाव भारतीय समाजात आणि जगभरातील मानवतावादी विचारांतून दिसून येतो. भारताच्या संविधानात अंतर्भूत असलेल्या धर्मस्वातंत्र्याच्या अधिकाराचा बीजकण गुरु तेग बहादूर यांच्या बलिदानातूनच उगवलेला दिसतो. ते जगाला शिकवून गेले की स्वत:साठी जगणारा सामान्य असतो, परंतु दुसऱ्याच्या स्वाभिमानासाठी प्राण देणारा अमर असतो.

आजच्या काळात गुरु तेग बहादूर यांचे जीवन आपल्याला काही महत्त्वपूर्ण मूल्ये सांगते, ते म्हणजे समाजाला समता हवी, भीती नव्हे; संवाद हवा, संघर्ष नव्हे; मानवता हवी, हिंसा नव्हे; मन मुक्त हवे, शरीर नाही.

धार्मिक स्वातंत्र्याच्या नावाखाली अजूनही जगात हिंसा घडते. जात, धर्म, वंश, भाषा यावरून अजूनही संघर्ष होतात. अशा काळात गुरु तेग बहादूर यांचे बलिदान आपल्याला आठवण करून देते की मानवता सर्वात श्रेष्ठ धर्म आहे. त्यांचे बलिदान हा केवळ इतिहासातील प्रसंग नाही तर तो न्याय, स्वातंत्र्य, विविधता आणि मानवतेच्या स्वीकाराचा एक जिवंत संदेश आहे.

आज, त्यांच्या शहीद दिनानिमित्त भारतासह जगभरातील समाज एक प्रश्न विचारतो की आपण मानवतेचे रक्षण करण्यासाठी कितपत तयार आहोत? गुरु तेग बहादूर आपल्याला शिकवतात की समाजातील दुर्बल, शोषित, पीडित वर्गासाठी आवाज उठवणे ही केवळ जबाबदारी नाही तर ते एक मानवी कर्तव्य आहे. त्यांच्या जीवनाने दाखवून दिले की धर्म म्हणजे इतरांचा धर्म नष्ट करणे नव्हे, तर प्रत्येकाच्या श्रद्धेचा सन्मान करणे होय. त्यांचे स्मरण केवळ धार्मिक नाही तर ते राष्ट्रीय, सामाजिक आणि मानवतावादी वारसा आहे. आजचा दिवस हा केवळ त्यांच्या शहादतीचा स्मरणदिन नाही, तर त्यांच्या विचारांचे पुनरुज्जीवन करण्याचा दिवस आहे.

गुरु तेग बहादूर यांचे जीवन हे जळणारे दीप आहे जे अंधारातही प्रकाश देते, भीतीतही आत्मविश्वास देते, आणि संघर्षातही सत्य न सोडण्याची प्रेरणा देते. या महान विभूतीला विनम्र अभिवादन.

**वाचक लिहितात**

# टिपू सुलतानविषयी आस्था अनाकलनीय

शासकीय परिपत्रकात कोणताही उल्लेख नसताना बीड जिल्ह्यातील माजलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत टीपू सुलतानची जयंती साजरी करण्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या राज्यातील हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी हे राष्ट्रद्रोही कृत्य असल्याचे सांगत त्यासाठी जबाबदार असलेल्या शिक्षक, आयोजक आणि शिक्षण अधिकाऱ्यांवर तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. टिपू सुलतानची जयंती साजरी करण्यावरून विविध राज्यांत दरवर्षी वाद होत असतात. संजय खान निर्मित द स्वोर्ड ऑफ टिपू सुलतान ही मालिका मध्ये दूरदर्शनवर झळकली होती. त्यामध्ये टिपू सुलतानच्या कथित पराक्रमाचे आणि लोकप्रेमाचेच दर्शन घडल्याने पडद्यामागील खरा टिपू सुलतान लोकांसमोर कधी आलाच नाही. मालिका नियमित पाहणाऱ्या काही महाभागांनी त्यावेळी टिपू सुलतानची तुलना थेट छत्रपती शिवाजी महाराजांशी केली होती. इतिहासकारांच्या मते टिपू सुलतान हा एक धर्मांध राजा होता. मैसूरची सत्ता हाती आल्यानंतर त्याने सर्वप्रथम मैसूरला मुस्लिम राज्य घोषित केले. मंत्रिमंडळातील हिंदूंना पदच्युत करून त्या ठिकाणी मुस्लिमांची नियुक्ती केली. हिंदूंवर अत्याचार करण्यासाठी काही लाखांची फौज त्याने नेमली होती. ही फौज हिंदूंची मंदिरे उध्वस्त करत, सरसकट गोहत्या करत, तलवारीच्या धाकावर हिंदूंचे धर्मांतर करत, हिंदू स्त्रियांवर अत्याचार करत .समाजासाठी पर्यायाने राष्ट्रासाठी आदर्श असणाऱ्या व्यक्तिमत्त्वांच्या जयंती आणि पुण्यतिथी शाळा महाविद्यालयांत साजऱ्या केल्या जाऊन त्यानिमित्ताने त्यांच्या गौरवशाली चरित्रांची ओळख विद्यार्थ्यांना केली जावी असा प्रघात असताना क्रूरकर्मा टिपू सुलतानची जयंती साजरी करून शाळेने विद्यार्थ्यांसमोर चुकीचे आदर्श उभे करण्याचा प्रयत्न केला आहे टिपू सुलतान पराक्रमी होता यात वाद नाही ; मात्र त्याचा हा पराक्रम केवळ आपली सत्ता वाढवण्यासाठी होता.भारत धर्मनिरपेक्ष राष्ट्र असले, तरी इथे हिंदू बहुसंख्य असल्याने हिंदूंवर अनन्वित अत्याचार करणाऱ्या टिपू सुलतानविषयी काही भारतीयांत असलेली आस्था अनाकलनीय आहे.

**सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

# चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडून विद्यार्थी हिताच्या योजनांचा आढावा

**नागपूर, २३ नोव्हेंबर :** राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी (दि.२२ नोव्हेंबर) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठास भेट देऊन विद्यार्थिपयोगी योजनांचा आढावा घेतला. तसेच विद्यार्थिनींना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या सूचना ही त्यांनी या बैठकीत दिल्या. तसेच, विद्यार्थी हिताच्या योजना विद्यार्थ्यांपर्यंत व्यापक प्रमाणात पोहोचाव्यात म्हणून नोडल ऑफिसरची नेमणूक करण्याच्या सूचना ही त्यांनी या बैठकीत केल्या.

यावेळी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे (भाप्रसे), उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, कला महासंचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, शिक्षण उपसंचालक डॉ. संतोष चव्हाण, डॉ. मनोज डायगव्हाणे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. मेधा कानेटकर, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. राजश्री वैष्णव, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. उमेश पलीकुंडवार, आयआयएल संचालक डॉ. प्रकाश इटणकर, आयक्यूएसी संचालक डॉ. नंदकिशोर करडे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. मनीष झोडपे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. विजय खंडाळ यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

राज्यात मुलींना उच्चशिक्षण मोफत करीत शिक्षण तसेच परीक्षा शुल्क शासनाने माफ केले असताना विद्यार्थिनींकडून शुल्काची वसुली केल्या जात असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहे. विद्यार्थिनींवर शुल्काचा बोजा पडू नये म्हणून शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्कासह इतर शुल्काचा भरणा करण्याचे देखील शासनाच्या विचाराधीन असून, कमवा आणि शिका योजनेच्या माध्यमातूनही गरीब कुटुंबातील मुलींना शिक्षणासाठी मदत करण्याबाबतचा ही प्रस्ताव विचाराधीन असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.



श्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, महाविद्यालयात प्रवेश घेते वेळीच शिष्यवृत्तीचा अर्ज तसेच आवश्यक कागदपत्र विद्यार्थ्यांकडून घेतले जाणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांना परत अर्ज करण्याची गरज राहणार नाही. त्यामुळे शिष्यवृत्तीची महाविद्यालयांकडून असलेली मागणी देखील तातडीने कळेल आणि शासनाकडून शिष्यवृत्तीची रक्कम वितरित करता येईल, असे श्री. पाटील यांनी सांगितले. अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना १५ लाख रुपयांचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून दिल्या जाते. शासनाच्या अशा विविध योजनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगाराचे साधन प्राप्त होईल. कमवा व शिका योजना, अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळ अशा योजना विद्यार्थ्यांपर्यंत व्यापक प्रमाणात पोहोचाव्यात म्हणून नोडल ऑफिसरची नेमणूक करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

विद्यापीठ परीक्षा प्रणालीतील समस्या कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी समाधान शोधण्याचे आवाहन त्यांनी केले. या सोबतच विद्यापीठाचे एनआयआरएफ रँकिंग, नॅक रँकिंग, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (NEP २०२०) प्रभावी अंमलबजावणी, संलग्न महाविद्यालयांचे नॅक रँकिंग मधील प्रमाण वाढविणे, एईडीपी अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांचे अधिकाधिक प्रमाण वाढविणे तसेच स्वायत्त महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रम सुरू करणे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती, संशोधन प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देणे यासह विविध बाबींचा आढावा श्री. पाटील यांनी घेतला.

सेवा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर संपूर्ण माहिती उपलब्ध करून देत यावरून विद्यार्थ्यांना विविध प्रमाणपत्र योजनांचा लाभ देण्याच्या सूचना उच्चशिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केल्या. मुख्यमंत्री कार्यालयाकडून या योजनेचे नियंत्रण होत असल्याचे देखील त्यांनी सांगितले. या सोबतच विद्यापीठांच्या स्वायत्त विभागांचे रँकिंग, यूडीआरएफ रँकिंग बाबत तातडीने कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. बैठकीच्या सुरुवातीला कुलगुरू महोदयांनी माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री चंद्रकांतदादा पाटील यांचे स्वागत केले.

यावेळी आयक्यूएसी संचालक डॉ. नंदकिशोर करडे यांनी विद्यापीठाच्या वतीने सादरीकरण केले. बैठकीचे संचालन व उपस्थित यांचे आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले.

## मैक्स सुपर स्पेशियलिटी हॉस्पिटल नागपूरला द वीक हंसा रिसर्च सर्व्हे २०२५ मध्ये सर्वोत्कृष्ट मल्टीस्पेशियलिटी हॉस्पिटलचा मान मिळाला

*नागपूर, २३ नोव्हेंबर : नागपूर येथील मैक्स सुपर स्पेशियलिटी हॉस्पिटलला प्रतिष्ठित द वीक-हंसा रिसर्च सर्व्हे २०२५ मध्ये सर्वोत्कृष्ट मल्टीस्पेशियलिटी हॉस्पिटल (खाजगी) म्हणून आपले नंबर १ रँकिंग जाहीर करताना अभिमान वाटत आहे. ही मान्यता हॉस्पिटलच्या प्रगत आरोग्यसेवा, वैद्यकीय उत्कृष्टता आणि रुग्ण-केंद्रित सेवांबद्दलच्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेला अधोरेखित करते. पूर्वी अॅलेक्सिस हॉस्पिटल म्हणून ओळखले जाणारे आणि आता मैक्स हेल्थकेअरचा भाग असलेले हे हॉस्पिटल, सलग सहा वर्षांपासून द वीक-हंसा रिसर्च सर्व्हेमध्ये मल्टीस्पेशियलिटी हॉस्पिटल (खाजगी) म्हणून नंबर वन वर आहे.*

*द वीक-हंसा रिसर्च सर्व्हे हे भारतातील सर्वात विश्वासार्ह आरोग्यसेवा मूल्यांकनांपैकी एक आहे, ज्यामध्ये हॉस्पिटलची संपूर्ण प्रतिष्ठा, डॉक्टरांची वैद्यकीय कौशल्ये, पायाभूत सुविधा, संशोधन, नवोन्मेष आणि रुग्णसेवा यासारख्या प्रमुख निकषांवर हॉस्पिटलचे मूल्यांकन केले जाते. हे रँकिंग देशभरातील आरोग्यसेवा तज्ञांच्या प्राथमिक सर्वेक्षणावर आधारित असते, ज्यामध्ये त्यांच्याशी संबंधित असलेल्या संस्थांचे मूल्यांकन वगळले जाते.*

*या यशाबद्दल बोलताना, मैक्स हॉस्पिटल, नागपूरचे व्हाइस प्रेझिडेंट हॉस्पिटल ऑपरेशन्स श्री घनश्याम गुसानी यांनी म्हणाले, हा पुरस्कार आमच्या टीम्सच्या रुग्णसेवेत दाखविलेल्या समर्पण आणि वैद्यकीय उत्कृष्टतेची दखल घेतो. आमचे लक्ष नेहमीच रुग्णांची सुरक्षा, सहानुभूतिशील आणि उच्च दर्जाची अनुभवदायक सेवा प्रदान करण्यावर असते. प्रत्येक संवाद आणि प्रत्येक वैद्यकीय प्रक्रिया ही गुणवत्तापूर्ण काळजी घेण्याची आमची वचनबद्धता पुन्हा सिद्ध करण्याची संधी आहे. श्री गुसानी पुढे म्हणाले, आमच्यासाठी हा पुरस्कार फक्त रँकिंग नाही, तर हजारो कुटुंबांबद्दल असलेल्या आमच्या जबाबदारीची आठवण आहे, जे उपचार, आराम आणि मन:शांती शोधण्यासाठी आमच्या हॉस्पिटलमध्ये येतात. हा पुरस्कार आमच्या सेवेची कटिबद्धता आणखी मजबूत करतो, जी फक्त वैद्यकीय दृष्ट्या उत्कृष्ट नाही तर मानवी दृष्टीनेही काळजी घेणारी आहे. नागपूर येथील मैक्स हॉस्पिटल, या उपलब्धिमध्ये योगदान दिल्याबद्दल त्यांच्या वैद्यकीय टीमचे, रुग्णांचे आणि भागीदारांचे आभार मानते आणि सर्वांना सुलभ, सर्वसमावेशक आणि सहानुभूतिपूर्ण आरोग्यसेवा देण्याचे त्यांचे ध्येय पुढे चालू ठेवण्यास उत्सुक आहे.*

## सूर्यदत्ता ग्रुप ओफ इन्स्टिट्यूटला महात्मा फुले राष्ट्रीय आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार जाहीर

**पुणे, २३ नोव्हेंबर :** शिक्षण क्षेत्रातील अग्रणी असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांनी समाज स्वत:चे अढळ स्थान निर्माण करणाऱ्या पुणे येथील सूर्यदत्ता ग्रुप ओफ इन्स्टिट्यूट या शिक्षण संस्थेस अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचा यंदाचा महात्मा फुले राष्ट्रीय आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार जाहीर झाला आहे याची घोषणा साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष

डॉ.शरद गोरे यांनी केली आहे या पुरस्काराचे वितरण पुणे येथील महात्मा फुले सांस्कृतिक भवन येथे २३ नोव्हेंबर रोजी संपन्न होणाऱ्या १९ व्या अखिल



भारतीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलनात होणार आहे, सूर्यदत्ता शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.संजय चोरडिया यांनी समाजातील गरीब विद्यार्थ्यांना सदोदित शिक्षणासाठी मोठी मदत केली आहे गेली अनेक दशके त्यांचे हे कार्य अविरतपणे सुरू आहे याच कार्याची दखल घेऊन त्यांच्या शिक्षण संस्थेची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे,सुप्रसिद्ध साहित्यिक किशोर टिळेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या या साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने साहित्यिक व रसिक उपस्थित राहणार आहेत दत्तात्रय भोंगळे संमेलाचे स्वागताध्यक्ष असून सुनील लोणकर निमंत्रक पद भूषवणार आहेत.

## क्रोमाचा ब्लॅक फ्रायडे सेलः सर्व श्रेणींमध्ये ५०%* पर्यंत सूट

**नागपूर, २३ नोव्हेंबर :** भारतातील आघाडीचे ओम्नी-चॅनेल इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर क्रोमाने त्यांच्या वार्षिक ब्लॅक फ्रायडे सेलची घोषणा केली आहे. यामध्ये सर्व उत्पादन श्रेणींमध्ये ५०% पर्यंत मोठ्या प्रमाणात सूट दिली जात आहे. क्रोमाचा ब्लॅक फ्रायडे सेल २२ नोव्हेंबरपासून सुरू होईल आणि ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत चालेल.

क्रोमा देत आहे उत्तम संधी, नवीन वर्षाच्या आधी स्मार्ट खरेदी करण्याची आणि मोठी बचत करण्याची! स्मार्टफोन, लॅपटॉप, टीव्ही, वॉशिंग मशीन, ऑडिओ गियर आणि घरगुती उपकरणांवर आकर्षक डील उपलब्ध आहेत.

इन्फिनिटी रिटेल लिमिटेडच्या प्रवक्त्याने सांगितले की, ब्लॅक फ्रायडे हा आता भारतातील सर्वात लोकप्रिय आणि बहुप्रतिक्षीत शॉपिंग वीकपैकी एक बनला आहे आणि या वर्षी आम्ही किंमतीतील अर्थपूर्ण घट आणि सोप्या पेमेंट पर्यायांवर लक्ष केंद्रित केले आहे, जेणेकरून ग्राहक आत्मविश्वासाने अपग्रेड करू शकतील. ऑनलाइन आणि स्टोअरमध्ये उपलब्ध असलेल्या उत्पादनांची विस्तृत श्रेणी आणि असंख्य एक्सचेंज ऑफर, बँक ऑफर आणि ईएमआय फायद्यांसह, आम्ही खरेदीदारांना योग्य किमतीत योग्य उत्पादन शोधण्यात मदत करण्यासाठी सज्ज आहोत. ग्राहक भारतातील क्रोमा स्टोअर्समध्ये, www.croma.com वर ऑनलाइन किंवा टाटा नेउ अॅपद्वारे सर्व ब्लॅक फ्रायडे ऑफरचा लाभ घेऊ शकतात.


*ही ऑफर फक्त सहभागी बँकांनी देऊ केलेल्या लागू कॅशबॅक ऑफर किंवा सवलतींसह उपलब्ध आहे. उत्पादने एक्स्चेंजसाठी पात्र असल्यास, या ऑफरमध्ये जुन्या उत्पादनांसाठी एक्सचेंज मूल्य देखील समाविष्ट असू शकते. ही ऑफर फक्त निवडक ब्रँड, उत्पादन श्रेणी आणि श्रेणींवर वैध आहे. ऑफर स्टोअर आणि शहरानुसार बदलू शकते. अटी आणि शर्ती लागू.

## वेदश्री तपोवनात गीता जयंती महोत्सवाचे आयोजन

**नागपूर, २३ नोव्हेंबर :** वेदश्री तपोवन कार्य समितीसह सहयोगी संस्थांतर्फे श्रीमद् भगवद्गीता जयंती निमित्त तीन दिवसीय गीता जयंती महोत्सव आळंदीत आयोजित करण्यात आला आहे. आळंदी मोशी येथील वेदश्री तपोवन येथे दि. २९, ३० नोव्हेंबर आणि १ डिसेंबर रोजी हा महोत्सव होणार आहे. महोत्सवाचे यजमान पुण्याचे प्रसिद्ध उद्योजक आणि महर्षि वेदव्यास प्रतिष्ठानचे ट्रस्टी श्री अभय सुरेशकुमार भुतडा हे आहेत.

या निमित्ताने गीता परिवारातर्फे पुणे जिल्हा स्तरावर शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन दि. २२ ते २७ नोव्हेंबर २०२५ या काळात केले आहे. विजेत्यांना पारितोषिके महोत्सवातच प्रदान केली जातील.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी दि. २९ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता ब्रह्मचारी हनुमान चैतन्य महाराज यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. यावेळी श्रीराम जन्मभूमि न्यास अयोध्या चे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज उपस्थित राहणार आहेत. तर, सकाळी ११ वाजता उद्घाटन सोहळा असून या कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि आळंदीचे ह.भ.प. डॉ. नारायण महाराज जाधव हे उपस्थित राहणार



आहेत. सायंकाळी वारकरी साधक सन्मान आणि ह.भ.प. डॉ. यशोधन महाराज साखरे यांचे कीर्तन होणार आहे.

दुसऱ्या दिवशी दि. ३० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता वेदश्री तपोवन द्वितीय चरण निर्माण शुभारंभ पूजन आणि महर्षी वेदव्यास पुरस्कार प्रदान सोहळा होईल. यावेळी कांची कामकोटी जगद्गुरू शंकराचार्य अनंतश्री विजयेंद्र सरस्वती महाराज आणि लोकसभेचे सभापती ओम बिर्ला हे उपस्थित राहणार आहेत. राजस्थान पत्रिका चे मुख्य संपादक गुलाबचंद कोठारी यांना पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. तर, सायंकाळी ह.भ.प. डॉ. मकरंदबुवा रामदासी यांची कीर्तनसेवा होईल.

तिसऱ्या दिवशी दि. १ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते ११ श्रीमद्भगवद्गीता पारायण आणि संत श्री ज्ञानेश्वर पुरस्कार प्रदान कार्यक्रम होणार आहे. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते ह.भ.प. शांतिब्रह्म मारुती महाराज कु-हेकर यांना संत श्री ज्ञानेश्वर पुरस्कार आणि सी.एस. रंगराजन यांना स्वामी विवेकानंद पुरस्कार देण्यात येईल. यावेळी गीताधर्म मंडळाचे अध्यक्ष डॉ. मुकुंद दातार उपस्थित राहणार आहेत.

तीन दिवसीय महोत्सवात वेदश्री तपोवन द्वितीय चरण शुभारंभ भूमीपूजन, वेद स्वाहाकार यज्ञ, शालेय विद्यार्थी स्पर्धा, पारितोषिक प्रदान, वारकरी साधक पूजन, पुरस्कार वितरण, हरिकीर्तन, प्रवचन, श्रीमद्भगवद्गीता पारायण आदी उपक्रम होणार आहेत. वेदश्री तपोवन कार्य समितीसह महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान, संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुल, गीता परिवार, श्रीकृष्ण सेवा निधी आदी संस्थांनी आयोजन केले आहे. तरी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महर्षि वेदव्यास प्रतिष्ठानचे ट्रस्टी श्री अभय भुतडा यांनी केले आहे.

## महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड कार्यक्रम ७ डिसेंबरला

### १११ गीते व १११ गायक सादर करतील

**नागपूर, २३ नोव्हेंबर :** आपण सर्व गायक-गायिकांना तसेच संगीत रसिकांना नम्रपणे कळविण्यात येते की, श्री संती गणेशोत्सव व सांस्कृतिक मंडळ, डॉ. दंडे फाऊंडेशन, आणि पद्मश्री मोहम्मद रफी सांस्कृतिक मंच नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड्स साठीचा कार्यक्रम आता विविध भाषांमध्ये होत आहे. ह्यात विभिन्न भाषेतील १११ गीते १११ गायक कलाकार पहिल्यांदाच सादर करणार आहेत.

पूर्वी हे फक्त मराठी भाषेतच होत होते, मात्र मराठी भाषेतील गाण्यांना गायकांकडून फारसा प्रतिसाद न मिळाल्याने आता वेगवेगळ्या भाषांमध्ये होत आहे. ह्या कार्यक्रमाची संकल्पना संजय चिंचोले आणि सुनील वाघमारे यांची आहे.

उदाहरण:- मराठी, हिंदी, गुजराती, बंगाली, छत्तीसगढ़ी, तमिळ, तेलगू, पंजाबी, भोजपुरी, मल्याळम, करेलियन, राजस्थानी इ. सकाळी ८ वाजल्यापासून रात्री पर्यंत चालणारया या कार्य्राक्रमाचा आस्वाद सगळ्या संगीत रसिकांनी घेण्याचे आवाहन आयोजान्कांतर्फे करण्यात आले आहे.

सर्व इच्छुक गायक-गायिकांनी लवकरात लवकर नोंदणी करावी ही नम्र विनंती. अधिक माहितीकरिता मो. क्र. ९८५०३३८३४३ या वर संपर्क साधावा.

नोंदणी : २०/११/२०२५ पर्यंत होईल. कार्यक्रम रविवार दिनांक :७/१२/२०२५ सकाळी ८ वाजता. कार्यक्रमाचा पत्ता :शिक्षक सहकारी बँक सभागृह, गांधी सागर तलाव, महाल, नागपूर.

## इन्फोसिस फाउंडेशनकडून आरोहण सोशल इनोव्हेशन अवॉर्ड्स २०२५ च्या विजेत्यांची घोषणा

**नागपूर, २३ नोव्हेंबर :** इन्फोसिसची सामाजिक कार्य सीएसआर शाखा असलेल्या इन्फोसिस फाउंडेशनने आज आरोहण सोशल इनोव्हेशन अवॉर्ड्सच्या चौथ्या आवृत्तीच्या विजेत्यांची घोषणा केली. यंदा शिक्षण, आरोग्यसेवा आणि पर्यावरणीय शाश्वतता या तीन क्षेत्रांमध्ये अपवादात्मक नवसंशोधनांचा गौरव करण्यात आला - तंत्रज्ञान, सर्जनशीलता आणि करुणेद्वारे सामाजिक प्रेरणा देण्याच्या इन्फोसिस फाउंडेशनच्या ध्येयाशी जुळणारी ही तीन क्षेत्रे आहेत. या वेळी २००० हून अधिक प्रवेशिकांमधून विजेत्यांची निवड करण्यात आली

आरोहण सोशल इनोव्हेशन एवॉर्ड्स २०२५ चे विजेत्यांना त्यांच्या प्रभावी नवसंशोधनासाठी प्रत्येकी ५० लाख रूपये देण्यात आले

शिक्षण बेंगळुरू येथील राजेश ए राव, रवींद्र एस राव आणि दीपा एल बी राजीव यांनी 'कनेक्टिंग द डॉट्स' हा एक परस्परसंवादी शिक्षण कार्यक्रम विकसित केला आहे. त्यातून सरकारी शाळांमधील इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दररोज लाईव्ह वर्ग, लॅब किट, शिष्यवृत्ती आणि प्रभावी शिक्षणासाठी शिक्षक प्रशिक्षणाद्वारे स्टेम आणि स्पोकन इंग्लिश शिकवले जाईल.

आरोग्यसेवा – नवी दिल्ली येथील चितरंजन सिंह आणि रॉबिन सिंह यांनी 'क्लुइक्स सीओ१२' विकसित केला आहे. तो पोर्टेबल एआय- आणि आयओटी-सक्षम पाणी-गुणवत्ता विश्लेषक असून त्यातून रिअल-टाइम, जीपीएस-टॅग केलेले अहवाल तयार करतो. ते ३० मिनिटांत पाण्यामुळे होणारे रोग ओळखण्यासाठी १४ प्रमुख पॅरामीटर्सची चाचणी करते. त्यामुळे शहरी आणि ग्रामीण दोन्ही वर्गांत विश्वसनीय जल चाचणी परवडणारी, सुलभ आणि शाश्वत बनते.

पर्यावरणीय शाश्वतता – पुण्यातील राहुल सुरेश बाकरे आणि विनित मोरेश्वर फडणीस यांनी 'बोरचार्जर' विकसित केले. हे जगातील पहिले रोबोटिक कृत्रिम बोअरवेल-रिचार्ज तंत्र असून ते दरवर्षी ४ ते ८० लाख लिटर पावसाचे पाणी विद्यमान बोअरवेलमध्ये साठवू शकते त्यामुळे सिंचन, शेती उत्पादन आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता आणि प्रमाण सुधारते राहणीमान अधिक शाश्वत बनवते.

इन्फोसिस फाउंडेशनचे अध्यक्ष सलील पारेख म्हणाले, एका विशिष्ट उद्देशाने केलेल्या नवसंशोधनात जीवन बदलण्याची आणि शाश्वत भविष्य घडवण्याची शक्ती असते. आरोहण सोशल इनोव्हेशन अवॉर्ड्स या विश्वासाचे प्रतीक आहेत. ते अशा व्यक्तींचा गौरव करतात ज्यांनी आव्हानांना संधींमध्ये रूपांतरित केले आहे आणि बुद्धिमत्ता, सहानुभूती आणि प्रभाव साध्य केला आहे. शिक्षण, आरोग्यसेवा आणि पर्यावरणीय शाश्वततेत अभूतपूर्व काम करताना इन्फोसिस फाउंडेशनमध्ये आम्ही अशा नवसंशोधनाचा प्रभाव वाढवण्याचे आणि समतापूर्ण आणि लवचिक भविष्य घडवण्यासाठी वचनबद्ध असलेल्या संशोधकांच्या पिढीला प्रेरणा देण्याचे उद्दिष्ट ठेवतो.

## राशीभविष्य

**मेष :** कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर जास्त विश्वास ठेवू नका. नाहीतर फसवणूक होईल. आज नोकरीत पदोन्नती होईल. किंवा तुम्हाला पदोन्नतीची चांगली बातमी मिळेल. प्रकृतीकडे लक्ष पुरवा.

**वृषभ :** विरोधक तुमच्या कमकुवतपणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतील. तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या. व्यवसायातील समस्यांबद्दल अधिक जागरूक राहावे, अन्यथा नुकसान होऊ शकते.

**मिथुन :** आज दिवसाची सुरुवात चांगल्या बातम्यांनी होईल. व्यवसायात वेळेवर काम करा. प्रगतीसोबतच नफाही मिळेल. पदोन्नती मिळण्याची शक्यता आहे. जनतेकडून प्रचंड सहकार्य आणि पाठिंबा मिळेल.

**कर्क :** आजचा दिवस मिश्रित परिणामांचा असेल. खूप मेहनत केल्यानंतर यश मिळेल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस वाढेल. कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे सरकारी मदतीने दूर होतील.

**सिंह :** आज प्रेमसंबंध अधिक दृढ होतील. महत्त्वाचे पद मिळाल्याने समाजात तुमचा प्रभाव वाढेल. कठोर परिश्रमामुळे मालमत्तेशी संबंधित कामात यश मिळेल.

**कन्या :** व्यवसायात लक्षणीय यश मिळेल. जोडीदाराकडून तुम्हाला पाठिंबा आणि साथ मिळेल. सुरक्षा क्षेत्रात नोकरी शोधणाजया लोकांना विशेष यश मिळेल.

**तुळ :** आजचा दिवस नफा आणि प्रगतीचा असेल. महत्त्वाच्या कामात यशाचे संकेत मिळतील. तुम्ही नवीन काम सुरू करू शकता. नातेवाईक आणि जवळच्या मित्रांकडून सहकार्य मिळण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** आज तुमचे अशांत असेल आणि कशाचाही उत्साह वाटणार नाही. तुम्हाला काम करण्याची इच्छा होणार नाही. तुम्ही आळसाला बळी पडू शकता. कामाच्या ठिकाणी आळस आणि निष्काळजीपणा टाळा.


**धनु :** आज तुम्हाला तुमच्या मुलांकडून मस्त, चांगली बातमी मिळेल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला नवीन मित्र मिळतील. बौद्धिक काम करणाजया लोकांना मोठे यश आणि आदर मिळेल.

**मकर :** कामाच्या ठिकाणी सकारात्मक बदल दिसून येतील. काही काळापूर्वी अडकलेले इच्छित काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. व्यवसायात नवीन करार होऊ शकतात. उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.

**कुंभ :** आज तुम्हाला चांगली बातमी मिळू शकते. तुमच्या नोकरीत बढती तर मिळेलच पण तुमच्या इच्छित ठिकाणी पोस्टिंगही होईल. कामाच्या संदर्भात नवीन कामाच्या योजना आखल्या जातील.

**मीन :** नोकरीत बदलीची शक्यता आहे. भविष्यात चांगले फायदे मिळण्याची शक्यता आहे. स्वत:वर विश्वास ठेवा. इतरांच्या बोलण्यात अडकू नका. अन्यथा फसगत होऊ शकते.

## शब्दकोडे क्रमांक २२७७



**आडवे शब्द :-**

१) सध्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री
६) संध्याकाळ
८) अथवा
९) व्यग्र, गुंग
१०) मालाचे येणेजाणे
१२) उशी (इं.)
१३) सूर्यबिंब
१८) भीतिदायक, प्रचंड
२०) प्रत्येक दिवशी
२२) टपाल
२४) खंदक
२५) धोका
२७) गाजावाजा
२८) समोरासमोरची लढत
३०) बारीक झणझण
३२) भोळा मनुष्य
३३) मोठी जाड सुई
३४) माफ
३६) हरबऱ्याच्या झाडावरील दवाचे थेंब
३७) लिहिता-वाजता येणे
४०) नूतन
४२) गळाला अडकणारा जलचर
४३) उंच वास्तू
४५) अपमान
४८) मुलगी
४९) एक प्रश्नार्थक शब्द
५०) दह्याचे पातळ पेय
५१) आम रसाची पोळी
५२) रुची, स्वाद
५३) वानर
५४) अग्नी
५५) लेखक, कविने लिहिलेले छापील बाड
५६) देवाचे देहधारी रूप
५८) धातूचा धागा
५९) पोळ्या भाजण्याचे पात्र
६२) माजघर, भोजनशाळा
६५) एकमेकांपुढे
६७) जागविणारा आवाज
६८) अश्व
६९) मसाल्यातील पान
७०) चित्र काढणारा
७१) आकाश

**उभे शब्द :-**

१) परमेश्वर
२) पैशाची हाव
३) खाऊन संपविणे
४) चंचल
५) विळखा, मिठी
६) तिखट मीठाचा शिरा
७) बहुतकरुन
८) वचक, भीती
१०) व, आणखी
११) खबदडी
१३) काळ्या तोंडाचे माकड
१४) पाढ्यातील सहा
१५) भ्रमर
१६) पालखी, मेणा
१७) तांबूल
१९) विनंती, मागणी
२१) आजाराचे नाव
२३) जेमतेम
२६) प्रफुल्लित
२९) आकाश
३१) छाती
३३) देणारा
३५) मनुष्य
३६) उग्र, जळजळीत
३८) माफी मागणारा
३९) पृथ्वी
४०) यमनगरी
४१) काटकसर
४४) आई-वडील
४५) कैद
४६) मुद्दाम, जाणूनबुजून केलेले
४७) चित्रपटातील प्रमुख नट, नटी
५१) अवयव असलेला
५३) अगदी क्षुल्लक किंमत
५७) रवाळ पीठ
६०) गाईचे पिल्लू
६१) तसराळे
६३) चांदणी
६४) समुद्र
६६) पूर्ण ऐक्य, पूर्ण भरती

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कॅलिडोस्कोप



## भाजीविक्रेत्याला लॉटरी कोटींची!

नशीब कधी, कुठे आणि कसे पालटेल ते सांगता येत नाही! राजस्थानातील एका साध्या भाजीविक्रेत्यासोबत हेच घडले आहे. राजस्थानच्या कोटपुतली येथील अमित सेहरा या भाजीविक्रेत्याने तब्बल ११ कोटी रुपयांची पंजाब लॉटरी जिंकली आहे.

सेहरा यांनी आपल्या एका मित्राकडून पैसे उधार घेऊन पंजाबमधील बठिंडा येथील दुकानातून लॉटरी तिकीट विकत घेतले होते आणि हेच तिकीट त्यांचे नशिब पालटणारे ठरले आहे. लॉटरीचा निकाल जाहीर झाल्यानंतर आणि ११ कोटी रुपये जिंकल्यानंतर आनंदाश्रूंनी डोळे भरून आलेल्या अमित यांनी सांगितले, माझ्याकडे तर चंदीगडला जाऊन बक्षीस घेण्यासाठीही पुरेसे पैसे नव्हते, पण देवाने मला छप्परफाड बक्षीस दिले आहे.

जयपूर जिल्ह्यातील कोटपुतली येथे हातगाडीवर भाजी विकून उदरनिर्वाह करणारे अमित म्हणाले, हा देवाचा आशीर्वाद आहे. हे पैसे मी माझ्या दोन मुलांच्या शिक्षणासाठी वापरणार आहे. पुढे अमित म्हणाले, लॉटरी तिकीट घेण्यासाठी मुकेश या मित्राकडून पैसे उधार घेतले होते. त्याला ते एक कोटी रुपये देणार आहेत.

अमित यांनी दोन लॉटरी तिकिटे घेतली होती. एक स्वतःसाठी आणि एक आपल्या पत्नीसाठी. त्यांच्या पत्नीच्या तिकिटावर एक हजार रुपये मिळाले, तर अमित यांच्या तिकिटाने ११ कोटी रुपयांचा जॅकपॉट जिंकला. सेहरा म्हणाले, या पैशातून मी माझ्या कुटुंबासाठी घर बांधणार आहे आणि मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी गुंतवणूक करणार आहे.

## डीएसपीच्या मुलाचे शाही लग्न!

कानपूरचे निलंबित पोलिस अधीक्षक ऋषिकांत शुक्ला सध्या चर्चेत आहेत. २८ वर्षांच्या पोलिस सेवेत त्यांनी प्रचंड संपत्ती जमवली आहे. तीनशे कोटी रुपयांची बेकायदेशीर मालमत्ता सापडल्याने त्यांचे निलंबन करण्यात आले. त्यांची दक्षता आणि विभागीय चौकशी सुरू झाली आहे. भव्य लग्नामुळे शुक्ला यांची संपत्ती उघड झाली.

'इटर्निटी रिसॉर्ट' हा एक अत्यंत प्रतिष्ठित रिसॉर्ट आहे, ज्याची किंमत दोनशे कोटी रुपयांच्या दरम्यान असल्याचे सांगितले जाते. ऋषिकांत शुक्लाच्या मुलाचे लग्न या रिसॉर्टमध्ये झाले. या लग्न समारंभाला जिल्ह्यातीलच नव्हे तर आजूबाजूच्या परिसरातील सुमारे १८ जिल्ह्यांतील प्रमुख राजकारणी, आमदार, खासदार आणि अध्यक्ष उपस्थित होते. राजकारण्यांव्यतिरिक्त, डीआयजी दर्जाचे अधिकारीही ऋषिकांत शुक्ला यांच्या मुलाच्या लग्नाला उपस्थित होते.

'इटर्निटी रिसॉर्ट'मध्ये झालेल्या या भव्य लग्नाने केवळ पोलिस विभागातच नव्हे, तर राजकीय वर्तुळातही खळबळ उडाली. त्यानंतर शुक्ला चर्चेत आले. मैनपुरीत त्यांची पोस्टिंग होती; परंतु त्यांच्या प्रचंड संपत्तीमुळे त्यांना निलंबित करण्यात आले आहे. शुक्ला यांनी आठ वर्षे उपनिरीक्षक, तीन वर्षे निरीक्षक आणि १७ वर्षे पोलिस अधीक्षक म्हणून विविध पदांवर काम केले. अहवालांवरून शुक्ला यांना जमीन आणि इमारतींचे व्यवसाय तेजीत असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये तैनात करण्यात आले होते. दक्षता आणि विशेष तपास (एसआयटी) च्या अहवालांनुसार, शुक्ला आणि त्यांच्या कुटुंबाकडे अंदाजे १०० कोटी रुपयांची मालमत्ता होती.

शुक्ला यांची आर्य नगर परिसरात ११ दुकाने, चार मजली इमारत, एक गेस्ट हाऊस असून रिअल इस्टेट गुंतवणूक आणि अनेक कंपन्यांमध्ये शेअर्स आहेत. शुक्ला म्हणाले, हे लग्न त्यांनी नव्हे, तर वधूच्या कुटुंबाने आयोजित केले होते. वधूच्या कुटुंबाने २०० कोटी रुपयांचा रिसॉर्ट स्वतःच्या इच्छेने निवडला. मी त्यावर एकही पैसा खर्च केला नाही. एसआयटी अहवालात नमूद केलेल्या मालमत्ता वडिलोपार्जित आहेत. माझे आजोबा पोलिस निरीक्षक होते आणि माझे वडील व्यवस्थापक होते. त्यांनी ही मालमत्ता त्यांच्या कष्टाने मिळवली आणि तीच पुढे चालत माझ्याकडे आली आहे. ही बेकायदेशीर मालमत्ता नाही. सरकारला काही शंका असेल तर मी सर्व कागदपत्रे सादर करेन. तथापि, एखाद्याच्या कष्टाने कमावलेल्या पैशाला भ्रष्टाचार म्हणणे अत्यंत चुकीचे आणि अन्यायाचे आहे.

आर्यनगरमधील शुक्ला यांच्या ११ दुकानांची किंमत अंदाजे ९२ कोटी रुपये असल्याचे वृत्त आहे. एका गेस्ट हाऊस आणि भूखंडांची कागदपत्रेही



समोर आली आहेत. काही कंपन्यांमध्ये त्यांच्या पत्नी आणि नातेवाइकांच्या नावे गुंतवणूक असल्याचे दक्षता विभागाला आढळले आहे. उत्पन्नाचे स्रोत आणि मालमत्तेतील तफावत इतकी मोठी आहे, की ती सिद्ध करणे कठीण होईल. गोवा, पंजाबपासून चंदीगड आणि इतर अनेक ठिकाणीही त्यांच्या मालमत्ता आहेत.

## बटाट्याच्या नासाडीमुळे...



बटाटा हा आपल्या आहारातला अत्यंत महत्त्वाचा घटक. बटाटा सगळ्यांना आवडतो. कोणतीही भाजी शिल्लक नसेल तर पटकन बटाटा भाजी केली जाते. तर अशा या बटाट्याच्या कमतरतेमुळे आयर्लंडसारख्या देशात एकेकाळी हाहाःकार माजला होता. यामुळे अनेकांचे जीवही गेले होते. आयर्लंडमधलं बटाट्याचं पीक एका कीडीच्या प्रादुर्भावाने नष्ट झालं होतं. जवळपास सात वर्ष हा प्रकार सुरू होता. १८५२ मध्ये कीडीचा हा प्रादुर्भाव थांबला. मात्र तोपर्यंत उपासमार आणि खराब बटाटे खाल्ल्यामुळे तब्बल दहा लाख आयरिश लोकांचे प्राण गेले होते तर लाखो लोक आयर्लंड सोडून दुसऱ्या देशात गेले होते. या काळात आयर्लंडची लोकसंख्या २५ टक्क्यांनी घटली होती. त्या काळात आयर्लंडवर ब्रिटिशांचं शासन होतं. बटाट्याच्या पिकाला लागलेल्या कीडीमुळे आम्हाला मदत करावी, अशी विनंती इंग्लंडच्या राणीला करण्यात आली होती. मग राणीने कॉर्न लॉ मागे घेतला. यामुळे तिथल्या अन्नधान्याच्या किंमती कमी झाल्या. मात्र उपासमार काही थांबली नाही. एकोणिसाव्या शतकात आयर्लंड हा कृषीप्रधान देश होता. मात्र सततची उपासमार आणि आजारांमुळे इथे प्रचंड गरीबी होती. त्या काळात आयर्लंडची जवळपास ७० टक्के लोकसंख्या बटाटे खायची. त्यामुळे आयर्लंडला खूप मोठं नुकसान सहन करावं लागलं.

## सर्वात महाग

जगातल्या सर्वात महागड्या वस्तूची चर्चा सुरू झाली की सोनं, हिरा, प्लॅटिनम किंवा इतर मौल्यवान रत्न आपल्या डोळ्यांसमोर येतात. पण प्रत्यक्षात जगातली महागडी वस्तू दुसरीच कोणती तरी आहे. ही एक ग्रॅम वस्तू खरेदी करण्यासाठी जेवढे पैसे लागतील तेवढ्या पैशांमध्ये जगातले १०० छोटे देश खरेदी करता येतील. आता इतकी महाग आणि महत्त्वाची वस्तू कोणती, असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. एंटीमेटर असं या वस्तूचं नाव आहे. पृथ्वीवर एंटीमेटर काहीच कामाचं नाही. पण अंतराळात त्याचं खूप महत्त्व आहे. अंतराळातल्या संशोधनात एंटीमेटर अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो. अवकाशात कृष्णविवरात तारे दोन भागांमध्ये कापले जातात. या प्रक्रियेदरम्यान एंटीमेटरची निर्मिती होते. सर्नच्या प्रयोगशाळेने पहिल्यांदा या घटकाची निर्मिती केली होती. एंटीमेटर ही इतकी महत्त्वाची गोष्ट आहे की ती खरेदी करण्यासाठी कितीही किंमत मोजावी लागली तरी अनेकांची तयारी असेल. अंतराळ यात्रेदरम्यान वापरल्या जाणाऱ्या यानांचं इंधन या एंटीमेटरपासूनच बनवलं जातं. एंटीमेटरला प्रतिपदार्थ असंही म्हटलं जातं. बाजारात एक ग्रॅम प्रतिपदार्थासाठी ३१ लाख २५ हजार कोटी रुपये मोजावे लागतात. एंटीमेटर ही जगातली सर्वात महागडी वस्तू असल्याचं नासानेही स्पष्ट केलं आहे. एक मिलिग्रॅम प्रतिपदार्थ बनवण्यासाठी जवळपास १६० कोटी रुपयेही लागू शकतात. या घटकाची निर्मिती जिथे होते तिथे प्रचंडक्षा व्यवस्था तैनात केलेली असते.



## छोट्या बेटाचा राजा


जगात भारत, अमेरिका, इंग्लंडसारखे मोठ्ठाले देश आहेत. या देशांनी मोठा भूभाग व्यापला आहे. ब्रिटिशांनी तर अनेक देशांवर राज्य केलं. मात्र जगात असंही एक ठिकाण आहे जिथे फक्त ११ लोक राहतात. तिथला राजा रेस्टॉरंट आणि नाव चालवतो. किंग्डम ऑफ टवोलारा असं या ठिकाणाचं नाव आहे. इथल्या राजाने अर्धी चड्डी आणि सँडल घालूनच आयुष्य काढलं. इटलीतल्या सार्डिनिया प्रांतातल्या भूमध्य सागरात वसलेलं हे छोटंसं बेट आहे. एथे राजेशाही आहे. इटलीला एक देश म्हणून मान्यता मिळण्याआधीपासूनच इथे राजेशाही आहे. टोनिओ बर्तलिओनी असं इथल्या राजाचं नाव आहे. हा माणूस राजासारखा दिसत नाही आणि वागतही नाही. त्यामुळे या बेटावर गेल्यावर राजाच्या शोधात असाल तर तुमचा भ्रमनिरास होऊ शकतो. एक राजा म्हणून त्याला फक्त मोफत जेवण मिळतं. या व्यतिरिक्त काहीही नाही. तसंच हे जेवणही त्याला त्याच्या रेस्टॉरंटमधून मिळतं. सध्याच्या काळात या छोट्याशा बेटाबाबत तसंच इथल्या राजेशाहीबाबत बोलणं हास्यास्पद वाटेल. पण इथल्या लोकांना राजेशाहीचं खूप महत्त्व आहे. या बेटाला मोठा इतिहास असून इथले लोक या इतिहासाबाबत जागरूक आहेत. असं हे बेट आणि इथली प्रजा अनोखीच म्हटली पाहिजे. या जगात कुठे काय असेल याचा काहीच नेम नाही. त्यामुळे अशा जगावेगळ्या कथा आपल्याला आश्चर्याचा धक्का देऊन जातात. ११ लोकांचं राज्य सांभाळणाऱ्या या साध्या राजाची कथाही अनोखीच आहे असं म्हटलं तर वावगं ठरू नये.



## दहा कोटींचे सफरचंद!

कधी कोणती गोष्ट व्हायरल होईल सांगता येत नाही. सध्या मुंबईत अशीच एक गोष्ट प्रचंड व्हायरल होत आहे. चर्चेत आहे ती वस्तू म्हणजे एक सफरचंद. हे सफरचंद चक्क १० कोटींचे आहे. प्रत्येक मुंबईकराला या सफरचंदाची एक झलक पाहायची इच्छा आहे.

या सफरचंदाची एवढी किंमत आहे. कारण त्यात ९ कॅरेट ३६ सेंट हिरे आणि १८ कॅरेट सोने वापरले गेले आहेत. हे सफरचंद बनवले आहे रोहित पिसाळ यांनी. पिसाळ यांना 'गोल्ड मॅन' म्हणून ओळखले जाते. या सफरचंदाचे नाव 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये समाविष्ट झाले आहे आणि सध्या थाई रॉयल पॅलेसमध्ये ते विक्रीसाठी आहे. पिसाळ यांनी हे सफरचंद



अतिशय काळजीपूर्वक डिझाइन केले आहे.

प्रमाणपत्रानुसार, हे सफरचंद ९ कॅरेट ३६ सेंट हिऱ्यांनी जडवलेले आहे. १८ कॅरेट सोन्याचे वजन अंदाजे २९ ग्रॅम आहे. यात एकूण १,३९६ तुकडे वापरले गेले. सफरचंदाचे सौंदर्य आणि कारागिरी पाहता, या सफरचंदाचे नाव 'ग्रेट इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंदवले गेले आहे. जगप्रसिद्ध 'वर्ल्ड इंटरनॅशनल जेमोलॉजिकल इन्स्टिट्यूट'नेदेखील या सफरचंदाचे प्रमाणन केले आहे. शिवाय, ते आता थायलंडमधील रॉयल पॅलेसमध्ये प्रदर्शनासाठी ठेवण्यात आले आहे. त्यामुळे या सफरचंदाची मागणी आणखीनच वाढली आहे. ते जास्त किमतीत खरेदी करण्यासाठी लोक तयार आहेत.

पिसाळ म्हणतात, की त्यांनी हे सफरचंद बनवण्यासाठी खूप मेहनत घेतली आहे. तसेच कलात्मकतेच्या मिश्रणाने तयार केले आहे. हे सफरचंद केवळ एक डिझाइन नाही, तर भारतीय दागिन्यांच्या कलेचे सुंदर आणि अनोखे प्रतीक आहे. त्यामुळे हे सफरचंद आता चर्चेचा विषय बनले आहे.

## असे हे आळशी

भर रस्त्यात बिछाने टाकून आडवे झालेले लोक पहायला मिळाले तर? आपल्याला गंमतच वाटेल. कोलंबियामध्ये वर्षातून एकदा असं घडतं. रस्त्यात बिछाने टाकून झोपण्यासाठी जगभरातून लोक या ठिकाणी येतात. याचं कारण म्हणजे 'वर्ल्ड लेझीनेस डे.' जगभरातले आळशी लोक या दिवसाचा आनंद लुटण्यासाठी आणि भरपूर आळशीपणा करण्यासाठी छान सजवले होते. आळशी लोक दर वर्षी अशा प्रकारे इतागुईमध्ये येतात आणि मस्त मजा करून जातात. ताणतणाव दूर ठेवण्यासाठी अशा प्रकारे जागतिक आळशी दिन साजरा केला जातो. या एका दिवशी लोक मस्त तणावमुक्त असतात. याच उद्देशाने हा दिवस साजरा करण्यात येतो. १९८५ पासून अशा प्रकारचा उपक्रम सुरू करण्यात आला. इतागुईत राहणाऱ्या मारियो मोंतिया नावाच्या व्यक्तीच्या मनात हा विचार आला. आयुष्यात एक दिवस फक्त आराम ासाठी असला पाहिजे अशी कल्पना म नात आल्यानंतर त्याने हा दिवस सुरू केला. यानिमित्ताने अनोख्या स्पर्धांचं आयोजनही केलं जातं. कोलंबियामध्ये येतात. यंदाचा वर्ल्ड लेझीनेस डे या दिवसाचं कोलंबियामध्ये खूप आकर्षण असतं. गेल्यावर्षी इतागुईमध्ये या खास दिवसाचं आयोजन करण्यात आलं होतं. या निमित्ताने लोक स्वतःचे बिछाने घेऊन आले होते. हे बिछाने रस्त्यावर टाकून त्यांनी आराम केला. यावेळी लोकांनी आपले बिछाने




## ठाण्याचा अनोखा विक्रम मोडीत

महाराष्ट्रातील ठाणे जिल्हा भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला जिल्हा होता, परंतु आता ठाणे जिल्ह्याचा विक्रम मोडला आहे. या जिल्ह्याने महाराष्ट्राच नाही, तर उत्तर प्रदेशाचादेखील विक्रम मोडला आहे.

आता पश्चिम बंगालमधील उत्तर २४ परगणा हा भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला जिल्हा बनला आहे. २०२३ च्या अंदाजानुसार, या जिल्ह्याची लोकसंख्या अंदाजे एक कोटी पाच लाख आहे. हा जिल्हा कोलकाता महानगर क्षेत्राचा भाग आहे. लखनऊ हा उत्तर प्रदेशातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला जिल्हा आहे. त्याची लोकसंख्या सुमारे ५० लाख आहे.



२०११ च्या जनगणनेत, महाराष्ट्रातील ठाणे हा लोकसंख्येच्या बाबतीत देशातील नंबर एक जिल्हा मानला जात होता, त्याची लोकसंख्या ११.०६ दशलक्ष (१ कोटी १० लाख) होती. तथापि, ऑगस्ट २०१४ मध्ये, ठाणे जिल्हा दोन जिल्ह्यांमध्ये विभागला गेला. ठाणे जिल्हा आणि नवीन पालघर जिल्हा झाला. यामुळे ठाण्याची लोकसंख्या ८.०७ दशलक्षपर्यंत कमी झाली. परिणामी, उत्तर २४ परगणा सर्वात जास्त लोकसंख्या असलेला जिल्हा बनला. उत्तर २४ परगणा जिल्ह्याची लोकसंख्या सध्या एक कोटी ९ लाख एवढी आहे. दाट लोकसंख्येच्या बाबतीत हा जिल्हा पहिल्या क्रमांकावर आहे. प्रति चौरस किलोमीटर २,४६९ लोकसंख्येसह हा भारतातील सर्वात दाट लोकसंख्येचा जिल्हा आहे. ही घनता या जिल्ह्याला केवळ भारतातीलच नाही, तर जगातील सर्वात दाट लोकसंख्येच्या क्षेत्रांमध्ये स्थान देते.

## चार दिवसीय झिरो माईल लिटरेचर फेस्टिव्हलचे
# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

नॅशनल बुक ट्रस्ट (एनबीटी) इंडियाच्या वतीने व महाराष्ट्र शासन आणि झिरो माईल यूथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नऊ दिवसीय नागपूर बुक फेस्टिव्हल २०२५ अंतर्गत चार दिवसीय झिरो माईल लिटरेचर फेस्टिव्हलचा शानदार शुभारंभ रविवारी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. २३-२४ आणि २९-३० नोव्हेंबरदरम्यान हा साहित्य महोत्सव रेशीमबाग मैदानावर रंगणार आहे.

समारंभाला शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धाच्या कुलगुरू व साहित्य अकादमीच्या उपाध्यक्षा डॉ. कुमुद शर्मा, लेखक व शिवकथाकार विजयराव देशमुख, एनबीटीचे अध्यक्ष प्रा. मिलिंद सुधाकर मराठे, संचालक युवराज मलिक, झिरो माईल यूथ फाउंडेशनचे मार्गदर्शक सत्यनारायण नुवाल, अध्यक्ष अजय संचेती, संचालक समय बनसोड उपस्थित होते.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नागपूर हे देशाला दिशा देणाऱ्या अनेक घटनांचे साक्षीदार असलेले संस्कृतीचे शहर आहे. येथे आरएसएस सारख्या प्रखर राष्ट्रवादाची परंपरा आहे. भगवान गौतम बुद्धांनी धम्मचक्रप्रवर्तन केलेली ही पुण्यभूमी आहे. गोंड राजांनी वाचनालयांची परंपरा सुरू करून ज्ञानसंस्कृती रुजवली. भोसले काळात हिंदवी स्वराज्याच्या विस्तारात नागपूरने मोलाची भूमिका बजावली. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, राम शेवाळकर, महेश एलकुंचवार, सुरेश भट, ग्रेस, माडखोलकर, मारुती चितमपल्ली, परशुराम खुणे यांसारख्या साहित्यिकांची नावे घेत ते पुढे म्हणाले, विदर्भ ही भाषेच्या संगमाची भूमी आहे. येथे मराठी आणि हिंदी साहित्याची समांतर अशी समृद्ध परंपरा आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागपूर बुक फेस्टिव्हलच्या उपक्रमाचे कौतुक केले. ते म्हणाले, एनबीटीने देशभरात वाचनसंस्कृती पुर्नस्थापित करण्याचे उत्कृष्ट कार्य केले आहे. नागपूरचा पुस्तक महोत्सव आता नवी उंची गाठेल.

राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, आजच्या काळात वाचनाची गरज सर्वाधिक आहे आणि त्या जाणिवेतून हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. डिजिटल माध्यमामुळे वाचनाला धोका निर्माण होत असल्याची चिंता व्यक्त होत असल्याच्या पार्श्वभूमीवर या पुस्तक महोत्सवाचे महत्त्व अधिक आहे. ते पुढे म्हणाले, या महोत्सवात ३०० हून अधिक प्रकाशक आणि १५ लाखांहून अधिक पुस्तके उपलब्ध आहेत. परिसरातील विद्यार्थी आणि नागरिकांना याचा मोठा फायदा होईल.

कार्यक्रमात बोलताना विजयराव देशमुख म्हणाले, यवनांच्या आक्रमणानंतर आपली संस्कृती लयास गेली, परंतु शिवछत्रपतींनी मराठी भाषेची आणि भारतीय संस्कृतीची पुन्हा प्रतिष्ठापना केली. हा पुस्तक महोत्सव त्या परंपरेचा वारसा पुढे नेणारा आहे. आज ३५० वर्षांनंतर नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस आणि मोहनजी भागवत यांच्या नेतृत्वात नवे राष्ट्र उभारताना दिसत आहे. हा महोत्सव त्या नवभारताच्या उभारणीची साक्ष देणारा आहे.

एनबीटी अध्यक्ष प्रा. मिलिंद सुधाकर मराठे यांनी ट्रस्टच्या कार्याचा आढावा घेत सांगितले की, देशभरातील ५० जिल्हा व तालुकास्तरांवर पुस्तक महोत्सव आयोजित करण्याचे उद्दिष्ट ट्रस्टने निश्चित केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वेदिका मिश्रा यांनी केले, तर आभार प्रदर्शन युवराज मलिक यांनी केले. खरेदीसाठी सकाळपासून गर्दी दिसली

# बिनविरोध निवडीचा ट्रेंड लोकशाहीसाठी घातक



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

### खासदार सुप्रिया सुळे यांची भाजपावर टीका

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी लोकशाही टिकवण्यासाठी बिनविरोध निवडून देण्याचा नवीन ट्रेंड थांबायला हवा, असे स्पष्ट मत व्यक्त केले. निवडणूक आयोगाबद्दल अविश्वास निर्माण होणे ही अत्यंत घातक बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले.

एका वृत्तपत्राने या मुद्द्यावर विचार मांडला असून, त्यावर गंभीरपणे विचार होणे आवश्यक आहे. लोकशाहीवर विश्वास असेल आणि ती जिवंत राहावी अशी इच्छा असेल, तर बिनविरोध निवडीचा हा नवीन ट्रेंड थांबवणे गरजेचे आहे, असे सुळे म्हणाल्या. आपल्या अनेक पिढ्यांनी स्वातंत्र्यासाठी लढा दिला, त्यामुळे आज त्या स्वातंत्र्यावर गदा येते आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो, असेही त्यांनी सांगितले.

अनिल देशमुख यांच्या कुटुंबातील वादाच्या बातम्यांवरही सुप्रिया सुळे यांनी भाष्य केले. त्या म्हणाल्या की, काही लोक नेहमीच आमच्या विरोधात बोलत असतात. अनिल देशमुख असोत किंवा इतर कोणी, त्यांच्या घरात काय घडले यावर चर्चा करण्याचा आम्हाला अधिकार नाही. अनिल देशमुख यांनी चार-पाच दशके जनतेची सेवा केली आहे. देशमुख कुटुंबात काही वाद आहेत, ही बातमी त्यांना खोटी आणि तथ्यहीन वाटते. राजकारणात आपण सेवेसाठी आलो आहोत. सलिल देशमुख यांच्या मनात 'पहिले देश, मग पक्ष आणि नंतर घर' हेच समीकरण आहे. त्यामुळे सूत्रांच्या आधारे येणाऱ्या बातम्यांना काही आधार नाही, असे सुळे यांनी स्पष्ट केले. सलिल देशमुख यांच्या दुसऱ्या पक्षात जाण्याचा प्रश्नच येत नाही, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

कौटुंबिक संबंध आणि राजकारण यांचा संबंध जोडता कामा नये, असे सुळे यांनी अधोरेखित केले. छगन भुजबळ आजारी असताना त्यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी आपण अनेकदा रुग्णालयात गेल्याचे उदाहरण त्यांनी दिले. महाराष्ट्रातील राजकारण खूपच खालच्या पातळीवर गेले असून, जनसेवा करण्याऐवजी आपला बराचसा वेळ कोर्ट केसेसमध्ये जात असल्याचे त्यांनी खेदाने सांगितले.

पालघर साधू हत्याकांड प्रकरणातील काशिनाथ चौधरी यांच्या भाजप प्रवेशावरही सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली. काशिनाथ चौधरी यांना आपण कालही गुन्हेगार मानत नव्हते आणि आजही मानत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. पालघर साधू हत्याकांडात त्यांच्यावर आरोप झाले तेव्हाही आपण ते आरोप तथ्यहीन असल्याचे सांगितले होते आणि आपला ठाम विश्वास आहे की ते निर्दोष आहेत, असे सुळे म्हणाल्या.

मात्र, आता ते भाजपमध्ये गेल्यामुळे भाजपने त्यांची भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी सुळे यांनी केली. भाजपमधील जुन्या नेत्यांबद्दल आपला आदर कायम असल्याचेही त्यांनी शेवटी नमूद केले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनीला भेट



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

मध्य भारतातील शेतकऱ्यांच्या आकर्षणाचे केंद्र ठरलेल्या आणि नागपुरात मागील तीन दिवसांपासून सुरु असलेल्या ॲग्रोव्हिजन-२०२५ या कृषी प्रदर्शनीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दुपारी भेट दिली. या भेटीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रदर्शनीतील कृषी उत्पादने आणि पूरक उद्योगांच्या दालनांची पाहणी करून शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाबाबत माहिती जाणून घेतली.

अमरावती मार्गावरील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिसरातील ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनीच्या कार्यालयात आयोजित छोटेखानी कार्यक्रमात या प्रदर्शनीचे प्रणेते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, बारामती ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे विश्वस्त प्रतापराव पवार, ॲग्रोव्हिजन फाऊंडेशनचे अध्यक्ष रवी बोरटकर तसेच ॲग्रोव्हिजन सल्लागार परिषदेचे चेअरमन डॉ. सी.डी. मायी हे मान्यवर उपस्थित होते.

ॲग्रोव्हिजनची ही आतापर्यंतची सोळावी प्रदर्शनी आहे. याशिवाय फाऊंडेशनला १० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने तयार करण्यात आलेल्या कॉफी टेबल बुकचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

या कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी कृषी प्रदर्शनीतील विविध संस्था आणि कंपन्यांच्या दालनांना भेट दिली. विशेषतः मुख्यमंत्र्यांनी शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाबाबत माहिती जाणून घेतली.

## मोबाईल न मिळाल्याच्या रागातून १३ वर्षीय मुलीची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

मोबाईल वापरण्यास मनाई केल्याने एका १३ वर्षीय विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना नागपूर जिल्ह्यातील चणकापूर येथील जय भोले नगर परिसरात घडली आहे. दिव्या सुरेश कोठारे (वय १३) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थिनीचे नाव असून, ती आठवीत शिकत होती.

मिळालेल्या माहितीनुसार, दिव्या कोठारे ही चणकापूर येथील महात्मा फुले शाळेत आठवीत शिकत होती. ती नियमितपणे इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲपसारख्या सोशल मीडिया ॲप्सचा अति वापर करत होती, ज्यामुळे तिच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष होत होते. त्यामुळे तिचे कुटुंबीय तिला "मोबाईल कमी वापर, अभ्यासाला प्राधान्य दे" असे सतत समजावत होते.



शुक्रवारी (दि. २१) तिच्या आत्याच्या मुलीचे लग्न असल्याने दिव्याचे कुटुंबीय लग्नाच्या कार्यक्रमासाठी आत्याच्या घरी गेले होते. संध्याकाळी साडेसातच्या सुमारास दिव्याने नेहमीप्रमाणे मोबाईल मागितला, मात्र कुटुंबीयांनी तिला मोबाईल देण्यास नकार दिला. मोबाईल न मिळाल्याने दिव्या नाराज झाली आणि रागाच्या भरात ती आत्याच्या घरातून निघून थेट स्वतःच्या घरी आली. त्यावेळी घरात कोणीही नव्हते.

घरात कोणी नसताना, दिव्याने घरात बांधलेल्या पाळण्याच्या दोरीला गळफास घेऊन आत्महत्या केली. काही वेळाने तिची मोठी बहीण तिला शोधत घरी आली असता, हा प्रकार उघडकीस आला.

तिने धावत जाऊन आई-वडिलांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच खापरखेडा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून, पुढील तपास सुरू आहे. मोबाइलच्या अति वापरावरून झालेल्या वादातून एका चिमुकलीने टोकाचे पाऊल उचलल्याने या घटनेने सर्व पालकांना हादरवून सोडले आहे.

## नागपूर-इंदूर वंदे भारत धावणार १६ कोचच्या रेकसह

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

नागपूर-इंदूर वंदे भारत एक्स्प्रेसला प्रवाशांकडून मिळणारा मोठा प्रतिसाद लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने या रेल्वे गाडीची क्षमता दुपटीने वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या २४ नोव्हेंबरपासून ही प्रतिष्ठित वंदे भारत एक्स्प्रेस आठ ऐवजी १६ डब्यांच्या विस्तारित रेकसह मार्गावर धावणार आहे. त्यामुळे अधिक प्रवाशांना आरामदायी व वेगवान प्रवासाचा लाभ मिळणार आहे.



नागपूर-इंदूर मार्गावरील वाढत्या मागणीमुळे कोचसंख्या वाढवण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. या संदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पश्चिम-मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक व नागपूर विभागाचे विभागीय व्यवस्थापक यांच्याकडे मागणी करण्यात आली होती. अखेर संबंधित अधिकारी व मंत्रालयाच्या सकारात्मक भूमिकेमुळे ही मागणी प्रत्यक्षात उतरली.

या निर्णयाबद्दल समाधान व्यक्त करताना झोनल रेल्वे युजर्स कन्सल्टेटिव्ह कमिटीचे सदस्य बृजभूषण शुक्ला यांनी सर्व अधिकारी व जनप्रतिनिधींचे आभार मानले. त्यांनी सांगितले की प्रवाशांसाठी अधिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने हा निर्णय महत्त्वाचा ठरला आहे. डब्यांची संख्या वाढल्याने तिकीट उपलब्धता सुधारेल तसेच प्रतीक्षा यादीचा ताण लक्षणीयरीत्या कमी होईल.

जसे नागपूर-इंदूर वंदे भारतमध्ये कोच वाढवले गेले आहेत, तसेच नागपूर-पुणे वंदे भारत एक्स्प्रेसमध्येही आगामी काळात डब्यांची संख्या वाढवण्याची शक्यता आहे. सध्या या मार्गावर प्रवाशांची मागणी मोठ्या प्रमाणात असून, अतिरिक्त रेल्वेडबे उपलब्ध झाल्यास नागपूर व पुण्यातील व्यावसायिक, विद्यार्थी व नियमित प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. वंदे भारत एक्स्प्रेसने प्रवासाचा दर्जा बदलला असून तिचा वेग, सुविधा व वेळेचे काटेकोर पालन यामुळे प्रवाशांचा विश्वास वाढला आहे. विस्तारित रॅकसह २४ नोव्हेंबरपासून सुरू होणारी ही सेवा मध्य भारतातील रेल्वे प्रवासाला नवे वळण देईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, नागपूरहून सध्या अनेक महत्त्वाच्या शहरांना वंदे भारत एक्स्प्रेस धावत असून, या सर्व गाड्यांना नागरिकांचा प्रतिसाद मिळतो आहे.

## रोख रकमेसह ७.९५ लाखांचा ऐवज जप्त

■ महासागर प्रतिनिधी
पाटणबोरी, दि. २३ :

पाटण पोलिसांच्या पथकाने झरी येथील एका बारमध्ये चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर छापा टाकला आणि घटनास्थळी आठ जणांना ताब्यात घेतले. पोलिसांनी वाहने, रोख रक्कम आणि इतर वस्तूंसह ७,९५,३५० किमतीचा माल जप्त केला

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नामांकित आरोपींमध्ये झरी येथील रामकृष्ण मोहितकर (४०), माथार्जुन येथील शेख शफी युसूफ शेख (४७), झरी येथील रहिवासी रवींद्र कायतवार (३७), नरसारेड्डी लोकावार (६२), तेजस मोघे (२७), सुरदापूर येथील रहिवासी प्रशांत येटे (४०), नितीन मुस्कावर (३२) आणि बार मालकचा अटक केलेल्यांमध्ये समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, झरी येथील एका पॉश बारमध्ये पत्ते जुगार खेळणाऱ्या लोकांच्या गटाची गोपनीय माहिती पाटण पोलिसांना मिळाली होती. पथकाने परिसरात छापा टाकला आणि संशयितांना शोधून काढले. त्यांना ताब्यात घेतल्यानंतर घटनास्थळावरून ७ लाख ९५ हजार ३५० रुपये किमतीची रोकड आणि वाहन जप्त करण्यात आले असून अटक पाटण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## किरकोळ वादातून हत्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

राजकमल चौकाजवळील देसी दारू भट्टीसमोर उशिरा रात्री घडलेल्या खुनाची घटना नागपूरमध्ये खळबळ उडवणारी ठरली. विशाल बनसोडे (३२) याचा निर्दय खून करण्यात आला असून किरकोळ वादातून ही घटना घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

घटना घडल्यानंतर आरोपी विरजी बालाजी कवेटीया (३७) हा पळून जाण्याचा प्रयत्न करत होता. मात्र, अजनी पोलिसांनी तात्काळ सर्व बाजूंनी नाकाबंदी करून अवघ्या काही मिनिटांत त्याला पकडले.

पोलिसांच्या या तत्पर आणि प्रभावी कारवाईचे नागरिकांकडून जोरदार कौतुक केले जात आहे. हत्येची माहिती मिळताच अजनी पोलीस पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. परिसराची पूर्ण घेराबंदी करण्यात आली. चारही दिशांनी नाकाबंदी असल्याने आरोपीला पळ काढता आला नाही आणि त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले. सूत्रांच्या माहितीनुसार, पोलिसांनी घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावे जप्त केले असून आरोपीची कसून चौकशी सुरू आहे. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, पोलिसांनी त्वरित कारवाई केली नसती तर आरोपी फरार होऊ शकला असता. या जलद आणि नेमक्या प्रतिसादामुळे अजनी पोलिसांनी पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की, शहरात गुन्हेगारांना मुक्तपणे फिरू दिले जाणार नाही. विवादाचे खरे कारण, खुनामागील पार्श्वभूमी आणि इतर संबंधित पैलूंचा पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.ही घटना नागपूर पोलिसांची दक्षता आणि शहराच्या सुरक्षेबाबतची त्यांच्या कटिबद्धतेची पुन्हा एकदा जाण करून देते.

# नागपूर गोवारी हत्याकांड
### स्मृतिस्थळावर गर्दी ओसरली, नेत्यांकडून उपेक्षा कायम



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

नागपूर येथे २३ नोव्हेंबर १९९४ रोजी झालेल्या गोवारी हत्याकांड घटनेला आज ३१ वर्षे पूर्ण झाली आहेत. गोवारी समाजाला आदिवासी दर्जा मिळावा आणि जातप्रमाणपत्रे मिळावीत या मागणीसाठी काढलेल्या मोर्चादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ११४ गोवारी बांधवांचा मृत्यू झाला होता.

या घटनेनंतर अनेक वर्षांनीही गोवारी समाजाची दुर्दशा कायम आहे. एकेकाळी शहीद गोवारी स्मृति स्थळावर पाय ठेवायलाही जागा नसायची, इतकी गर्दी असायची. मात्र, आता हे स्मृतिस्थळ उपेक्षित असून, मोकळे रस्ते दिसतात. दरवर्षी येणारी गर्दीही आता ओसरत चालली आहे.

नागपूरच्या झीरो माईल जवळील शहीद गोवारी स्मारक आजही उपेक्षित आहे. रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपुरात होते, तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी नागपूर मुक्कामी होते. दोघांनीही विविध कार्यक्रमांना हजेरी लावली, परंतु एकाही नेत्याला गोवारी शहीद स्मारकाला भेट देण्याची गरज वाटली नाही.

२३ नोव्हेंबर १९९४ रोजी महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात सुरू असताना, आदिवासीत्वाबाबतच्या अडचणी दूर करण्याच्या मागणीसाठी विदर्भातुन आदिवासी गोवारी जमातीचे लोक आपल्या कुटुंबासह विधान भवनावर मोर्चा घेऊन आले होते. दिवसभर विनवण्या करूनही एकाही मंत्र्याने मोर्चाला सामोरे येण्यास नकार दिला.

या निराशेमुळे जमावात चलबिचल सुरू झाली. याचवेळी, नेतृत्व हीन समाज बांधवांवर पोलिसांनी लाठीमार केला. यामुळे जीव वाचवण्यासाठी एकच धावपळ उडाली आणि चेंगराचेंगरी झाली. यात ११४ निरपराध गोवारी शहीद झाले, ज्यात पुरुष, स्त्रिया आणि बालकांचा समावेश होता.

# अतिदुर्गम फुलनार येथे उभारले नवे पोलीस मदत केंद्र
### नक्षलवादी कारवायांना आळा घालण्यासाठी सुरक्षा साखळी अधिक मजबूत

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. २३ :

नक्षलदृष्ट्या अतिसंवेदनशील आणि विकासापासून कोसो दूर असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागात सुरक्षिततेची पोकळी भरून काढण्यासाठी गडचिरोली पोलिसांनी पुन्हा एकदा तत्परता दाखविली आहे. उपविभाग भामरागड अंतर्गत येणाऱ्या फुलनार (कॅम्प गुंडूरवाही) या अतिदुर्गम ठिकाणी नवीन पोलीस मदत केंद्राची २४ तासात स्थापना करण्यात आली आहे.

हे केंद्र भामरागडपासून २० किमी आणि छत्तीसगड सीमेपासून अवघ्या ७ किमी अंतरावर आहे. ज्यामुळे या भागाची सुरक्षा व्यवस्था आणि स्थानिक नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा मैलाचा दगड ठरणार आहे, असे मत गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी व्यक्त केले.




२०२३ पासून सुरू असलेल्या सुरक्षा पोकळी कमी करण्याच्या साखळीतील हे ८ वे नवीन पोलीस मदत केंद्र आहे. यापूर्वी ११ डिसेंबर २०२४ रोजी पेनगुंडा, ३० जानेवारी २०२५ रोजी नेलगुंडा आणि ९ मार्च २०२५ रोजी कवंडे येथे नवे केंद्र उभारण्यात आले आहेत. फुलनार येथे मदत केंद्र उभारण्यासाठी १००० हून अधिक सी-६० कमांडो आणि नवनियुक्त पोलीस जवान तसेच ५०० विशेष पोलीस अधिकाऱ्यांसह एकूण १०५० मनुष्यबळाचा सहभाग होता. ४ जेसीबी, ७ ट्रेलर आणि २५ ट्रकच्या सहाय्याने अवघ्या एका दिवसात केंद्राची उभारणी पूर्ण करण्यात आली.

या केंद्रात पोलीस दलासाठी वायफाय सुविधा, पोर्टा कॅबिन, आरओ वॉटर प्लांट आणि मॅक वॉल-बीपी मोर्चसारख्या सुरक्षा सुविधा उभारण्यात आल्या आहेत. केंद्राच्या सुरक्षेसाठी गडचिरोली पोलिसांचे अधिकारी-अंमलदार, एसआरपीएफ ग्रुप १४, सीआरपीएफ ३७ बटालियनचे जवान आणि विशेष अभियान पथकाचे (एसओजी) २०० कमांडो तैनात करण्यात आले आहेत.

उद्घाटनप्रसंगी जनजागरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती) डॉ. छेरिंग दोरजे, सीआरपीएफचे उपमहानिरीक्षक (अभियान) अजय कुमार शर्मा, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी स्थानिकांना साड्या, ब्लँकेट, स्वयंपाक भांडी, मच्छरदाण्या आणि शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या वाढलेल्या सुरक्षिततेमुळे आता फुलनार आणि कोर्पशी येथील अडकलेले मोबाईल टॉवरचे बांधकाम पूर्ण होणार आहे. तसेच, भविष्यकाळात या अतिदुर्गम भागात नवीन रस्ते बांधकामे आणि एस.टी. बस सेवा सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, यामुळे नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.